दैनिक अहिल्यानगर | पुणे | छत्रपती संभाजीनगर | बीड | घाराशिव | नाशिक येथून दररोज प्रसिध्द

# राष्ट्र सह्याद्री

संपादक : काकासाहेब नवले | RNI No. MAHMAR/2019/82605 | वर्ष ७ वे | पाने ८ | मुल्य रू. ४.०० | अंक ३४० | बुधवार २३ सप्टेंबर २०२६

| पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 | www.rashtrasahyadri.com



साईवेद प्रकाशन
विचारांचा प्रकाश, परिवर्तनाची दिशा

URGENTLY REQUIRED
RECEPTIONIST / TELECALLER - 01
Apply on mail:
saived.print@gmail.com
INTERVIEW DATE: 28 SEPTEMBER 2026
SAIVED PRAKASHAN PRIVATE LIMITED
Office: Daily Rashtra Sahyadri Office,
Opposite Mac Care Hospital, Zopdi Canteen, Ahilyanagar.
Mo: 7588605255


# दुष्काळप्रश्नी बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळ उपसमिती

## सरकारची धावपळ: शनिवारपूर्वी पहिली अधिसूचना | पंचनामे, पाणी–चारा आणि मदतीच्या उपाययोजनांना वेग

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

मुंबई : राज्यातील अनेक भागांत पावसाने ओढ दिल्याने निर्माण झालेल्या दुष्काळसदृश परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने हालचालींना वेग दिला आहे. मराठवाडा, विदर्भासह विविध भागांत खरीप पिकांना मोठा फटका बसला असून सोयाबीन, कापूस, मका, ज्वारी आणि भात या पिकांच्या नुकसानीचा आढावा घेण्यात येत आहे. शेतकऱ्यांना तातडीने दिलासा देण्यासाठी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळ उपसमिती स्थापन करण्यात आली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारपूर्वी दुष्काळाबाबतची पहिली अधिसूचना काढण्यात येईल, अशी घोषणा केली आहे. त्यामुळे या पहिल्या अधिसूचनेत कोणते जिल्हे, तालुके अथवा भाग समाविष्ट होणार, याकडे शेतकरी आणि प्रशासनाचे लक्ष लागले आहे. प्राथमिक माहितीच्या आधारे अधिसूचना काढल्यानंतर आवश्यकतेनुसार इतर भागांचाही समावेश करता येणार असल्याचे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले आहे.

दरम्यान, प्रत्यक्ष शेतात जाऊन पीक नुकसानीचे पंचनामे करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. शेतकऱ्यांना मदत देण्यासाठी तसेच केंद्र सरकारकडून राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद निधीच्या ( एनडीआरएफ ) निकषांनुसार मदत मिळविण्यासाठी नुकसानीची अचूक माहिती संकलित केली जात आहे. पंचनाम्यांच्या अहवालाच्या आधारे पुढील मदतीबाबत निर्णय घेतला जाणार असल्याचे महसूलमंत्री बावनकुळे यांनी यापूर्वी स्पष्ट केले आहे.



उपसमिती नियमित बैठका घेऊन दुष्काळी परिस्थितीचा जिल्हानिहाय आढावा घेणार आहे. पीक नुकसान, पिण्याचे पाणी, जनावरांसाठी चारा आणि दुष्काळ निवारणाच्या उपाययोजना यावर समिती निर्णय घेणार आहे. राज्यातील पालकमंत्र्यांनाही प्रत्यक्ष शेतात जाऊन परिस्थितीची पाहणी करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

सरकारच्या या निर्णयामुळे दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना मदतीची अपेक्षा निर्माण झाली आहे. मात्र, अधिसूचनेत कोणत्या भागांचा समावेश होतो आणि पंचनाम्यांनंतर प्रत्यक्ष मदतीचे स्वरूप काय राहते, यावर शेतकऱ्यांचे लक्ष केंद्रित झाले आहे.

### दुष्काळ निवारण समितीची रचना व कार्य

**अध्यक्ष :** महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे.

**सदस्य :** सत्तेतील तिन्ही पक्षांतील संबंधित मंत्र्यांचा समावेश.

**सचिव :** राज्याचे मुख्य सचिव.

**कार्य :** दुष्काळी परिस्थितीचा नियमित आढावा घेणे, विविध विभागांकडून नुकसानीची माहिती मागविणे, पीक नुकसानीचे पंचनामे, पिण्याच्या पाण्याची उपलब्धता, जनावरांसाठी चारा आणि दुष्काळ निवारणाच्या उपाययोजनांवर निर्णय घेणे ही समितीची प्रमुख जबाबदारी असेल. आवश्यक त्या मदत व उपाययोजनांसाठी समितीला मंत्रिमंडळाचे अधिकार देण्यात आले आहेत.

## नवी दिल्ली येथे संपादक करण नवले यांच्या हस्ते श्रीगणेशाची आरती





नवी दिल्ली : येथील महाराष्ट्र सदन येथील गणेशोत्सवात मंगळवारी सायंकाळी दैनिक राष्ट्र सह्याद्रीचे संपादक करण नवले यांच्या हस्ते आरती करण्यात आली. समवेत सर्वोच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायमूर्ती तथा प्रेस कौन्सिल ऑफ इंडिया व एसआयआर कमिटीच्या भारताच्या प्रमुख रंजना देसाई, पालघरचे खासदार डॉ. हेमंत विष्णू सावरा व उद्योजक राम पेंढारकर.

त्यांच्यासाह केंद्रीय नवीन व नवीकरणीय ऊर्जा राज्यमंत्री श्रीपाद नाईक, सुदर्शन वृत्तवाहिनीचे प्रमुख सुरेश चव्हाणके, लिज्जत पापड उद्योग समूहाचे संस्थापक सुरेश कोते यांना नवी दिल्ली येथे होणाऱ्या मराठी मेळावा व सह्याद्री रत्न पुरस्कार सोहळ्याचे निमंत्रण देण्यात आले.

(छायाचित्र : किशोर गायकवाड)

## धीरज परदेशी हत्याकांडातील पाच आरोपींचा जामीन अर्ज फेटाळला

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** धीरज परदेशी हत्या प्रकरणात पाच आरोपींच्या वतीने जिल्हा न्यायालयात जामिनासाठी अर्ज दाखल करण्यात आला होता. या अर्जावर न्यायालयात सुनावणी होऊन. जिल्हा व सत्र न्यायाधीश श्री. आर.एस. गुप्ता यांनी पाच आरोपीचा जामीन अर्ज फेटाळलेले आहे.

सदर घटनेची थोडक्यात माहिती अशी की, दि. ७/०८/२०२६ रोजी दुपारी ४.१० वाजण्याच्या सुमारास दर्गा दायरा कब्रस्तान, मुकुंदनगर येथे फिर्यादी अक्षय मुळे तसेच मयत धीरज परदेशी व साक्षीदार काव्य गणेश तावरे, असे स्ट्रीट लाइटच पॅनलचे काम करीत असताना, तेथे आरोपी मेहराज सैयद, सिराज सैयद, मुस्तकीन सैयद, युनुस शेख व इतर २–३ अनोळखी इसमसांनी एकत्रित जमवून, त्यांच्या हातातील लाकडी बल्लयाने व लोखंडी पाइपने धीरज परदेशी यांना जीवे ठार मारण्याच्या उद्देशाने बेदम मारहाण केली. सदर घटनेनंतर जखमी धीरज परदेशी यांस मॅककेअर हॉस्पिटल येथे उपचार कामे दाखल करण्यात आले. औषधोपचार सुरू असताना ०९/०८/२०२६ रोजी दुपारी २ वाजता धीरज परदेशी मयत झाले. पोलिसांच्या तपासादरम्यान सदर घटनेमध्ये आणखी ९ आरोपींचे नाव निष्पन्न झाले. त्यामध्ये आरोपी नामे युनुस खानसाहेब शेख, वसीम रहिम सैयद, इम्रान मुसा सैयद, अरमान लियाकत सैयद, मोहम्मदरशाद इम्रान सैयद अशा आरोपींनी न्यायालयासमोर जामीन मिळण्यासाठी अर्ज दाखल केलेले होते. सदर प्रकरणात (पान ४ वर)

## ₹२,७००चे औषध ₹२७ हजारांच्या एमआरपीने विक्री

- कॅन्सरच्या औषधावर दहापट दरवाढ; सर्वोच्च न्यायालय संतप्त
- ‘रुग्णांवर भरदिवसा दरोडा’ अशी न्यायालयाची टिप्पणी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नवी दिल्ली :** कॅन्सरसारख्या गंभीर आजारावरील आवश्यक औषधांच्या किमतीतील प्रचंड तफावतीवर सर्वोच्च न्यायालयाने तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. एका कॅन्सर औषधाची रिटेलरला मिळणारी किंमत सुमारे ₹२,७०० असताना त्याची एमआरपी ₹२७,००० निश्चित करण्यात आल्याचे सुनावणीदरम्यान समोर आले. या दहापट फरकाची माहिती समोर आल्यानंतर न्यायमूर्ती विक्रम नाथ आणि न्यायमूर्ती संदीप मेहता यांच्या खंडपीठाने तीव्र चिंता व्यक्त केली.

औषधांच्या किमती नियंत्रित करण्यासाठी केंद्र सरकारला निर्देश देण्याच्या मागणीवरील याचिकेची सुनावणी सर्वोच्च न्यायालयात सुरू आहे. त्यावेळी न्यायालयाने, रुग्णांच्या उपचाराच्या गरजेचा गैरफायदा घेऊन अशा प्रकारे मोठी किंमत आकारली जात असेल तर त्यावर नियंत्रण कोण ठेवणार, असा सवाल उपस्थित केला. कॅन्सरच्या उपचारासाठी अनेक रुग्णांना मोठा आर्थिक भार सहन करावा लागतो. अशा परिस्थितीत औषधांच्या किमतीतील मोठी तफावत ही गंभीर बाब असल्याचे न्यायालयाच्या निरीक्षणातून स्पष्ट झाले. ‘ही सक्तीची वसुली नाही तर काय?’ (पान ४ वर)

## पावसाने पाठ फिरवली, भगवानगडाच्या विहिरीने मात्र धरली जलधारा!

### तुडुंब भरलेल्या विहिरीवर हेलिकॉप्टरमधून पुष्पवृष्टी

**कृष्णा महाराज शास्त्री, बाळासाहेब सानप यांच्या उपस्थितीत भाविकांची गर्दी**

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**पाथर्डी :** परिसरात पावसाने दडी मारल्याने तलाव, बंधारे आणि विहिरींची पाणीपातळी दिवसेंदिवस खालावत असताना श्री क्षेत्र भगवानगडाच्या पायथ्याशी डोंगराच्या कुशीत असलेली एक विहीर मात्र काठोकाठ पाण्याने भरलेली असल्याने सध्या चर्चेचा विषय ठरली आहे. विशेष म्हणजे या विहिरीतून सातत्याने पाण्याचा उपसा होत असतानाही पाणीपातळी कमी होत नसल्याने भाविकांसह परिसरातील नागरिकांमध्ये कुतूहल निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर श्री क्षेत्र भगवानगडाचे उत्तराधिकारी ह.भ.प. महंत श्रीगुरु श्री. कृष्णा महाराज शास्त्री आणि जय भगवान महासंघाचे अध्यक्ष बाळासाहेब सानप यांच्या हस्ते हेलिकॉप्टरमधून या विहिरीवर पुष्पवृष्टी करण्यात आली. हा नयनरम्य सोहळा पाहण्यासाठी हजारो भाविक उपस्थित होते.

नागलवाडी–बोधेगाव रस्त्यालगत भगवानगडाच्या शेतजमिनीला लागून असलेली ही विहीर गेल्या काही दिवसांपासून परिसराचे लक्ष वेधून घेत आहे. पावसाअभावी परिसरातील जलस्रोतांची पाणीपातळी खालावत असून खरीप पिकांवरही पावसाअभावी संकट निर्माण (पान ४ वर)

## मुलीने प्रेमविवाह केला म्हणून कुटुंबच वाळीत!

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**पोहेगाव :** मुलीने आपल्याच जातीत प्रेमविवाह केला म्हणून संपूर्ण कुटुंबाला जातीतून बहिष्कृत करण्याचा धक्कादायक प्रकार धामोरी येथे घडल्याचा आरोप आहे. नंदीवाले तिरमली जातपंचायतीने विवाह अमान्य ठरवत कुटुंबाला एक लाख रुपयांचा दंड ठोठावला. त्यापैकी कर्ज काढून पन्नास हजार रुपये भरल्यानंतर उर्वरित रक्कम देता आली नाही म्हणून कुटुंबीयांना मारहाण करण्यात आली तसेच सामाजिक बहिष्कार टाकल्याची तक्रार करण्यात आली आहे.

**जातीतच विवाह करूनही पन्नास हजारांचा दंड !**

धामोरी येथील भाऊसाहेब आनंदा अहिरे यांच्या सज्ञान मुलीने त्याच समाजातील एका तरुणाशी प्रेमविवाह केला. मात्र, जातपंचायतीने हा विवाह जातीच्या नियमाविरुद्ध असल्याचे सांगत तो अमान्य केला. त्यानंतर जातपंचायत भरवून अहिरे कुटुंबाला दंड ठोठावण्यात आला. आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची असलेल्या अहिरे कुटुंबाचा उदरनिर्वाह सुया, फण्या विकून आणि पालात राहून होत असल्याचे तक्रारीत म्हटले आहे. तरीही त्यांनी कर्ज काढून पन्नास हजार रुपये दिले.उर्वरित रक्कम न दिल्याने (पान ४ वर)





१) चिंचोली गुरव, ता. संगमनेर - वेळ : दुपारी ०३ :३० वाजता
सुमारे ४.४७ कोटी रूपयांच्या उपसा सिंचन योजनेचे भूमिपूजन

२) गणपती मंदिर,समनापूर ता.संगमनेर- वेळ : सायं. ०५:०० वाजता
सुमारे १७.२५ कोटी रुपयांच्या संगमनेर - वडगावपान (रामा ५०) ते निळवंडे (रामा ६५) ते कौठे कमळेश्वर - राष्ट्रीय महामार्ग १६० ड (जांभूळवाडी फाटा) रस्ता सुधारणा (भूमिपूजन)

३) संगमनेर शहर - वेळ : सायं. ०६:०० वाजता
संगमनेर शहरातील नगरपरिषद हद्दीतील म्हाळुंगी नदीवरील पुलाला स्व. खा. बाळासाहेब विखे पाटील साईसेतू नामफलकाचे अनावरण.

४) संगमनेर शहर - वेळ : सायं. ०६:१५ वाजता
संगमनेर, गंगामाई घाट येथील सुमारे ४० लक्ष रुपये किंमतीच्या हिंदू दशक्रिया विधी घाटाचे लोकार्पण

५) संगमनेर शहर - वेळ : सायं. ०६:३० वाजता
सुमारे ३० लक्ष रुपये किंमतीच्या श्रीराम मंदिर व हनुमान मंदिर येथील सभामंडपाचे लोकार्पण

शुभहस्ते : मा.ना.श्री. राधाकृष्ण विखे पाटील साहेब (जलसंपदा मंत्री, महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री, अहिल्यानगर)

प्रमुख उपस्थिती : मा.आमदार श्री. अमोल खताळ पाटील (संगमनेर विधानसभा)

शिवसेना - भाजपा - राष्ट्रवादी - आरपीआय महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते व ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे ही नम्र विनंती..!

# टाटांच्या विश्वासाला तडा जाऊ नये!

विशेष संपादकीय — करण नवले (संपादक)

'टाटा' हे नाव उच्चारले की भारतीयांच्या मनात केवळ एका उद्योगसमूहाची प्रतिमा उभी राहत नाही; तर विश्वास, प्रामाणिकपणा, सामाजिक बांधिलकी आणि मूल्याधिष्ठित उद्योगसंस्कृतीचे एक मोठे पर्व डोळ्यांसमोर येते. मीठापासून चहापर्यंत, मोटारींपासून विमानसेवेपर्यंत आणि आता सेमीकंडक्टरसारख्या अत्याधुनिक क्षेत्रापर्यंत विस्तारलेला टाटा समूह दीडशे वर्षांहून अधिक काळ भारतीयांच्या जीवनाचा भाग राहिला आहे. उद्योगातून पैसा कमावणे आणि त्याच वेळी समाजाला काहीतरी परत देणे, ही टाटा समूहाची ओळख राहिली आहे. त्यामुळेच टाटा सन्सचे संचालक मंडळ आणि टाटा ट्रस्ट्स यांच्यातील मतभेद उघडपणे समोर येणे ही केवळ उद्योगजगतासाठी नव्हे, तर सर्वसामान्य भारतीयांसाठीही चिंतेची बाब आहे.

सध्याच्या वादाचे तात्कालिक कारण आहे ते टाटा सन्सचे अध्यक्ष एन. चंद्रशेखरन यांच्या फेरनियुक्तीचे. फेब्रुवारी २०२७ मध्ये आपली मुदत संपल्यानंतर पद सोडण्याची इच्छा त्यांनी व्यक्त केली होती. मात्र, १७ सप्टेंबर रोजी टाटा सन्सच्या संचालक मंडळाने ४-१ अशा बहुमताने त्यांना आणखी पाच वर्षांची मुदतवाढ देण्याचा निर्णय घेतला. टाटा ट्रस्ट्सकडून या निर्णयाच्या वैधतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले, तर टाटा सन्सच्या मंडळाने आपला निर्णय अंतिम असल्याची भूमिका घेतली. विशेष म्हणजे, ट्रस्ट्सचेच दोन नामनिर्देशित संचालक या प्रश्नावर वेगवेगळ्या भूमिकेत उभे राहिले आहेत. त्यामुळे हा वाद व्यक्तींच्या मतभेदांपलीकडे जाऊन टाटा समूहाच्या प्रशासनाच्या पद्धतीवर प्रश्न निर्माण करणारा ठरतो.

सायरस मिस्त्री यांना २०१६ मध्ये टाटा सन्सच्या अध्यक्षपदावरून हटविल्यानंतर चंद्रशेखरन यांच्याकडे समूहाची धुरा आली. आता त्यांच्या नेतृत्वाच्या सातत्याचा मुद्दा पुढे करून मंडळाने फेरनियुक्तीचा निर्णय घेतला आहे. दुसरीकडे, ट्रस्ट्सच्या अधिकारांचा आणि टाटा सन्सच्या घटनेतील तरतुदींचा प्रश्न उपस्थित केला जात आहे. दोन्ही बाजू आपापली भूमिका टाटा समूहाच्या हितासाठी असल्याचे सांगत आहेत. त्यामुळे 'कोण बरोबर आणि कोण चूक?' यापेक्षा 'अधिकार कोणाचा आणि प्रक्रिया कोणती?' हा मूलभूत प्रश्न अधिक महत्त्वाचा आहे.

या संघर्षाच्या मुळाशी आणखी एक मोठा विषय आहेटाटा सन्सचे शेअर बाजारात सूचिबद्ध होणे. रिझर्व्ह बँकेने सप्टेंबर २०२२ मध्ये टाटा सन्सचा समावेश मोठ्या बिगरबँकिंग वित्तीय कंपन्यांच्या 'अप्पर लेअर'मध्ये केला. अशा संस्थांना ठरावीक कालावधीत शेअर बाजारात नोंदणी करणे बंधनकारक आहे. ही अट टाळण्यासाठी टाटा सन्सने कर्जफेड करून आपली नोंदणी रद्द करण्याचा प्रयत्न केला. मात्र, रिझर्व्ह बँकेकडून हा प्रयत्न फेटाळल्यानंतर आता 'लिस्टिंग'चा मार्ग स्वीकारण्याची वेळ टाटा सन्सवर आली आहे.

याच ठिकाणी टाटा ट्रस्ट्सची चिंता समजून घेणे आवश्यक ठरते. टाटा ट्रस्ट्स ही एकच संस्था नसून विविध धर्मादाय ट्रस्ट्सची रचना आहे. टाटा सन्समध्ये त्यांचा सुमारे ६६ टक्के हिस्सा आहे. या गुंतवणुकीतून मिळणारा लाभांश शिक्षण, आरोग्य, संशोधन आणि सामाजिक क्षेत्रातील विविध उपक्रमांसाठी वापरला जातो. म्हणजे टाटा सन्सचा आर्थिक विकास हा केवळ भागधारकांच्या संपत्तीशी संबंधित नसून समाजोपयोगी कामांशीही जोडलेला आहे. टाटा समूहाच्या यशाची हीच सर्वात वेगळी बाजू आहे.

म्हणूनच 'लिस्टिंग'चा प्रश्न केवळ शेअर बाजारातील व्यवहारापुरता मर्यादित नाही. टाटा सन्सचे सार्वजनिक कंपनीत रूपांतर झाल्यानंतर ट्रस्ट्सच्या विशेष अधिकारांवर आणि निर्णयप्रक्रियेतील त्यांच्या भूमिकेवर परिणाम होईल का, हा प्रश्न महत्त्वाचा आहे. धर्मादाय कार्यासाठी उपलब्ध होणाऱ्या निध्यावर परिणाम होणार नाही ना, याचीही काळजी घेणे आवश्यक आहे. संपत्तीचा मोठा भाग समाजासाठी वापरण्याची टाटा परंपरा हीच या समूहाच्या विश्वासार्हतेची मोठी ताकद आहे.

दुसरीकडे, टाटा सन्समध्ये सुमारे १८ टक्के हिस्सा असलेल्या शापूरजी पालोनजी समूहाची 'लिस्टिंग'बाबतची भूमिका वेगळी आहे. त्यांच्या गुंतवणुकीचे मूल्य बाजारातून मोकळे होणे हा त्यामागील महत्त्वाचा मुद्दा आहे. नोएल टाटा हे टाटा ट्रस्ट्सचे अध्यक्ष असून त्यांचे शापूरजी पालोनजी कुटुंबाशी कौटुंबिक नाते आहे. तरीही या विषयावर दोन्ही बाजूंच्या भूमिका भिन्न दिसतात. यावरून हा वाद केवळ कौटुंबिक किंवा व्यक्तीगत संघर्ष म्हणून पाहणे योग्य ठरणार नाही. त्यामागे मालकी, नियंत्रण, प्रशासन, गुंतवणुकीचे मूल्य आणि सामाजिक उद्देश असे अनेक पैलू आहेत.

या सगळ्या घडामोडींमध्ये सर्वांत मोठा धोका आहे तो टाटा समूहाच्या विश्वासाला. सायरस मिस्त्री यांच्या प्रकरणानंतर निर्माण झालेल्या संघर्षाच्या काळात समूहातील काही सूचिबद्ध कंपन्यांच्या बाजारमूल्यावर परिणाम झाला होता. आता पुन्हा सार्वजनिक संघर्ष वाढला, तर त्याचा परिणाम गुंतवणूकदारांच्या विश्वासावर होऊ शकतो. मोठ्या उद्योगसमूहाच्या निर्णयांवर भागीदार, कर्मचारी, ग्राहक आणि बाजारपेठ यांचे लक्ष असते. त्यामुळे प्रत्येक सार्वजनिक आरोप-प्रत्यारोपाची किंमत मोठी असते.

कायदेशीर मार्ग हा प्रत्येक पक्षाचा अधिकार आहे. न्यायालयीन प्रक्रियेतून अधिकार आणि वैधतेचे प्रश्न सुटू शकतात; परंतु न्यायालयाचा निकाल संस्थात्मक दुरावा संपवेलच असे नाही. म्हणूनच संवादाचा मार्ग अधिक परिणामकारक ठरू शकतो. 'लिस्टिंग' अपरिहार्य असेल, तर ट्रस्ट्सच्या धर्मादाय उद्देशाला आणि त्यातून होणाऱ्या सामाजिक कामांना संरक्षण देणारी स्पष्ट चौकट उभी करता येईल. अध्यक्षांच्या उत्तराधिकारासाठी पारदर्शक आणि सर्वमान्य प्रक्रिया निश्चित करता येईल. शापूरजी पालोनजी समूहाच्या आर्थिक हिताचाही स्वतंत्रपणे विचार करता येईल.

टाटा समूहासमोर आज व्यक्तींचा प्रश्न नाही; तर परंपरा आणि भविष्यातील संस्थात्मक रचना यांच्यात समतोल साधण्याचे आव्हान आहे. उद्योग कितीही मोठा झाला तरी त्याची खरी ताकद केवळ बाजारमूल्यात नसते. ती विश्वासात असते. टाटा समूहाने हा विश्वास दीडशे वर्षांत कमावला आहे. तो एका संचालक मंडळाच्या निर्णयाने किंवा एका न्यायालयीन लढाईने निर्माण झालेला नाही.'टाटा' हे भारतीयांच्या मनात रुजलेले विश्वासाचे नाव आहे. त्या विश्वासाला तडा जाणार नाही, याची जबाबदारी सर्व संबंधितांवर आहे. मतभेद असतील तर ते असू द्यावेत; पण संवादाची दारे बंद होऊ नयेत. कारण शेवटी व्यक्ती येतात आणि जातात, पदे बदलतात, भागधारक बदलतात; मात्र संस्था टिकली पाहिजे. 'संस्थेपेक्षा कोणीही मोठे नाही', हा टाटा समूहाच्या वारशाचा गाभा आहे. आजचा वाद सोडविताना त्याच वारशाची आठवण सर्व संबंधितांनी ठेवली, तर टाटांच्या विश्वासाला तडा जाण्याऐवजी तो आणखी मजबूत होईल.

# गजानन सातभाई यांचा राहुरी नगर परिषदेच्या उपनगराध्यक्ष पदाचा राजीनामा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**राहुरी:** राहुरी नगरपरिषदेचे उपनगराध्यक्ष गजानन सातभाई यांनी आपल्या पदाचा अचानक राजीनामा नगरपरिषद् प्रशासनाकडे सादर केल्यामुळे सातभाई यांच्या राजीनाम्यामुळे राहुरीच्या राजकीय वर्तुळात विविध चर्चाना उधाण आले आहे. सातभाई यांच्या राजीनामामुळे वेगवेगळ्या चर्चेला उधाण आले असून या निवडणुकीदरम्यान केलेली प्रतिज्ञा याबाबत तर्कवितर्क सुरू झाले असले, तरी सातभाई यांनी मात्र आपला सहा महिन्यांचा कार्यकाळ पूर्ण केल्यामुळे राजीनामा दिल्याची चर्चा होत आहे. भाऊसाहेब मोरे यांची लोकनियुक्त नगराध्यक्षपदी निवड झाली होती. त्यानंतर उपनगराध्यक्ष पदासाठी अनेकांची नावे समोर आली होती मात्र उपनगराध्यक्षपदाच्या सुरुवातीच्या सहा महिन्यांच्या कालावधीसाठी गजानन सातभाई यांची निवड झाली होती. प्राजक्त तनपुरे यांची नुकतीच पहिल्या नगर विधान परिषदेवर आमदार म्हणून निवड झाली. त्यानंतर सातभाई यांनी सुरुवातीला सहा महिन्यांसाठी उपनगराध्यक्षपद मागितले होते. मात्र, जोपर्यंत प्राजक्त तनपुरे आमदार होत नाहीत, तोपर्यंत मी उपनगराध्यक्षपदाच्या खुर्चीवर बसणार नाही, अशी प्रतिज्ञा केली होती.

> आता माझे सहा महिने पूर्ण झाले आहेत आणि प्राजक्त दादाही आमदार झाले आहेत. या सहा महिन्यांच्या कार्यकाळात मी प्रामाणिकपणे काम करून नागरिकांच्या विश्वासास पात्र राहण्याचा प्रयत्न केला. पदावरून दूर झाल्यानंतरही नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी सदैव तत्पर राहणार आहे.
>
> **गजानन सातभाई**
> **उपनगराध्यक्ष, राहुरी नगरपालिका.**

उपनगराध्यक्षपदाची जबाबदारी स्वीकारून सुमारे महिना-दोन महिने कारभार केला. मात्र, आपला निर्धारित सहा महिन्यांचा कार्यकाळ पूर्ण झाल्यानंतर त्यांनी मुख्याधिकाऱ्यांकडे राजीनामा सादर केला आहे. सातभाई यांच्या राजीनाम्यामुळे 'राजकीय शब्द पाळत खुर्ची सोडली की आगामी
राजकीय समीकरणांसाठी नवी खेळी ?' अशी चर्चा आता रंगू लागली आहे. त्यांच्यावर राजीनाम्यासाठी कोणाचा आग्रह होता का, की त्यांनी स्वेच्छेने निर्णय घेतला, याबाबतही शहराच्या राजकीय वर्तुळात चर्चा सुरू आहे. मात्र, या चर्चावर पडदा टाकत सातभाई यांनी आपला निर्णय हा ठरल्याप्रमाणे सहा महिन्यांचा कालावधी पूर्ण झाल्यामुळे घेतल्याचे स्पष्ट केले आहे.

# शेतात काम करताना बिबट्याचा हल्ला, महिला थोडक्यात बचावली

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**टाकळीभान :** सैनिक प्लॉट रोड परिसरातील शेतात पिकाला रासायनिक खत टाकत असताना मजूर महिलेवर बिबट्याने अचानक हल्ला केला. या हल्ल्यात संगीता अशोक गांगुर्डे (वय ४०) यांच्या पायाला बिबट्याचा पंजा लागल्याने त्या जखमी झाल्या. प्रसंगावधान राखून दाम्पत्याने आरडाओरड केल्याने बिबट्याच्या तावडीतून त्यांची सुटका झाली.

टाकळीभान येथील विठ्ठल मंदिराचे पुरोहित राजेंद्र देवळलाकर यांच्या शेतात संगीता गांगुर्डे व त्यांचे पती पिकाला खत टाकण्याचे काम करीत होते. त्यावेळी शिवारात दबा धरून बसलेल्या बिबट्याने अचानक महिलेवर झडप घातली. या हल्ल्यात त्या जखमी झाल्या. अचानक घडलेल्या घटनेमुळे त्या भयभीत झाल्याने त्यांचा रक्तदाबही वाढला. त्यांना उपचारासाठी दवाखान्यात दाखल करण्यात आले.

घटनेची माहिती मिळताच वन विभागाचे कर्मचारी आयुष्यमान बढे, विलास डगळे, राहुल कानडे यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. जखमी महिलेवर प्रथमोपचार करण्यात आले.दरम्यान, परिसरात बिबट्याचा वावर वाढल्याने शेतकरी व शेतमजुरांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. वन विभागाने तातडीने पिंजरा लावून बिबट्याला जेरबंद करावे, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

# डॉल्बीला फाटा, पारंपरिक वाद्यांचा ठेका

## 'क्रांती युवक मंडळा'कडून ३४ वर्षांची अखंड परंपरा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी :** येथील क्रांती युवक मंडळाचा गणेशोत्सव हा मागील ३४ वर्षांपासून एका आदर्श परंपरेचे आणि सांस्कृतिक वारशाचे जतन करत आला आहे. श्री साईबाबा संस्थानचे माजी विश्वस्त सचिन भागवत तांबे यांच्या दूरदृष्टीतून सुरू झालेला हा गणेशोत्सव आज शिर्डीसह संपूर्ण परिसरात समाजप्रबोधनाचा एक उत्तम आदर्श ठरला आहे. काळाच्या ओघात गणेशोत्सवात अनेक बदल झाले असले, तरी क्रांती युवक मंडळाने आपली ३४ वर्षांची अखंड परंपरा अत्यंत उत्साहात कायम राखली आहे. सध्याच्या काळात गणेशोत्सवातील मिरवणुकांमध्ये डॉल्बी डिजे आणि कर्णकर्कश आवाजाचा बोलबाला असतो, परंतु या मंडळाने मिरवणुकीत डॉल्बी डिजेला पूर्णपणे फाटा दिला आहे. त्याऐवजी महाराष्ट्राच्या पारंपरिक संबळ वाद्याचा वापर करून त्यांनी एक आगळावेगळा संदेश दिला असून सांस्कृतिक जपणूकीचा ठेवा जोपासला आहे. या मंडळाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे बाप्पाच्या मिरवणुकीत बाहेरून कोणतीही व्यावसायिक पथके न बोलावता मंडळाच्या तरुणांनी स्वतः ढोल-ताशा पथक तयार करून ते उत्साहात वाजवले जाते.
या सर्वांमध्ये सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे या मंडळातील सर्व तरुण पूर्णपणे निर्व्यसनी आहेत. व्यसनमुक्त युवकांच्या संघटित शक्तीच्या जोरावर ही ३४ वर्षांची अखंड परंपरा अविरत सुरू आहे. श्री साईबाबा संस्थानचे माजी विश्वस्त सचिनराव तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि दूरदृष्टीने सुरू असलेला हा गणेशोत्सव शिर्डीच्या सांस्कृतिक वैभवात भर घालत असून, युवकांना एक सकारात्मक दिशा देणारा ठरत आहे.

**व्यसनमुक्त आदर्श आणि सांस्कृतिक ठेवा –**

या संपूर्ण मंडळाचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे या मंडळातील सर्व तरुण पूर्णपणे निर्व्यसनी आहेत. व्यसनमुक्त युवकांच्या जोरावर ही परंपरा मागील ३४ वर्षांपासून अविरत सुरू आहे. ढोल-ताशांचा गजर, पारंपरिक वाद्यांचा नाद, सांस्कृतिक जपणूकीचा ठेवा आणि तरुणांचा उत्साह यामुळे शिर्डीतील क्रांती युवक मंडळाचा गणेशोत्सव हा संपूर्ण महाराष्ट्रासाठी एक दीपस्तंभ ठरत आहे.

**सचिनराव तांबे**
**माजी विश्वस्त श्री साईबाबा संस्थान शिर्डी**

# आई तुळजाभवानीची पालखी सीमोल्लंघनासाठी सज्ज

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**राहुरी :** महाराष्ट्राचे आराध्य दैवत आई तुळजाभवानीच्या पालखी सोहळ्याची तयारी पूर्ण झाली असून पालखी सीमोल्लंघनासाठी सज्ज झाली आहे. राहुरी शहरातील जंगम गल्ली येथील तुळजाभवानी मंदिरात पालखी भाविकांच्या दर्शनासाठी ठेवण्यात आली आहे. भाविकांनी दर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

श्रावणी पोळ्याच्या दुसऱ्या दिवशी पालखीचा दांडा बुऱ्हाणनगर येथून राहुरीत आणण्यात आला. त्यानंतर राहुरीतील मानकरी पवार व रणसिंग कुटुंबीयांच्या वतीने पारंपरिक पद्धतीने पालखीची दुरुस्ती, सजावट व रंगकाम करण्यात आले. बुऱ्हाणनगर येथील भगत परिवाराने पालखीची बांधणी पूर्ण केली. दुर्गाष्टमीच्या मुहूर्तावर पालखी मंदिरात दर्शनासाठी ठेवण्यात आली.शनिवार, दि. २६ सप्टेंबर रोजी रात्री पालखीचा छबीना होणार आहे. रविवारी, दि. २७ सप्टेंबर रोजी मानकरी सुरेश धोत्रे व अण्णासाहेब शेटे कुटुंबीयांच्या वतीने पालखीची साडी-चोळीने ओटी भरल्यानंतर तांबोळी कुटुंबीयांच्या वतीने पानाचा विडा देण्यात येईल. त्यानंतर पालखीची राहुरी शहरातून मिरवणूक काढून देसवंडीमार्गे तुळजापूरच्या सीमोल्लंघन सोहळ्यासाठी प्रस्थान होईल. पालखी सजावटीच्या कार्यात भगत परिवारासह सुतार, लोहार, रंगकाम करणारे व तिळवण तेली समाजाचे पदाधिकारी सहभागी झाले.

# संशोधनातून नवकल्पनांचा 'अविष्कार' : डॉ. मोहसीन तांबोळी



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**लोणी :** बदलत्या तंत्रज्ञानाच्या युगात विद्यार्थ्यांनी केवळ पुस्तकी ज्ञानावर अवलंबून न राहता प्रश्न विचारण्याची, समस्या ओळखण्याची आणि त्यावर नाविन्यपूर्ण उपाय शोधण्याची वृत्ती विकसित करणे आवश्यक आहे. संशोधनातूनच नव्या संधींची दारे खुली होतात आणि नवकल्पनांना दिशा मिळते, असे प्रतिपादन पायरेन्स आय.बी.एम.ए., लोणीचे संचालक डॉ. मोहसीन तांबोळी यांनी केले.लोणी येथे विद्यार्थ्यांसाठी आयोजित 'अविष्कार' संशोधन कार्यशाळेत मार्गदर्शन करताना ते बोलत होते. विद्यार्थ्यांमध्ये संशोधनाची आवड निर्माण करणे, संशोधन प्रक्रियेची ओळख करून देणे आणि विविध विषयांकडे चिकित्सक, तार्किक व सर्जनशील दृष्टिकोनातून पाहण्याची क्षमता विकसित करणे हा कार्यशाळेचा प्रमुख उद्देश होता.यावेळी फार्मसी महाविद्यालयांचे डॉ.अभिजीत शिंदे यांनी संशोधन विषयाची निवड, संशोधन समस्या निश्चित करणे, उद्दिष्टे ठरविणे, माहिती संकलन, संदर्भ साहित्याचा वापर, संशोधन पद्धती, माहितीचे विश्लेषण, निष्कर्ष मांडणी तसेच संशोधन प्रकल्पाचे प्रभावी सादरीकरण याबाबत मार्गदर्शन केले.विष्कार'च्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी दैनंदिन जीवनातील तसेच समाजासमोरील विविध समस्या ओळखून त्यावर संशोधनाधारित व नाविन्यपूर्ण उपाय सुचवावेत, यावर विशेष भर देण्यात आला.

# व्याख्याते प्रा.डॉ. विनोद बाबर यांचे गुरुवारी नेवासा येथे व्याख्यान

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**नेवासा :** शहरात धार्मिक व सामाजिक कार्यात नेहमी अग्रेसर असणारे जनसेवक स्वर्गीय राजेंद्र मापारी व नगरसेविका स्वर्गीय सौ. सीमाताई राजेंद्र मापारी यांच्या प्रथम स्मृती दिनाच्या निमित्ताने महाराष्ट्रातील प्रसिद्ध व्याख्याते प्रा.डॉ. विनोद बाबर यांच्या व्याख्यान कार्यक्रमाचे आयोजन गुरुवार दि.२४ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता येथील श्री मोहिनीराज मंगल कार्यालयात आयोजित करण्यात आले आहे.

मापारी कुटुंबियाच्या वतीने व्याख्यानाचे व श्रद्धांजली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. नेवासा शहरात मागील वर्षी सामाजिक,धार्मिक कार्यात कायम अग्रेसर असणारे गोरगरिबांचे कैवारी जनसेवक राजेंद्र मापारी व त्यांच्या पत्नी सौ. सिमाताई राजेंद्र मापारी यांचे दुःखद निधन झाले होते.सदरची घटना एखाद्या चित्रपटा सारखी घडली होती.मापारी दाम्पत्याच्या जाण्याने संपूर्ण नेवासा तालुक्यात शोककळा पसरली होती.

या दाम्पत्याला जाऊन आज एक वर्ष पूर्ण होत असल्याने त्यांच्या मुलांनी आपल्या आईवडीलांच्या प्रथम स्मृती दिनाच्या निमित्ताने या व्याख्यानाचे आयोजन केले आहे. कार्यक्रमाचा जास्तीत जास्त श्रोत्यांनी व नेवासा तालुक्यातील नागरीकांनी लाभ घ्यावा असे आवाहन मापारी कुटुंबियांच्या वतीने करण्यात आले आहे.

# पोलीस उपअधीक्षक जयदत्त भवर यांची राहुरीच्या तुळजाभवानी पालखी मंदिरास भेट

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**राहुरी :** श्रीरामपूर विभागाचे कर्तव्यदक्ष पोलीस उपअधीक्षक जयदत्त भवर यांनीं संपूर्ण महाराष्ट्राची कुलस्वामिनी राहुरीची माहेरवाशीन आई तुळजाभवानी पालखी मंदिर पालखीचे दर्शन घेऊन विधिवत पूजा करून पालखीचे महात्म्य समजून घेतले यावेळी राहुरी नगरपालिकेचे नगरसेवक तथा डॉ.बाबुराव बापूजी सहकारी शिक्षण संस्थेचे सचिव युवा नेतृत्व हर्ष अरुण तनपुरे यांची प्रमुख उपस्थिती होती तसेच सहाय्यक पोलीस निरीक्षक महेशजी गोंडला पत्रकार सुनील भुजाडी आणि राहुरीचे नगरपरिषदेचे माजी नगराध्यक्ष आसाराम शेजूळ यांची प्रमुख उपस्थिती होती.

याप्रसंगी तेली समाज्याच्या वतीने मान्यवरांचा सन्मान युवानेते हर्षदादा तनपुरे आणि माजी नगराध्यक्ष आसाराम शेजुळ यांच्या हस्ते करण्यात आला याप्रसंगी तेली समाज तालुकाध्यक्ष दत्तात्रय सोनवणे व्यापारी बाळासाहेब शेजुळ ज्येष्ठ तेली समाजाचे सुरेश धोत्रे, कैलास शेजुळ, नागपाल सारिजचे राजेश नागपाल दर्शन पटेल,सोहम सोनवणे,पोलीस कर्मचारी नितीन शिरसाठ

नदीम शेख, अंकुश जाधव आदी मान्यवर उपस्थित होते याप्रसंगी मान्यवरांचे आभार संदीप सोनवणे यांनी मानले.

# कोविड काळातील डिजिटल क्रांतीतून जागतिक विक्रम

## ॲड. रमेश बनसोडे यांची प्रेरणादायी झेप

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी :** सन २०२० मध्ये कोविड लॉकडाऊनमुळे संपूर्ण जग भीती आणि अनिश्चिततेच्या सावटाखाली घरात बंदिस्त झाले होते. अनेकांसाठी हा काळ नैराश्याचा ठरला, मात्र या संकटाचे संधीत रुपांतर करत संगमनेर जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालयातील तरुण वकील ॲड. रमेश देवराम बनसोडे यांनी डिजिटल इंडियाच्या ताकदीवर एक ऐतिहासिक कामगिरी करून दाखवली आहे. लॉकडाऊनच्या दोन महिन्यांच्या काळात घरातूनच दररोज तब्बल दहा तास अथक अभ्यास करत त्यांनी तब्बल सत्तर राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय कोर्सेस यशस्वीपणे पूर्ण केले. त्यांच्या या अद्वितीय आणि सातत्यपूर्ण प्रयत्नांची दखल जागतिक स्तरावर घेतली गेली असून त्यांच्या नावावर गिनीज वर्ल्ड रेकॉर्डसह लंडन बुक ऑफ रेकॉर्ड आणि वर्ल्ड टॅलेंट नेटवर्क आयकॉन अवॉर्ड्स सारख्या प्रतिष्ठित जागतिक विक्रमांची नोंद झाली आहे.मूळचे पारेगाव बुद्रुक, तालुका संगमनेर येथील असलेले ॲड. बनसोडे यांचा प्रवास अत्यंत संघर्षमय राहिला आहे. त्यांचे शालेय शिक्षण नंदुरबार जिल्ह्यातील शहादा येथील पुरुषोत्तमनगर येथे झाले. त्यांचे वडील पी. के. अण्णा पाटील यांनी सहकारी साखर कारखान्यात हमालीचे कष्टाचे काम करून कुटुंबाचा उदरनिर्वाह केला.

# परिवर्तिनी एकादशीला गोणेगाव चौफुला येथे कीर्तन सोहळ्याला उत्स्फूर्त प्रतिसाद

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**नेवासा :** तालुक्यातील गोणेगाव चौफुला येथील रामकृष्ण आश्रमात एकनाथी भागवत पारायण सोहळ्यानिमित्त भाद्रपद शुद्ध परिवर्तिनी एकादशी तसेच वैकुंठवासी हभप गंगाधर महाराज जंगले यांच्या १९व्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित कीर्तन सोहळ्याला भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. आखेगाव येथील सद्गुरू जोग महाराज सेवा संस्थानचे महंत हभप श्रीराम महाराज झिंजुर्के यांनी कीर्तनसेवा केली.'कर्तव्य भावनेतून वारी आणि परमार्थ करण्याचा प्रयत्न करा,' असे आवाहन श्रीराम महाराज झिंजुर्के यांनी केले. त्यांनी संत तुकाराम महाराजांच्या 'देवा हे माझी मिराशी, ठाव तुझ्या पायांपाशी' या अभंगाचे निरूपण करून उपस्थित भाविकांना मंत्रमुग्ध केले.यावेळी वैकुंठवासी हभप गंगाधर महाराज जंगले यांच्या प्रतिमेचे संत मंडळींच्या हस्ते पूजन करण्यात आले. रामकृष्ण आश्रमाचे प्रमुख भगवान महाराज जंगले शास्त्री यांच्या हस्ते संतपूजन झाले. रामकृष्ण आश्रमातून बालकांना वारकरी संप्रदायाचे शिक्षण दिले जात असून, गंगाधर महाराज जंगले यांनी परमार्थाची परंपरा जपली. त्यांचा हा वारसा भगवान महाराज जंगले शास्त्री पुढे नेत असल्याचे गौरवोद्गार श्रीराम महाराज यांनी काढले. यावेळी परिसरातील संत-महंत, विश्वस्त मंडळाचे सदस्य, सेवेकरी व पंचक्रोशीतील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पसायदानाने कीर्तन सोहळ्याची सांगता झाली. बाबासाहेब गंगाधर जंगले यांच्या वतीने फराळ महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. संयोजक भगवान महाराज जंगले शास्त्री यांनी आभार मानले.

# शालेय विभागीय वुशू स्पर्धेसाठी त्रिमूर्तीच्या सहा खेळाडूंची निवड

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**नेवासा :** क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा कार्यालय अहिल्यानगर व ल. ना. होशिंग माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, जामखेड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित शालेय जिल्हास्तरीय वुशू स्पर्धेसाठी त्रिमूर्ती शैक्षणिक संकुलातील सहा खेळाडूंची निवड करण्यात आली आहे

जामखेड येथे दि. १६ सप्टेंबर रोजी सदरच्या स्पर्धा पार पडल्या.या स्पर्धेत त्रिमूर्ती पावन प्रतिष्ठान संचलित, श्री दादासाहेब हरिभाऊ घाडगे पाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या १८ खेळाडूंनी सहभाग घेतला होता.यापैकी प्रथम क्रमांक मिळून सहा खेळाडूंची विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. तर चार खेळाडूंनी द्वितीय क्रमांक संपादित केला.

विजयी खेळाडू खालील प्रमाणे ;प्रथम क्रमांक विजेते खेळाडू रुद्र बाबर, मोरे रुद्र, जगताप पृथ्वीराज, आबा वहरे, माळी शांभवी, टेंभुर्णे सानिया द्वितीय क्रमांक विजेते खेळाडू ; गावडे विराज, गवळी पृथ्वीराज, नांदे विराज, मुठे अथर्व विजयी खेळाडूंना प्रशिक्षक महादेव काकडे यांचे प्रशिक्षण लाभत आहे.तसेच क्रीडा प्रशिक्षक अभिजीत दळवी, छबुराव काळे, गणेश शिंदे, अशोक पानखडे, साहेबराव दाने, संदीप वाघमारे, विजू गायके, शैलेश दाणे, विकास म्हस्के,विकास गर्जे,चिंतामण खोडे, प्रियंका रासणे यांचे मार्गदर्शन लाभत आहे.

यशस्वी विद्यार्थ्यांचे त्रिमूर्ती प्रतिष्ठानच्या अध्यक्षा सुमतीताई घाडगे, उपाध्यक्ष स्नेहल घाडगे, सहसचिव डॉ. श्रुती आमले, विश्वस्त चेतन चव्हाण, सीईओ गौरव आमले, प्राचार्य सोपानराव काळे, समन्वयक दत्तात्रय वांढेकर, निवासी प्राचार्य एकनाथ कापसे, क्रीडा विभाग प्रमुख संभाजी निकाळजे, विभाग प्रमुख प्रा.अशोकराव गाडे, जितेंद्र पाटील, बाळासाहेब साबळे, नवनाथ भस्मे यांनी अभिनंदन केले आहे.

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

द • ख • ल

## भिल्ल समाजाला शासकीय योजनांचा लाभ द्या, निवेदन



**शिर्डी** : राहाता शहर आणि तालुक्यातील भिल्ल समाजाला उदरनिर्वाहासाठी शेतजमीन, तसेच रेशन कार्ड, आधार कार्ड आणि दारिद्र्यरेषेखालील दाखला मिळण्याबाबत प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, राजूर ता. अकोले यांच्याकडे निवेदन देण्यात आले आहे. दिनांक २१ सप्टेंबर २०२६ रोजी दिलेल्या या निवेदनात म्हटले आहे की, राहाता शहरामध्ये भिल्ल समाजातील बहुसंख्य आदिवासी समाज वास्तव्य करत असून वर्षानुवर्षे हा समाज मागास अवस्थेत राहत आहे.

समाजातील अनेक कुटुंबांकडे उदरनिर्वाहासाठी शेतजमीन, तसेच आधार कार्ड, रेशन कार्ड आणि दारिद्र्यरेषेचे कार्ड यांसारख्या मूलभूत सुविधांचा अभाव असून ते या लाभांपासून वंचित आहेत. तसेच ' ठक्कर बापा योजना' या योजनेचा लाभ राहाता शहरातील भिल्ल समाजास प्रामुख्याने मिळवून द्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे. या निवेदनावर सुकदेव दशरथ गायकवाड, रोहित रमेश मोरे, विकी राजेंद्र पवार, लालु भानुदास पवार, संदिप दिलीप बोर्डे, सोमनाथ सुकदेव बर्डे, बाबासाहेब भानुदास पवार यांच्यासह आदी समाजबांधवांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## संपूर्ण अहिल्यानगर जिल्हा 'दुष्काळग्रस्त' जाहीर करावा



**राहुरी** : यावर्षी कमी झालेल्या पावसामुळे अहिल्यानगर जिल्ह्यावर दुष्काळाचे गडद सावट पसरले आहे. उभी पिके पाण्याअभावी करपून गेली असून, खरीप हंगाम पूर्णपणे वाया गेला आहे. या गंभीर परिस्थितीची तातडीने दखल घेऊन अहिल्यानगर जिल्हा 'दुष्काळग्रस्त' म्हणून जाहीर करण्यात यावा, अशी मागणी शिवसेना (शिंदे गट) नेते रावसाहेब खेवरे यांनी राज्य शासनाकडे केली आहे. त्यांनी पत्रात म्हटले की जिल्ह्यात कमी पाऊस झाल्याने तसेच पेरणीनंतर पावसाने तब्बल महिना-दीड महिना ओढ दिल्यामुळे बाजरी, मूग, उडीद, कपाशी आणि सोयाबीन पिके जळाली आहेत. बळीराजा आर्थिक संकटात सापडला आहे.

चाऱ्याअभावी पशुपालकांवर आपली पाळीव जनावरे छावणीत नेण्याची किंवा विक्री करण्याची वेळ आली आहे. त्यामुळे अहिल्यानगर जिल्ह्यातील सर्व तालुके तात्काळ दुष्काळग्रस्त घोषित करून संपूर्ण महसुली सवलती लागू करण्यात याव्यात, अशी मागणी खेवरे यांनी केली आहे.सरसकट सर्व शेतकऱ्यांना प्रतिहेक्टरी ५० हजार रुपयांची तातडीची आर्थिक मदत द्यावी, टंचाईग्रस्त गावात टँकर सुरू करावे, प्रत्येक तालुक्यात मध्यवर्ती ठिकाणी चारा छावण्या किंवा चारा डेपो त्वरित सुरू करावेत, अशा अनेक मागणी त्यांनी केले आहेत.

## घुमनदेव येथील विविध विकासकामे मार्गी लागणार

**माळवाडगांव** : श्रीरामपूर तालुक्यातील घुमनदेव येथील विविध विकासकामे मार्गी लागणार असल्याचे भैरव कांगुने यांच्या मार्गदर्शनाखाली गेलेल्या शिष्टमंडळास जनसेवा संपर्क कार्यालयात पालकमंत्री ना.विखेपाटील यांनी सांगितले. घुमनदेव येथील विविध विकास कामे शिष्टमंडळ प्रतिनिधी भैरव कांगुने यांनी या अगोदर सुचविली होती. लोणी येथील जनसंपर्क कार्यालयात जनता दरबार प्रसंगी पालकमंत्री ना.विखे पाटील विखे पाटील यांची भेट घेऊन सुचविलेल्या विकास कामासह , पाणी टंचाई मुळे शेतीसाठी व जनावरांचा पिण्याचा पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी परिसरातील तलाव या चालू रोटेशनमधून भरून देण्याची मागणी केली. संबंधित अधिकाऱ्यांना घुमनदेव परिसरातील तलाव भरून देण्याच्या सुचेना विखे यांनी जनता दरबारात केल्या. कांगुने यांनी वारंवार मंत्रालय या ठिकाणी जाऊन रस्ते वीज, शैक्षणिक विकासकामाचा ना.विखे पाटील यांच्याकडे पाठपुरावा केला होता.

सदर कामाचे उद्घाटन ना.विखे पाटील यांच्या शुभहस्ते काही दिवसात होणार आहे. याप्रसंगी भाजपाचे जिल्हा अध्यक्ष नितीन दिनकर, भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष दीपक पटारे, तालुकाध्यक्ष बाबासाहेब चिडे,शरद नवले, गिरिधर आसने, डॉ शंकरराव मुठे, प्रताप पटारे, विजय दवंगे, अभिषेक खंडागळे, आशिक पोपटिया, सर्जेराव मुंडे आधी कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थित होते.

# महसूल पथक, व राहुरी पोलीस अॅक्शनमोडवर

## चिंचोली येथे मोठी कारवाई वाळू तस्करांचे दनानले धाबे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**राहुरी** : राहुरी तालुक्यातील चिंचोली येथे महसूल व पोलीस पथकाने संयुक्त कारवाई करीत वाळू तस्करांचे साहित्य जप्त करुन नष्ट करण्यात आले. महसूल पथकाने वारंवार कारवाई करुन माघारी परतताच पुन्हा वाळूतस्करी जोमाने सुरुच राहात होती. या संदर्भात चिंचोलीच्या सरपंच शोभाताई लाटे यांनी प्रशासनाकडे सातत्याने हा प्रश्न लावून धरल्याने आता वाळू तस्करांचे धाबे दणाणले आहेत.

अनाधिकृत वाळू वाहतूकीला कायमचा पायबंद घालण्यासाठी सरपंचांनी कठोर भूमिका घेतली असल्याने प्रशासनही अॅक्शन मोडवर आले. सोमवार दि. २१ सप्टेंबर २०२६ रोजी तालुक्यातील चिंचोली येथे प्रवरा नदी पात्रात गट नंबर ६ मध्ये अनधिकृत गौण खनिज उत्खननात वापर करण्यात येणारे जवळपास ८ चप्पू जप्त करून नष्ट करण्यात आले.

सदरच्या कारवाईत चिंचोली गावचे ग्रामस्थ सुरेश लाटे व गौण खनिज पथकाचे मंडळ अधिकारी विश्वास आढाव, अभिजीत खटावकर, ग्राम महसूल अधिकारी राहुल कराड, बाबासाहेब कराळे, प्रसाद शेटे, महसूल सेवक विजय नरोटे, कुणाल तमनर, पोलीस रमेश दरेकर, गौतम खळेकर, पाटबंधारे विभागाचे निहाल पटेल यांनी सहभाग नोंदविला.

श्रीरामपूरचे उप विभागीय अधिकारी किरण सावंत पाटील व नव्याने रुजू झालेले उप विभागीय अधिकारी शिर्के, तहसीलदार डॉ. अमित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या कारवाईत चिंचोलीतील ८ चप्पू पोकलेनच्या साह्याने उध्वस्त करण्यात आल्याने वाळू तस्करांचे धाबे दणाणले असून वाळू तस्करांमध्ये प्रशासनाची दहशत निर्माण झाल्याचे चित्र दिसून येत आहे.

## द्रोणाच्या विद्यार्थ्यांची कुस्ती स्पर्धेत जिल्हा पातळीसाठी निवड



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी** : अशोकराव दामोधर दंडवते पाटील ग्रामीण शैक्षणिक प्रतिष्ठानच्या द्रोणा अकॅडमी व कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी डी.एस.ओ. रेसलिंग स्पर्धेत अतिशय नेत्रदीपक कामगिरी केली आहे. विविध वजन गटांमध्ये झालेल्या या अतिशय चुरशीच्या सामन्यांमध्ये द्रोणा कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी चमकदार कामगिरी करत पदके आणि पारितोषिके पटकावली आहेत.

विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल शैक्षणिक वर्तुळातून आणि सर्वच स्तरातून त्यांचे कौतुक होत आहे. स्पर्धेत विद्यार्थ्यांनी विविध वजन गटांत सुवर्ण, रौप्य आणि कांस्य पदके पटकावली आहेत. यामध्ये प्रथम क्रमांक मिळवत गोल्ड मेडल पटकावणाऱ्या विजयी स्पर्धकांमध्ये असंद इनामदार, शहा पठाण आणि साद शेख यांचा समावेश आहे.

तसेच द्वितीय क्रमांक मिळवून सिल्वर मेडल पटकावणारे ओमकार वाणी, मंथन गांगुर्डे आणि ओंकार सिनारे यांनीही उत्तम कामगिरी केली. याशिवाय तृतीय क्रमांक पटकावत फिजान शेख याने ब्रॉंझ मेडल आपल्या नावावर केले.

## सहकारातून सभासद हितासोबत सामाजिक बांधिलकी जपली जाते : शालिनीताई विखे



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**लोणी** : सहकाराच्या माध्यमातून उभ्या राहिलेल्या संस्था केवळ आर्थिक व्यवहारापुरत्या मर्यादित न राहता सभासदांच्या हितासोबतच सामाजिक बांधिलकी जपण्याचे महत्त्वपूर्ण काम करीत आहेत. सर्वसामान्यांच्या जीवनात या संस्था आधारवड ठरत असून, प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या तांत्रिक व अतांत्रिक सेवकांची सहकारी पतसंस्था ही खऱ्या अर्थाने सभासद हित जपणारी संस्था असल्याचे प्रतिपादन जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा सौ. शालिनीताई विखे पाटील यांनी केले.

प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या तांत्रिक व अतांत्रिक सेवकांच्या सहकारी पतसंस्थेच्या ३३ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत त्या बोलत होत्या. यावेळी संस्थेचे सहसचिव भारत घोगरे, अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय गुल्हाने, तंत्रनिकेतनचे प्राचार्य डॉ. व्ही. आर. राठी, फार्मसी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रवींद्र जाधव, आयटीआयचे प्राचार्य अर्जुन आहेर, पतसंस्थेचे चेअरमन साहेबराव आहेर,व्हा. चेअरमन सूर्यभान जाधव, संचालक नितीन साबळे, किशोर गुळवे, संचालिका जयश्री थोरात, संदीप बुधे, मंदाकिनी ढवळे, सचिव रोहीत म्हस्के, वरिष्ठ लिपिक दत्तात्रय सांबारे, वर्षा कोरडे यांच्यासह सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सौ. विखे पाटील म्हणाल्या, पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील यांनी सहकाराच्या माध्यमातून उभ्या केलेल्या संस्थांची वाटचाल आज अनेकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या मार्गदर्शनातून आणि दूरदृष्टीतून प्रवरेतील सहकारी संस्था सातत्याने प्रगती करीत आहेत. यावेळी चेअरमन साहेबराव आहेर यांनी संस्थेच्या विविध उपक्रमांची माहिती देत भविष्यातील योजनांचा आढावा घेतला.

विषयपत्रिकेचे वाचन रोहित म्हस्के यांनी केले. विषयपत्रिकेवरील सर्व विषयांना खेळीमेळीच्या वातावरणात मंजुरी देण्यात आली. आभार प्रदर्शन संचालक नितीन साबळे यांनी केले.

## आदर्श नागरी पतसंस्थेच्या सभासदांना ११ टक्के लाभांश !

### वार्षिक सर्वसाधारण सभा खेळीमेळीत

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : राहुरी फॅक्टरी येथील आदर्श नागरी सहकारी पतसंस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा नुकतीच उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली. सभेच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे चेअरमन सुधाकर कदम होते. यावेळी संस्थेच्या आर्थिक प्रगतीचा आढावा सभासदांसमोर मांडण्यात आला. तसेच यंदा सभासदांना ११ टक्के लाभांश देण्याची घोषणा करण्यात आली.

सभेला मार्गदर्शन करताना चेअरमन सुधाकर कदम म्हणाले की, सभासद, ठेवीदार आणि ग्राहकांचा संस्थेवर असलेला दृढ विश्वास, संचालक मंडळाचे मार्गदर्शन तसेच अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे आदर्श नागरी सहकारी पतसंस्थेने आर्थिक क्षेत्रात भरीव प्रगती साधली आहे. सभासदांच्या हिताला प्राधान्य देत संस्थेचा कारभार अधिक सक्षम आणि पारदर्शक पद्धतीने सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

संस्थेचे मार्गदर्शक अण्णासाहेब चोथे यांनी सांगितले की, पारदर्शक कारभार, विश्वासार्हता आणि उत्कृष्ट ग्राहकसेवा यामुळे पतसंस्था सातत्याने प्रगतीपथावर आहे. संस्थेने आर्थिक शिस्त कायम ठेवत सभासदांच्या विश्वासाला बळकटी दिली असून भविष्यातही संस्थेच्या विकासाची हीच वाटचाल सुरू राहील, असे त्यांनी नमूद केले. ३१ मार्च २०२६ अखेर संस्थेची आर्थिक स्थिती पाहता वसूल भागभांडवल १ कोटी १५ लाख रुपये, ठेवी ९० कोटी रुपये, स्वनिधी ३ कोटी ७३ लाख रुपये, कर्जवाटप ५६ कोटी २३ लाख रुपये, तर गुंतवणूक ३३ कोटी ६६ लाख रुपये इतकी आहे. संस्थेचा एकूण व्यवसाय १३२ कोटी १७ लाख रुपये असून वार्षिक उलाढाल ५०० कोटी ७७ लाख रुपये असल्याची माहिती सभेत देण्यात आली.

संस्थेची आर्थिक प्रगती लक्षात घेता यावर्षी सभासदांना ११ टक्के लाभांश देण्यात येणार असल्याचे यावेळी जाहीर करण्यात आले. या घोषणेचे सभासदांनी स्वागत केले. यावेळी संस्थेचे ज्येष्ठ संचालक शिवाजीराव कपाळे यांनी उपस्थित सभासदांना मार्गदर्शन केले. सभेच्या प्रारंभी जनरल मॅनेजर ज्ञानेश्वर सोनवणे यांनी वार्षिक अहवाल केले.

सभेस संस्थेचे ज्येष्ठ संचालक अण्णासाहेब चोथे, व्हाईस चेअरमन आबासाहेब वाळूंज, संचालक शिवाजी कपाळे, अविनाश साबरे, भारत चोथे, मारुती खरात, दत्तात्रय रोडे, संचालिका कमल रामचंद्र काळे, जनरल मॅनेजर ज्ञानेश्वर सोनवणे यांच्यासह सर्व शाखांचे शाखाप्रमुख, अधिकारी, कर्मचारी आणि सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते. व्हाईस चेअरमन आबासाहेब वाळूंज यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## जिल्हास्तरीय टेबल टेनिस स्पर्धेत शारदा स्कूलची दमदार कामगिरी

### मुलींच्या संघाचा प्रथमच सहभाग

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोपरगाव** : सोमय्या विद्या विहार संचलित श्री शारदा इंग्लिश मीडियम स्कूल, कोपरगावच्या खेळाडूंनी अहिल्यानगर जिल्हा क्रीडा कार्यालयाच्या वतीने आयोजित जिल्हास्तरीय शालेय टेबल टेनिस स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करत शाळेच्या क्रीडा क्षेत्रातील यशाची परंपरा कायम राखली. सोमय्या विद्यामंदिर, लक्ष्मीवाडी येथे झालेल्या या स्पर्धेत जिल्ह्यातील विविध शाळांमधील सुमारे २५० ते ३०० खेळाडूंनी सहभाग घेतला.

शारदा स्कूलच्या मुलींच्या संघाने या स्पर्धेत प्रथमच सहभाग नोंदवत पहिल्याच प्रयत्नात उल्लेखनीय यश मिळविले. १४ वर्षांखालील मुलींच्या संघाने तृतीय क्रमांक, तर १७ वर्षांखालील मुलींच्या संघाने उपविजेतेपद पटकावले. १९ वर्षांखालील मुलींच्या संघानेही तृतीय क्रमांक मिळविला. मुलांच्या संघानेदेखील चांगली कामगिरी करत १४ व १७ वर्षांखालील दोन्ही गटांत तृतीय क्रमांक मिळविला.

अशा प्रकारे शारदा स्कूलच्या खेळाडूंनी एक उपविजेतेपद आणि चार तृतीय क्रमांक मिळवत स्पर्धेत आपली वेगळी ओळख निर्माण केली. विशेषतः मुलींच्या संघाचा हा पहिलाच जिल्हास्तरीय सहभाग असल्याने या कामगिरीला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

शाळेत शिक्षणासोबतच विविध क्रीडा प्रकारांना प्रोत्साहन दिले जाते. खेळाडूंना सरावासाठी आवश्यक सुविधा, मार्गदर्शन आणि स्पर्धात्मक वातावरण उपलब्ध करून दिले जाते. या यशाबद्दल प्राचार्य के. एल. वाकचौरे यांनी खेळाडूंचे अभिनंदन केले. शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनीही खेळाडूंचे कौतुक करून पुढील स्पर्धांसाठी शुभेच्छा दिल्या.

## सुरेगावात विद्यार्थ्यांसाठी 'विशेष अभ्यासिका' सुरू

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**नेवासा** : तालुक्यातील सुरेगाव (गंगा) येथे विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी शांत, शिस्तबद्ध व पोषक वातावरण उपलब्ध व्हावे,तसेच त्यांच्या शैक्षणिक प्रगतीला चालना मिळावी, या उद्देशाने कै. आबासाहेब ज्ञानदेव शिंदे सार्वजनिक वाचनालय, सुरेगाव (गंगा) यांच्या वतीने आणि प्रा. रमेश शिंदे यांच्या विशेष सहकार्याने येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांसाठी 'विशेष अभ्यासिका' सुरू करण्यात आली आहे. सोमवारपासून सुरू झालेल्या या अभ्यासिकेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, ठरलेल्या वेळेनुसार दररोज सायंकाळी साडेपाच वाजता विद्यार्थी वाचनालयात उपस्थित राहत आहेत. अभ्यासासाठी आवश्यक सुविधा व शांत वातावरण उपलब्ध झाल्याने विद्यार्थ्यांमध्येही उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

कै. आबासाहेब ज्ञानदेव शिंदे सार्वजनिक वाचनालयाच्या वतीने ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना एमपीएससी व यूपीएससी परीक्षेसाठी येथे पुस्तके उपलब्ध करण्यात आली असून यासाठी सर्वधर्मीय नागरीकांनी देखील या वाचनालयासाठी स्वयंस्फूर्तीने आर्थिक मदतीचा हात पुढे केला आहे. श्री ज्ञानेश्वर महाविद्यालयाचे सेवानिवृत्त प्राध्यापक रमेश शिंदे यासाठी अधिक परिश्रम घेत आहे. सुरेगाव परिसरातील अधिकाधिक विद्यार्थ्यांना सुरू करण्यात आलेल्या अभ्यासिकेचा लाभ घेता यावा यासाठी तसेच त्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी अभ्यासिका वर्गाचा बालकांनी लाभ घ्यावा असे आवाहन कै. आबासाहेब ज्ञानदेव शिंदे सार्वजनिक वाचनालयाच्या वतीने प्रा. रमेश शिंदे यांनी केले आहे.

## गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर नेवासा शहरात पोलिसांचा रूट मार्च



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : गणेशोत्सव २०२६ तसेच नेवासा पोलीस स्टेशन हद्दीतील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याच्या दृष्टीने मंगळवारी (दि. २२ सप्टेंबर) नेवासा शहरातून पोलिसांचा रूट मार्च काढण्यात आला. शेवगाव विभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी नीरज राजगुरू यांच्या नेतृत्वाखाली हा रूट मार्च पार पडला.रूट मार्चमुळे नेवासा शहरात सुरक्षा व्यवस्थेचे घडले प्रभावी दर्शन घडले. मंगळवारी दुपारी १२ वाजता नेवासा पोलीस स्टेशन येथून रूट मार्चला सुरुवात झाली.गणपती चौक, नगरपंचायत चौक,वाखुरे चौक, कामिनशहा दर्गा,आईशा मज्जिद,नुरानी मस्जिद,नगरपंचायत चौक, गणपती चौक व पोस्ट ऑफिस नेवासा या प्रमुख मार्गांवरून पोलिसांनी संचलन केले. गणेशोत्सवाच्या काळात शांतता,सलोखा आणि कायदा व सुव्यवस्था कायम राहावी, यासाठी पोलिस प्रशासनाकडून विशेष खबरदारी घेतली जात आहे. रूट मार्चदरम्यान उपविभागीय पोलीस अधिकारी नीरज राजगुरू यांनी सहभागी अधिकारी व अंमलदारांना बंदोबस्ताच्या अनुषंगाने आवश्यक सूचना व मार्गदर्शन केले. या रूट मार्चमध्ये उपविभागीय पोलीस अधिकारी नीरज राजगुरू, नेवासा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांच्यासह दुय्यम अधिकारी, २५ पोलीस अंमलदार, आरसीपी श्रीरामपूर तसेच एसआरपी दौंडचे जवान शस्त्रसज्ज अवस्थेत व वाहनांसह सहभागी झाले होते. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पोलिस प्रशासनाने केलेल्या या रूट मार्चमुळे नेवासा शहरात सुरक्षा व्यवस्थेचे प्रभावी दर्शन घडले. उत्सव काळात नागरिकांनी शांतता व सामाजिक सलोखा कायम राखण्यासाठी पोलिस प्रशासनास सहकार्य करावे असे आवाहन करण्यात आले.

## मुठेवाडगाव, खानापूरच्या पदाधिकाऱ्यांचा भाजपमध्ये प्रवेश

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**माळवाडगाव** : श्रीरामपूर तालुक्यातील मुठेवाडगाव व खानापूर येथील विविध पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला. मुठेवाडगाव येथील पदाधिकाऱ्यांचा कारेगाव येथे भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील यांच्या उपस्थितीत, तर खानापूर येथील पदाधिकाऱ्यांचा लोणी येथे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या उपस्थितीत पक्षप्रवेश झाला.

कारेगाव येथील ऊस उत्पादक मेळाव्यात डॉ. शंकरराव मुठे यांच्या मार्गदर्शनाखाली मुठेवाडगाव सोसायटीच्या विद्यमान अध्यक्षा द्वारका बाळकृष्ण मुठे, माजी सरपंच व अशोक कारखाना पतसंस्थेचे माजी संचालक ज्ञानेश्वर मुठे, श्रीरामपूर देखरेख संघाचे संचालक संभाजी गोसावी, सोसायटीचे माजी अध्यक्ष शेषराव मुठे, ग्रामपंचायत सदस्य किशोर साठे, अशोक कारखान्याचे माजी केनयार्ड अधीक्षक भिकचंद मुठे यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला. डॉ. सुजय विखे पाटील यांनी प्रवेशकर्त्यांचा सत्कार केला. दरम्यान, लोणी येथील जनता दरबार व अकारी पडीत सत्कार कार्यक्रमात खानापूरचे सरपंच ज्ञानदेव आदिक, अशोक कारखान्याचे माजी संचालक नामदेव आदिक, बाबासाहेब जगताप, दादासाहेब चौधरी, मच्छिंद्र ढमक, आप्पासाहेब चौधरी यांच्यासह असंख्य कार्यकर्त्यांनी राधाकृष्ण विखे पाटील यांच्या उपस्थितीत भाजपमध्ये प्रवेश केला.

या वेळी जिल्हाध्यक्ष नितीन दिनकर, जिल्हा उपाध्यक्ष दीपक पटारे, तालुकाध्यक्ष बाबासाहेब चिडे, ज्येष्ठ नेते गिरीधर आसने यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते. आगामी ग्रामपंचायत व सोसायटी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर दोन्ही गावांतील पक्षप्रवेशांकडे स्थानिक राजकारणाच्या दृष्टीने पाहिले जात आहे.


प्रो.फी. जमा.रु.
पान नं,

**सायटेशन नोटीस**

दि.२८.०७.२०२६

**शेवगाव येथील तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी शेवगाव यांचे कोर्टात**

चौ.अ.नं. अर्जदार

१. श्री किरण जनार्धन लिंबोरे रा. दहिगांव. ता. शेवगांव

सामनेवाला - सरकार

सदर अर्जदार हा मौजे दहिगांव येथील रहीवाशी आहे. सदर **अर्जदार श्री. किरण जनार्धन लिंबोरे यांच्या मुलीचा अक्षदा किरण लिंबोरे यांचा जन्म दि. २१.०६.२०२४ रोजी नित्यसेवा हॉस्पीटल शेवगांव ता. शेवगाव जि. अहिल्यानगर** असा तहसिल कार्यालय शेवगाव अभिलेखपाल येथे जन्माचा दाखला मिळणे बाबत अर्जदार यांनी अर्ज केला असता अर्जदार यांना नोंदी आढळ होत नसल्याचे कळविण्यात आले आहे. जन्म मृत्यु नोंदणी रजिस्टरला नोंद करण्याचे राहुन गेलेले आहे. त्यामुळे अर्जदार यांचे मुलीचा जन्म मृत्यु नोंदणी प्रमाणपत्र (जन्म दिनांक नोंदणी दाखला) मिळु शकत नाही. त्यामुळे सदर अर्जदार यांचे शासकीय योजने कामी तसेच वेगवेगळ्या ठिकाणी अडचणींना सामोरे जावे लागत आहे. अर्जदार यांचे मुलीचा जन्म नोंद पंचायत समिती कार्यालय, शेवगाव यांच्या जन्म मृत्यु नोंदणी रजिस्टरला नोंद घेवुन तसा दाखला मिळणे न्यायाचे व गरजेचे आहे. सदरचा दाखला हा शासकीय कामासाठी आवश्यक आहे. सदर अर्जदार याने पंचायत समिती कार्यालय शेवगाव येथे जावुन जन्म मृत्यु प्रमाणपत्राबाबत मागणी केली असता नोंद नसल्याने त्या कार्यालयात जन्म मृत्युची नोंद नसलेबाबत दि.०५.०३.२०२६ रोजीचा दाखला सदर अर्जदारास देण्यात आलेला जन्म/मृत्युच्या च्या १ वर्षाच्या आत मध्ये जन्म-मृत्यु नोंदणी न झाल्यास केवळ तालुका दंडाधिकारी यांच्या आदेशानेच नोंद घेता येवू शकते. अशी माहिती अर्जदारास ग्रामपंचायत येथे देण्यात आली. अशा परिस्थीती मध्ये सदर अर्जदार यांच्या मुलीचा जन्म/मृत्यु नोंद जन्म-मृत्यु नोंदणी रजिस्टरला होणे न्यायाच्या व जरुरीचे आहे त्याकरीता योग्य तो आदेश मिळणेसाठी प्रस्तुतचा अर्ज अर्जदाराने मे. कोर्टात दाखल केलेला आहे. त्यापेक्षा सदरहुन अर्जदाराचे सदरहु जन्म-मृत्यु नोंदीबाबत कोणास काही एक म्हणावयाचे असेल तर हया जाहीर नोटीसीच्या तारखेपासुन एक महिन्याचे आत दि ०४/०९/२०२६ पुर्वी त्याने हया कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात. आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहून मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्या तर सदरहून कोर्ट अर्जदार यांचे हक्काबदल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास जन्म-मृत्यु नोंद घेणेबाबत आदेश करतील. आज दि. २०/०८/२०२६ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी नोटीस दिले असे.

शिक्का सही/- हुकमावरुन

**तहसिलदार शेवगाव तथा तालुका दंडाधिकारी शेवगाव**



प्रो.फी.जमा.रू.
प्रो.पान.नं.
ने.ता. १७/११/२०२६

**जाहीर नोटिस**

ॲड.के.बी.शेख

ता. २२/०९/२०२६
नि.०६

श्रीरामपूर येथील मे. ३ रे सिव्हील जज्ज साहेब, (ज्यु.डी.) यांचे कोर्टात.
वा.चौ.अ. नं. ७० / २०२६

१. श्री. अबुतालिब समीर शेख, वय २५ वर्षे, धंदा- व्यवसाय, रा. जुने आर.टी.ओ. ऑफिस जवळ, वॉर्ड नं. १, श्रीरामपूर, ता. श्रीरामपूर, जि. अहिल्यानगर,

२. श्रीमती. मुनवर समीर शेख, वय ४९ वर्षे, धंदा- घरकाम, रा. जुने आर.टी.ओ. ऑफिस जवळ, वॉर्ड नं. १, श्रीरामपूर, ता. श्रीरामपूर, जि. अहिल्यानगर,---**अर्जदार**

विरुद्ध

कोणीही नाही---.**सा.वाला**

अर्ज :- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७, कलम ८ अन्वये वारस दाखला मिळणेसाठी.

अर्जदारांचा विनंती अर्ज की,

१) अर्जदार हे अर्ज नमुद पत्त्यावर राहण्यास आहेत. अर्जदार नं. १ यांचे वडिल व अर्जदार नं. २ यांचे पती समीर गणी शेख हे दि. ०८/०३/२०२४ रोजी संजीवन हॉस्पीटल, श्रीरामपूर येथे आजारपणामुळे मयत झालेले आहेत.

२) अर्जदार नं. १ व २ हेच मयत समीर गणी शेख यांना वारस आहेत. या वारसांशिवाय मयतास इतर कोणीही कायदेशिर वारस नव्हते व नाही.

३) अर्जदारांना शासकीय, कोर्ट व इतर कामासाठी वारस दाखल्याची आवश्यकता आहे. अर्जदार नं. २ यांची अर्जदार नं. १ यांचे नावे वारस दाखला देण्यास कोणतीही हरकत नाही. म्हणून अर्जदार नं. १ यांच्या नावे वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी सदर अर्ज दाखल केलेला आहे.

४) ज्याअर्थी सदरहू अर्जदार हे सदरहू मयताचे वारस नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर या जाहीर नोटीसीच्या तारखेपासून ३० दिवसांचे आत स्वतः अगर माहीतगार वकीलांकरवी या मे. कोर्टात हजर होवून योग्य त्या पुराव्यानिशी हरकत नोंदवावी, अन्यथा अर्जदारांचा लागलीच पुरावा घेऊन त्यांना वारस प्रमाणपत्र देण्याबाबत आदेश केला जाईल.

५) आज रोजी २२/०९/२०२६ माझे सहीनिशी व मे. कोर्टाचे शिक्यानिशी दिले असे.

शिक्का

**कामगिरी क्लार्क**
**दवाणी न्यायालय, क. स्तर श्रीरामपूर**

**हुकूमावरुन**
**सहाय्यक अधिक्षक**
**दवाणी न्यायालय, क. स्तर श्रीरामपूर**



**जाहीर नोटीस**

ता. २२/०९/२०२६

तमाम लोकांस या नोटीसीने कळविण्यांत येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ही विदयमान मालक गोविंद व्यंकोजी खांडेकर रा. आदर्श सोसायटी, बिल्डींग नं. ४७, रुम नंबर १९७७ पोखर्णा रोड नंबर १ वर्तकनगर ठाणे यांचे मालकी हक्क व प्रत्यक्ष कब्जे वहिवाटीची असून सदर मिळकती बाबत आमचे आशिलांनी खरेदी विक्रीचा सौदा निश्चीत केलेला असून सदरील मिळकतीचे व्यवहारापोटी विसारा दाखल रक्कमही दिलेली आहे. मुळ मालकांनी सदर मिळकत निर्वेध, निजोखमी व बोजारहीत असल्याबाबत आमचे आशिलांना खात्री व विश्वास दिलेला आहे. त्यामुळे आमचे आशिल सदरील खरेदीखताचा व्यवहार लवकरच पूर्ण करणार आहेत. तरी सदरील मिळकतीशी कोणाचेही कोणतेही प्रकारे खरेदी विक्री, गहाण, दान, लिज, लिन, बक्षीसपत्र, साठेखत अगर अन्य मार्गाने काही हक्क हितसंबंध असल्यास सदर नोटीस प्रसिध्द झाल्या पासून सात दिवसाचे आत आमचे खालील पत्त्यावर लेखी कागदोपत्री पुराव्यानीशी हरकती सादर कराव्यात मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध निजोखमी व बोजारहीत असलेचे समजुन आमचे आशिल पुढील खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील त्यानंतर कोणाचीही कोणतीही हरकत व तक्रार विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी, कोणाचीही फसगत होऊ नये म्हणुन सदरची नोटीस प्रसिध्द केली असे.

**परिशिष्ट**

**मिळकतीचे वर्णन** :- जिल्हा अहिल्यानगर सब जिल्हा तालुका नगर पैकी अहिल्यानगर महानगर पालिका हद्दीतील केडगांव भागातील बिन शेती प्लॉट मिळकत सर्व्हे नंबर ५०५ (४) १ मधील प्लॉट नंबर ३२ याची लांबी १५ बाय ८ क्षेत्र १२० चौ.मी. यावर आर सी सी स्ट्रक्चरमध्ये बांधकाम केलेली घर मिळकत याचे तळमजल्याचे बांधकाम क्षेत्र ५९.९६ चौ मी ही संपुर्ण मिळकत यांसी चतुः सिमा महसुली रेकॉर्ड प्रमाणे

येणे प्रमाणे चतुःसिमा पुर्वक प्लॉट मिळकत त्यावरील बांधकामासह व इतर वाग वहिवाटीचे हक्कासह तदंगभुत वस्तुसह खाली काहीएक राखुन न ठेवीता.

सही
ऑफिसः-
२११, ॲडव्होकेट चेंबर जुने जिल्हा न्यायालय आवार, अहिल्यानगर

शिक्का

**श्री.बी एम. घुले**
बी.ए.एल एल.बी.
ॲडव्होकेट

## पान १ वरुन

### धीरज परदेशी हत्याकांडातील पाच आरोपींचा जामीन अर्ज फेटाळला

आरोपी तसेच सरकार पक्षाच्यावतीने युक्तिवाद करण्यात आला. सदर प्रकरणात न्यायालयाने असे निरीक्षण नोंदविले की, सदर घटना घडवून आणण्यासाठी आरोपींनी पूर्वनियोजित कट रचला होता आणि सदर प्रकरणात तपास प्राथमिक स्तरावरून असून आरोपींचे ओळख परेड घेणे बाकी आहे. अशा अनेक मुद्दयांवर युक्तिवाद झाला. सरकार पक्षाचा भरभक्कम युक्तिवाद ऐकून न्यायालयाने आरोपींचे नियमित जामीन अर्ज रद्द केलेले आहे. याप्रकरणी सरकार पक्षाच्यावतीने सहायक सरकारी वकिल श्रीमती पुष्पा कापसे-गायके यांनी काम पाहिले तसेच त्यांना मूळ फिर्यादीचे वकिल ॲड. सुहास टोणे, ॲड. सागर टाक व ॲड. अमित गाडेकर यांनी सहकार्य केले.

### पावसाने पाठ फिरवली, भगवानगडाच्या विहिरीने मात्र धरली जलधारा!

झाले आहे. मात्र, या विहिरीत मुबलक पाणीसाठा कायम असल्याचे दिसून येत आहे. भगवानगडावर संत ज्ञानेश्वर माऊली मंदिराचे बांधकाम वेगाने सुरू असून भाविकांसाठी अखंड अन्नदान सुरू आहे. तसेच गडावरील गोशाळेतील गोधनासाठी मोठ्या प्रमाणात पाण्याची आवश्यकता असते. या सर्व कामांसाठी या विहिरीतील पाण्याचा वापर होत असल्याचे सांगण्यात येते. सातत्याने पाणी उपसा होऊनही विहिरीतील पाणी टिकून असल्याने या जलस्रोताबाबत विशेष चर्चा सुरू झाली आहे. या विहिरीचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे अवघ्या दीडशे फुटांच्या अंतरावर नागलवाडी परिसरातील खासगी विहिर आहे. मात्र, त्या विहिरीतील पाणीसाठा अत्यल्प असून ती जवळपास कोरडी पडली आहे. एकाच परिसरात इतया कमी अंतरावर असलेल्या दोन विहिरींच्या पाणीपातळीत मोठी तफावत असल्याने नागरिकांमध्ये कुतूहल निर्माण झाले आहे. विहिरीतील पाण्याची माहिती परिसरात व सोशल मीडियावर पसरल्यानंतर अनेक नागरिकांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. भगवानगडाला संत भगवानबाबांच्या अध्यात्मिक परंपरेचा वारसा लाभला आहे. संत भगवानबाबांनी पाण्यावर गाथा वाचन केल्याची परंपरा भाविकांमध्ये सांगितली जाते. त्यामुळे या विहिरीत कायम असलेल्या पाण्याकडे अनेक भाविक श्रद्धेच्या दृष्टीने पाहत असून, ही संत भगवानबाबांची कृपा असल्याची भावना व्यक्त केली जात आहे. मात्र, या विहिरीला पाणीपुरवठा करणारा नैसर्गिक स्रोत नेमका कोणता, याचा शास्त्रीय अभ्यास होणेही आवश्यक आहे. भूजल तज्ज्ञांकडून पाहणी व अभ्यास झाल्यास या विहिरीची पाणीपातळी टिकून राहण्यामागील नैसर्गिक कारणे स्पष्ट होण्यास मदत होऊ शकते. दरम्यान, विहिरीवर हेलिकॉप्टरमधून झालेल्या पुष्पवृष्टीच्या वेळी भगवानगड परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले. भाविकांनी मोठ्या उत्साहात हा सोहळा अनुभवला. दिवसभर विहिरीचे पाणी पाहण्यासाठी येणाऱ्या भाविकांच्या स्वागतासाठी घोगस-पारगाव येथील लेझीम पथकाने पारंपरिक लेझीमचे डाव सादर केले. त्यामुळे भगवानगड परिसरात श्रद्धा, जलस्रोत आणि लोकपरंपरेचा अनोखा संगम पाहायला मिळाला.

### मुलीने प्रेमविवाह केला म्हणून कुटुंबच वाळीत!

कुटुंबावर बहिष्कार टाकण्यात आला. त्यांच्याशी कोणी बोलू नये, सुख-दुःखाच्या प्रसंगी त्यांना बोलावू नये, अन्यथा संबंधितांनाही दंड करून जातीबाहेर काढू, असा फतवा काढण्यात आल्याचा आरोप आहे. मुलीलाही कुटुंबीयांना भेटू दिले जात नसल्याचे तक्रारीत नमूद आहे. एवढेच नव्हे, तर भावाच्या अंत्यविधीलाही उपस्थित राहता आले नाही, अशी व्यथा अहिरे यांनी व्यक्त केली.या प्रकाराबाबत अहिरे कुटुंबीयांनी महाराष्ट्र अंधश्रद्धा
निर्मूलन समितीचे माजी अध्यक्ष अविनाश पाटील यांच्याकडे तक्रार केली. सामाजिक बहिष्कारविरोधी कायद्यान्वये जातपंचायतीविरोधात गुन्हा दाखल करण्याची मागणी करणारे निवेदन पोलिस निरीक्षक संभाजी गायकवाड यांना देण्यात आले. त्यानुसार तक्रार दाखल करण्यात आली आहे.

### ₹२,७००चे औषध ₹२७ हजारांच्या एमआरपीने विक्री

असा सवाल न्यायालयाने उपस्थित केला. उपचारासाठी लोक घर आणि दागिने विकतात, त्यामुळे अत्यावश्यक औषधांच्या किमतींबाबत अधिक पारदर्शकता आणि प्रभावी नियंत्रण आवश्यक असल्याचे खंडपीठाने नमूद केले. न्यायालयाने संबंधित यंत्रणांच्या कार्यपद्धतीवरही प्रश्न उपस्थित केले. सुनावणीदरम्यान औषधांच्या किमती निश्चित करण्याचा मुद्दा मोठा असल्याचेही न्यायालयाने स्पष्ट केले. याचिकाकर्त्यांच्या वतीने डॉटरांनी जेनेरिक औषधे लिहिणे आणि अत्यावश्यक औषधांच्या किमती नियंत्रित करण्याची मागणी करण्यात आली आहे.

केंद्र सरकारची बाजू मांडताना अतिरिक्त सॉलिसिटर जनरल के. एम. नटराज यांनी सरकार या प्रकरणाकडे विरोधाच्या भूमिकेतून पाहत नसल्याचे सांगितले. औषधांच्या किमती निश्चित करण्याचा प्रश्न व्यापक असल्याचे न्यायालयाने नमूद केले.

दरम्यान, महाराष्ट्राचे अन्न व औषध प्रशासन आयुक्त तुकाराम मुंढे यांनीही रुग्णालयांमधील औषधे व वैद्यकीय साहित्याच्या किंमतीतील मोठ्या तफावतीचा मुद्दा अलीकडेच उपस्थित केला आहे. महाराष्ट्र ऋअच्या पाहणीत काही वैद्यकीय साहित्याच्या खरेदी किमती आणि एमआरपीमध्ये मोठी तफावत आढळली होती. या पार्श्वभूमीवर किंमत नियंत्रण आणि पारदर्शकतेबाबत राष्ट्रीय पातळीवर पुनरावलोकन करण्याची मागणी करण्यात आली आहे.

या प्रकरणाची पुढील सुनावणी २९ सप्टेंबरला होणार आहे. अत्यावश्यक औषधांच्या किमती, उत्पादक-घाऊक विक्रेते-रिटेलर यांच्यातील दररचना आणि रुग्णांकडून आकारली जाणारी अंतिम किंमत याबाबत पुढे काय भूमिका घेतली जाते, याकडे लक्ष लागले आहे.

# संजीवनी युवा प्रतिष्ठानच्या 'वाजवेल तो गाजवेल'

## तुळजा भवानी मंडळाने मारली बाजी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोपरगाव** – गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पारंपरिक ढोल-ताशा वादनाची संस्कृती जपण्याबरोबरच युवकांच्या कलागुणांना व्यासपीठ मिळावे, या उद्देशाने संजीवनी युवा प्रतिष्ठानच्या माध्यमातून कोपरगाव तहसील मैदानावर आयोजित करण्यात आलेली 'वाजवेल तो गाजवेल' ढोल-ताशा स्पर्धा उत्साहात संपन्न झाली.संजीवनी युवा प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष आ.विवेकभैय्या कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू झालेल्या या स्पर्धेचे यंदा चौथे वर्ष असून, यावेळी स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. ढोल-ताशांच्या सामूहिक वादनाने संपूर्ण परिसर निनादून गेला. तालबद्ध वादन, शिस्तबद्ध संचलन आणि कलाकारांच्या उत्स्फूर्त सादरीकरणामुळे स्पर्धेला विशेष रंगत आली. विविध पथकांनी दमदार वादन सादर करत उपस्थितांची दाद मिळवली.

स्पर्धेत तुळजा भवानी तरुण मंडळाने प्रथम पारितोषिक पटकावले. मुंबादेवी तरुण मंडळाला द्वितीय पारितोषिक व बेस्ट ड्रेपरीचा पुरस्कार, तर हत्ती गणपती मंडळाला तृतीय पारितोषिक मिळाले. हत्ती गणपती मंडळाला गोवा पोलिसांकडून वादनासाठी निमंत्रित करण्यात आले आहे. क्रांती युवक संघटनेला उत्तेजनार्थ पुरस्कार देण्यात आला.यंदाच्या स्पर्धेचे परीक्षण महाराष्ट्रातील अनुभवी परीक्षक रासिका गुंजाळ उमरजकर, प्रसाद भगवान आणि रोहन महाजन यांनी केले. परीक्षकांनी ढोल-ताशा वादनातील ताल, लय, शिस्त, सादरीकरण आणि पथकाच्या एकत्रित वादनाच्या आधारे स्पर्धकांचे परीक्षण केले.

स्पर्धेत विविध वयोगटातील आणि वेगवेगळ्या क्षमतेच्या कलाकारांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. क्रांती युवकचा बाल ताशा वादक दक्ष साबळे, हत्ती गणपतीची ध्वजधारी समृद्धी जगताप, मुंबादेवी मंडळाचा टोल वादक विवेक फंड तसेच हत्ती गणपतीचा दिव्यांग ढोल वादक हर्षदा सोनवणे यांच्या सादरीकरणाने विशेष लक्ष वेधून घेतले. जय तुळजा भवानीचे ताशा वादक भूषण सूर्यवंशी यांनीही प्रभावी वादन केले. त्यांना विशेष बक्षिसे देण्यात आली.

स्पर्धेच्या आयोजनात अध्यक्ष शुभम गायकवाड, उपाध्यक्ष पंकज कुऱ्हे, अभिषेक मंजूळ, दुर्गेश धोकडे, कार्याध्यक्ष नितीन कुऱ्हे, चेतन ईश्वरे, गोकुळ दुशिंग, सचिव कुंदन भारबे, संजय खरोटे, श्याम शेवते तसेच प्रसिद्धी प्रमुख आकाश सुपेकर, अमित सोळसे, कृष्णा पडियार, आकाश खैरे, सौरभ होते व गौरव पानगव्हाणे यांनी योगदान दिले.

# त्रिमूर्ती विद्यालयात 'मूल्यशिक्षण' या विषयावरील व्याख्यानाला उत्स्फूर्त प्रतिसाद

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** नेवासा फाटा येथील त्रिमूर्ती पावन प्रतिष्ठान संचलित श्री दादासाहेब हरिभाऊ घाडगेपाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात विद्यार्थ्यांसाठी आयोजित 'मूल्यशिक्षण' या विषयावरील आयोजित व्याख्यानाला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. आई-वडिलांविषयी कृतज्ञता आणि समाजाप्रती जबाबदारी या मूल्यांची विद्यार्थ्यांनी जपणूक करावी असे आवाहन व्याख्यात्या माया नवथर यांनी यावेळी बोलतांना केले.



कार्यक्रम प्रसंगी प्रमुख व्याख्यात्या म्हणून माया नवथर या प्रमुख अतिथी लाभल्या होत्या. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना त्या म्हणाल्या की केवळ पुस्तकी ज्ञान नव्हे तर जीवनात संस्कार आणि मूल्यांची जोड असणे अत्यंत महत्त्वाचे आहे. आजच्या स्पर्धेच्या युगात प्रामाणिकपणा, शिस्त, आदर, वेळेचे नियोजन, आई-वडिलांविषयी कृतज्ञता आणि समाजाप्रती जबाबदारी या मूल्यांची विद्यार्थ्यांनी जपणूक करा,मोबाईलच्या अति वापरापासून दूर राहून चांगल्या सवयी लावा असे आवाहन करून त्यांनी अनेक दाखले देऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधला. विद्यार्थ्यांनी देखील आपल्या शंका विचारून या व्याख्यानात उत्स्फूर्त सहभाग घेतला.

यावेळी झालेल्या कार्यक्रम प्रसंगी प्राचार्य सोपान काळे, विद्यालयाचे उपप्राचार्य शांतीलाल मेहेत्रे,समन्वयक दत्ता वांढेकर,नुरजहा सय्यद, अंजली होन व शिक्षकवृंद उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय अरविंद देशमुख यांनी करून दिला तर आभार विद्यालयाचे उपप्राचार्य शांतीलाल मेहेत्रे यांनी मानले. कार्यक्रमाची सांगता ज्ञानेश्वरांच्या पसायदानाने करण्यात आली. सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

### टेंभी मध्ये शेतीशाळा उत्साहात

**वैजापूर** :तालुक्यातील टेंभी येथे तालुका कृषी विभाग वैजापूरच्या वतीने नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प अंतर्गत मका शेतीशाळा घेण्यात आली .

तालुका कृषी अधिकारी व्यंकट ठक्के व उपविभागीय कृषी अधिकारी आनंद गंजेवार यांच्या मार्गदर्शनाखाली तालुक्यात विविध पिकांच्या शेतीशाळा सुरू आहेत.

टेंभी येथे प्रगतिशील शेतकरी राजेंद्र पवार यांच्या शेतावर मका शेती शाळा घेण्यात आली. कार्यक्रमासाठी कृषी ताई मनीषा पवार, नंदाबाई पवार, वनिता पवार, अलका पवार, राजेंद्र पवार ,संजय पवार, विजय पवार, देवदत्त पवार, राहुल पवार, गौरव पवार, पप्पू काकडे, दादासाहेब कुरकुरे, शनेश्वर मस्के सह शेतकरी उपस्थित होते.

# जिल्हा बँक निवडणुकीत विलास दाभाडे यांचे नाव कायम

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**टाकळीभान :** संत सावता माळी विविध कार्यकारी सहकारी सेवा संस्था (टाकळीभान) चे प्रतिनिधी विलास भाऊसाहेब दाभाडे यांचे नाव प्रारुप मतदार यादीतून वगळण्याचा विभागीय सहनिबंधकांचा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने रद्द केला आहे. त्यामुळे दाभाडे यांचा अंतिम मतदार यादीत समावेश होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती मंजुषा देशपांडे यांनी हा महत्त्वपूर्ण निकाल दिला.

अहिल्यानगर जिल्हा बँकेच्या २०२६ ते २०३१ पंचवार्षिक निवडणुकीसाठी संत सावता माळी विविध कार्यकारी सेवा संस्थेच्या वतीने विलास दाभाडे यांची प्रतिनिधी मतदार म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. प्राथमिक मतदार यादीत त्यांच्या नावाचा समावेशही होता. मात्र, दाभाडे यांच्या आजीने दुसऱ्या एका सहकारी संस्थेकडून घेतलेल्या कर्जाची थकबाकी असल्याचा आधार घेत, त्यांच्या नावावर हरकत घेण्यात आली होती.

ही हरकत मान्य करत नाशिकचे विभागीय सहनिबंधक तथा जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी यांनी १० सप्टेंबर २०२६ रोजी दाभाडे यांचे नाव मतदार यादीतून वगळण्याचे आदेश दिले होते.

विभागीय सहनिबंधकांच्या या निर्णयाविरोधात विलास दाभाडे यांनी औरंगाबाद खंडपीठात रिट याचिका (क्र. १२४३१/२०२६) दाखल केली. दाभाडे यांच्या वतीने ॲड. राहुल आर. कर्पे, ॲड. अवंतिका खर्डे आणि ॲड. सौरभ निकत यांनी काम पाहिले.

ॲड. राहुल कर्पे यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमातील कलम २७ (३), २७ (१०) आणि ७३३ मधील तरतुदींचा हवाला देत जोरदार युक्तिवाद केला. दाभाडे ज्या संस्थेचे प्रतिनिधी म्हणून जिल्हा बँकेच्या निवडणुकीत मतदान करणार आहेत, त्या संस्थेचे ते थकबाकीदार नाहीत, हा मुख्य मुद्दा त्यांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिला.या प्रकरणी सुनावणीदरम्यान उच्च न्यायालयाने स्पष्ट केले की, विलास दाभाडे हे स्वतः च्या प्राथमिक संस्थेच्या व्यवस्थापन समितीचे सदस्य होण्यासाठी नव्हे, तर त्या संस्थेचे प्रतिनिधी म्हणून जिल्हा मध्यवर्ती बँकेच्यानिवडणुकीत मतदान करण्यासाठी नियुक्त झाले आहेत. अशा परिस्थितीत कलम २७ (३) च्या तरतुदी लागू होतात. न्यायालयाने पुढे नमूद केले की, संत सावतामाळी संस्था स्वतः जिल्हा बँकेच्या निवडणुकीत भाग घेण्यास अपात्र ठरलेली नाही. त्यामुळे केवळ दुसऱ्या संस्थेशी संबंधित कथित थकबाकीचा आधार घेऊन प्रतिनिधीच्या मतदान हक्कावर अपात्रता आणता येणार नाही. या निरीक्षणासह उच्च न्यायालयाने नाशिक विभागीय सहनिबंधकांचा १० सप्टेंबर २०२६ चा आदेश रद्द ठरवला. तसेच विलास भाऊसाहेब दाभाडे यांचे नाव अंतिम मतदार यादीत योग्य ठिकाणी समाविष्ट करण्याचे स्पष्ट निर्देश दिले आहेत.

## निधन

### छबू सरोदे



**हातगाव :** शेवगाव तालुक्यातील मुंगी येथील दलित समाजातील कार्यकर्ते छबू दशरथ सरोदे यांचे नुकतेच वयाच्या ७२ व्या वर्षी दीर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी,२ मुले व ४ मुली आणि नातवंडे असा मोठा परिवार आहे.

### भागवत भाकरे



**हातगाव :** शेवगाव तालुक्यातील हातगाव येथील भागवत लिंबाजी भाकरे यांचे नुकतेच वयाच्या ५८ व्या वर्षी अहिल्यानगर येथे राहत्या घरी हृदयविकाराचा झटक्याने निधन झाले . भाकरे हे जिल्हा कोर्टात ॲड. एल. बी. पल्लोड व ए. के. गुगळे यांच्या समवेत अनेक वर्ष खाजगी क्लार्क म्हणून काम करत होते. त्यांच्या पश्चात पत्नी, १ मुलगा व २ विवाहित मुली आहेत.

### कौशल्या शेटे



**नगर तालुका :** नगर तालुक्यातील जेऊर येथील रहिवासी कौशल्या गोविंदराव शेटे (वय ८०) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, दोन मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे. सामाजिक कार्यकर्ते बाळासाहेब शेटे यांच्या त्या मातोश्री होत.

### शाहीन अजिज शेख



**श्रीरामपूर :** येथील फातेमाहौसिंग सोसायटीतील शाहीन अजीज शेख (वय ५४) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, एक मुलगा, एक मुलगी, जेट, जाव,पुतणे, नणदा असा मोठा परिवार आहे. रयत शिक्षण संस्थेतील निवृत्त शिक्षक अजीज गफूरभाई शेख यांच्या त्या पत्नी तर काँग्रेसचे ज्येष्ठ कार्यकर्ते नजीर गफुर शेख यांच्या भावजई तसेच पत्रकार निसार सय्यद,प्रा.आन्सार सय्यद,डॉ.यासीन सय्यद यांच्या त्या भगिनी होत.

## शनिसमर्थ पतसंस्थेची सभा उत्साहात, सभासदांना १२ टक्के लाभांश

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**सोनई :** श्रीक्षेत्र शनिशिंगणापूर येथील शनिसमर्थ पतसंस्थेची २९वी वार्षिक सर्वसाधारण सभा संस्थेचे अध्यक्ष पोपटराव कुऱ्हाट यांच्या अध्यक्षतेखाली खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. यावेळी सभासदांना यंदा १२ टक्के लाभांश देण्याचा निर्णय जाहीर करण्यात आला.

संस्थेने आर्थिक प्रगती साधत कारभार अधिक सक्षम करण्यासाठी सभासदांनी सहकार्य करावे, असे आवाहन अध्यक्ष पोपटराव कुऱ्हाट यांनी केले. ज्येष्ठ नेते शंकरराव गडाख यांच्या मार्गदर्शनाखाली संस्था कार्यरत असून, संस्थेच्या प्रगतीसाठी नव्या-जुन्या सभासदांनी सकारात्मक सहभाग नोंदवावा, असे त्यांनी सांगितले.संस्थेचे मार्गदर्शक संचालक आर. के. शेटे यांनी सूत्रसंचालन करत संस्थेच्या कारभाराबाबत समाधान व्यक्त केले. प्रसाद कुऱ्हाट यांनी संस्थेची थकीत कर्जे वसूल करून अनुत्पादक कर्जाचे प्रमाण कमी करण्यासाठी सभासदांनी सहकार्य करण्याचे आवाहन केले. संस्थेचे व्यवस्थापक-सचिव राजेंद्र फोके यांनी वार्षिक अहवालाचे वाचन करून संस्थेच्या आर्थिक स्थितीची माहिती दिली. प्रारंभी दिवंगत व्यक्तींना श्रद्धांजली वाहण्याचा ठराव दिलीप डिके यांनी मांडला. सभेत सर्व विषयांना मंजुरी देण्यात आली. यावेळी दादापाटील दरंदले, सुखदेव बनकर, सोपानराव बनकर, बाळकृष्ण येळवंडे, भागवत दरंदले, ज्ञानदेव दरंदले, गुड्डूशेठ बेल्हेकर, सुनील दरंदले, प्रसाद कुऱ्हाट, राजेंद्र दरंदले, संतोष शेटे आदी उपस्थित होते. किशोर दरंदले यांनी आभार मानले.

## दरवाढीविरोधात ग्राहक संरक्षण समितीचे तहसीलदारांना निवेदन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**शिर्डी** :देशात आणि राज्यात दिवसेंदिवस होत असलेल्या प्रचंड महागाईमुळे शेतकरी बांधव आणि सर्वसामान्य नागरिकांचे कंबरडे मोडले आहे. याच गंभीर प्रश्नावर लक्ष वेधण्यासाठी आणि जीवनावश्यक वस्तूंचे वाढलेले दर नियंत्रणात आणण्यासाठी ग्राहक (उपभोक्ता) संरक्षण समितीच्या वतीने राहता तालुक्याचे तहसीलदार हेमंत पाटील यांना नुकतेच एक निवेदन देण्यात आले.

ग्राहक संरक्षण समितीचे राष्ट्रीय अध्यक्ष दादाभाऊ केदारे यांच्या आदेशानुसार व उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष भगवान थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली हे निवेदन देण्यात आले आहे.

यसध्या बाजारपेठेत कडधान्य, खाद्यतेल, तांदूळ, धान्य, गॅस सिलिंडर, भाजीपाला यासह बियाणे, खते आणि कीटकनाशकांच्या किमतीत मोठी वाढ झाली आहे. या दरवाढीमुळे शेतकरी व सामान्य माणसाची आर्थिक फसवणूक होत असून, व्यापारी वर्गाकडून होत असलेली साठेबाजी आणि काळाबाजार यामुळे जीवनावश्यक वस्तूंची कृत्रिम टंचाई निर्माण होत असल्याचे निवेदनात म्हटले आहे. सामान्य माणसाचे उत्पन्न जैसे ते असताना दररोज वाढणाऱ्या भाववाढीमुळे नागरिकांना आपले जगणे कठीण झाले आहे. ग्राहक संरक्षण कायद्यानुसार ग्राहकांच्या हिताचे रक्षण करणे आणि सर्वसामान्यांना रास्त दारात वस्तू उपलब्ध करून देणे प्रशासनाची जबाबदारी आहे.

या निवेदनाद्वारे प्रशासनाकडे प्रमुख मागण्या करण्यात आल्या आहेत. सर्वसामान्यांच्या या जिव्हाळ्याच्या प्रश्नावर प्रशासनाने तात्काळ सकारात्मक निर्णय घ्यावा, अन्यथा ग्राहक (उपभोक्ता) संरक्षण समितीच्या वतीने तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही यावेळी देण्यात आला आहे.

राहता तालुका तहसीलदार कार्यालयात तहसीलदार यांना निवेदन देताना ॲड. रामनाथ सदाफळ, रवींद्र जगताप, मुस्ताक शहा, दिनकर साळवे उपस्थित होते.

# स्वच्छ दूध निर्मिती : निरोगी पशुधन, सुरक्षित दूध आणि समृद्ध शेतकरी

दूध हे केवळ अन्न नसून ग्रामीण अर्थव्यवस्थेचा महत्त्वाचा आधार आहे. दूधाची गुणवत्ता, सुरक्षितता आणि टिकवणूक यासाठी दूध काढण्यापासून ते ग्राहकापर्यंत पोहोचेपर्यंत स्वच्छतेला अत्यंत महत्त्व आहे. स्वच्छ दूध निर्मितीमुळे ग्राहकांना सुरक्षित व पौष्टिक दूध मिळते आणि पशुपालकाला दूधाला चांगला दर मिळण्यास मदत होते. स्वच्छ दूध म्हणजे काय?ज्या दुधामध्ये धूळ, शेण, केस, चारा, माती किंवा इतर परकीय पदार्थ नसतात आणि ज्यामध्ये हानिकारक जिवाणूंचे प्रमाण कमी असते, अशा दुधाला स्वच्छ व सुरक्षित दूध म्हणता येते. दूध काढताना स्वच्छतेची काळजी घेतल्यास दुधाची गुणवत्ता मोठ्या प्रमाणात सुधारता येते.स्वच्छ दूध निर्मितीसाठी महत्त्वाच्या बाबी:१. निरोगी जनावरांची निवड व योग्य आरोग्य व्यवस्थापन निरोगी, निरोगी स्तनाग्रे असलेल्या जनावरांकडून दूध मिळणे आवश्यक आहे. जनावरांचे नियमित आरोग्य परीक्षण, लसीकरण, जंतनाशन आणि योग्य पोषण याकडे लक्ष द्यावे. आजारी किंवा उपचार सुरू असलेल्या जनावरांचे दूध स्वतंत्र ठेवावे.२. गोठ्याची स्वच्छता दूध काढण्याची जागा स्वच्छ, कोरडी आणि हवेशीर असावी. गोठ्यातील शेण, मूत्र आणि ओला कचरा नियमितपणे काढावा. दूध काढण्यापूर्वी जनावरांच्या आजूबाजूचा परिसर स्वच्छ ठेवणे महत्त्वाचे आहे.३. दूध काढणाऱ्या व्यक्तीची स्वच्छता दूध काढणाऱ्या व्यक्तीने स्वच्छ कपडे घालावेत आणि दूध काढण्यापूर्वी साबणाने हात स्वच्छ धुवावेत. हाताला जखम असल्यास योग्य काळजी घ्यावी. दूध काढताना धूम्रपान, तंबाखू सेवन किंवा अनावश्यक वस्तूंना हात लावणे टाळावे.४. कास व स्तनाग्रांची स्वच्छता दूध काढण्यापूर्वी कास व स्तनाग्रे स्वच्छ पाण्याने धुवून स्वच्छ कापडाने कोरडी करावीत. विशेषतः शेण किंवा माती लागलेली असल्यास अधिक काळजी घ्यावी. प्रत्येक जनावरासाठी स्वतंत्र स्वच्छ कापड वापरणे अधिक योग्य आहे.५. पहिल्या धारांचे निरीक्षण दूध काढण्यापूर्वी प्रत्येक स्तनाग्रातील पहिल्या काही धारांचे स्वतंत्र कपात निरीक्षण करावे. दूधात गुठळ्या, पाणीदारपणा, रक्त किंवा इतर असामान्यता दिसल्यास त्या जनावराकडे विशेष लक्ष द्यावे. अशा दुधाचे दूधसंकलनात मिसळणे टाळावे.६. स्वच्छ भांडी व उपकरणे दूध काढण्यासाठी स्टेनलेस स्टील किंवा अन्नासाठी योग्य साहित्याची स्वच्छ भांडी वापरावीत. भांडी वापरल्यानंतर लगेच धुऊन, निर्जंतुक करून पूर्णपणे वाळवावीत. ओलसर किंवा अस्वच्छ भांड्यांमध्ये दूध ठेवू नये.७. दूध गाळणे आणि त्वरित थंड करणे दूध काढल्यानंतर योग्य स्वच्छ फिल्टरद्वे दूध गाळावे. दूध शक्य तितक्या लवकर थंड करणे महत्त्वाचे आहे. दूध जास्त वेळ उबदार तापमानात राहिल्यास जिवाणूंची वाढ वेगाने होते आणि दुधाची गुणवत्ता कमी होते.मास्टायटिसपासून संरक्षणमास्टायटिसमुळे दुधाची गुणवत्ता आणि उत्पादन दोन्ही प्रभावित होतात. दूध काढण्यापूर्वी आणि नंतर योग्य ींशरीं वळींळिपस, स्वच्छ दूध काढण्याची पद्धत आणि आजारी जनावरांचे वेगळे व्यवस्थापन यामुळे मास्टायटिसचा धोका कमी करता येतो. संशयित जनावरांची उचढ (उरश्रळषेॲपळर चरींळींळी ढशीीं) द्वरे तपासणी केल्यास उपक्लिनिकल मास्टायटिस लवकर ओळखण्यास मदत होते. प्रतिजैविक अवशेष टाळा जनावराला प्रतिजैविक किंवा इतर औषधोपचार दिल्यानंतर पशुवैद्यकांनी सांगितलेला ुळींहवॲरुरश्र शिॲळेव पूर्ण होईपर्यंत त्याचे दूध मानवी सेवनासाठी किंवा दूधसंकलनासाठी वापरू नये. औषधांचे अवशेष दुधात राहिल्यास ग्राहकांच्या आरोग्यावर परिणाम होऊ शकतो. शेतकऱ्यांसाठी स्वच्छ दूध'चे सोपे सूत्रस्वच्छ जनावर फ स्वच्छ गोठा फ स्वच्छ हात फ स्वच्छ कास फ स्वच्छ भांडे फ योग्य दूध काढण्याची पद्धत फ त्वरित थंड करणे = सुरक्षित व गुणवत्तापूर्ण दूधशेवटी स्वच्छ दूध निर्मिती ही केवळ पशुपालकाची जबाबदारी नसून संपूर्ण दुग्ध साखळीची सामूहिक जबाबदारी आहे. स्वच्छ दूध – निरोगी ग्राहक – चांगला दर – अधिक नफा हे सूत्र प्रत्येक पशुपालकाने अंगीकारणे गरजेचे आहे. दूधाची गुणवत्ता वाढवण्यासाठी मोठा खर्च करण्याची नेहमीच गरज नसते; अनेक वेळा स्वच्छता, शिस्त आणि योग्य व्यवस्थापन यामुळेच मोठा फरक पडतो. त्यामुळे प्रत्येक पशुपालकाने आजपासूनच स्वच्छ दूध निर्मितीच्या सवयी अंगीकारून आपल्या कुटुंबाचे, ग्राहकांचे आणि दुग्धव्यवसायाचे आरोग्य सुरक्षित ठेवावे.



पशुवैद्यकीय अधिकारी – डॉ. प्रतीक बोरुडे (बी.व्ही.एस्सी आणि ए.एच, एम.व्ही.एस्सी)

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## नशिबाची परिक्षा

बुधवार दि. २३ सप्टेंबर २०२६

**मिलनम डे**

उदय-अस्त सिंगल ५-१-९ मजबुत

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ९ | १८०<br>२३४<br>२२५ | ४ | १४९<br>२४८<br>२०० | १ | १२८<br>२९०<br>१५५ |

९३-०९-४२-५४-१७-२१

**कल्याण**

उदय-अस्त सिंगल ९-४-५ मजबुत

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३ | १२०<br>२३८<br>३५५ | ८ | १८९<br>२६०<br>२३३ | २ | १२९<br>३४६<br>२५५ |

३७-१३-८९-५८-२०-६२

**मुंबैम (मेन)**

उदय-अस्त सिंगल ४-७-९ मजबुत

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ५ | १४०<br>२५८<br>३६६ | ६ | १२३<br>२४०<br>४६६ | ० | १४५<br>२३५<br>२९९ |

५४-१५-६२-३६-०९-२०

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri |
|---|---|---|---|---|---|
| 01/06/2026 to 05/06/2026 | 440 89 135 | 990 80 127 | 260 82 570 | 128 11 290 | 590 48 134 |
| 08/06/2026 to 12/06/2026 | 456 56 123 | 556 67 188 | 458 76 466 | 240 69 379 | 689 33 139 |
| 15/06/2026 to 19/06/2026 | 119 15 249 | 348 50 136 | 158 42 390 | 257 41 245 | 126 90 677 |
| 22/06/2026 to 26/06/2026 | 336 21 245 | 118 04 158 | 689 33 779 | 168 55 249 | 579 19 289 |
| 29/06/2026 to 03/07/2026 | 144 95 249 | 127 04 789 | 257 47 269 | 157 34 266 | 255 22 679 |
| 06/07/2026 to 10/07/2026 | 558 84 356 | 120 36 790 | 237 21 470 | 150 60 136 | 277 69 144 |
| 13/07/2026 to 17/07/2026 | 130 41 155 | 680 47 368 | 128 18 350 | 379 90 136 | 150 63 300 |
| 20/07/2026 to 24/07/2026 | 360 96 114 | 277 64 770 | 259 60 145 | 189 81 579 | 179 78 170 |
| 27/07/2026 to 31/07/2026 | 259 60 550 | 590 42 228 | 358 62 390 | 400 47 890 | 160 70 488 |
| 03/08/2026 to 07/08/2026 | 234 90 569 | 170 85 159 | 338 42 129 | 460 09 478 | 370 05 348 |
| 10/08/2026 to 14/08/2026 | 577 99 234 | 230 53 148 | 250 70 235 | 355 39 135 | 133 76 358 |
| 17/08/2026 to 21/08/2026 | 240 60 460 | 278 73 346 | 116 82 480 | 156 23 779 | 449 77 179 |
| 24/08/2026 to 28/08/2026 | 360 96 790 | 255 23 229 | 789 42 237 | 450 98 440 | 266 41 290 |
| 31/08/2026 to 04/09/2026 | 149 43 670 | 170 81 560 | 159 52 336 | 690 50 235 | 577 99 135 |
| 07/09/2026 to 11/09/2026 | 680 47 557 | 228 27 124 | 570 26 358 | 112 43 779 | 445 33 689 |
| 14/09/2026 to 18/09/2026 | 789 47 124 | 336 20 136 | 799 56 178 | 680 42 345 | 399 16 790 |

## द • ख • ल



## टाकळी ढोकेश्वर येथे कर्मवीर जयंती साजरी

**टाकळी ढोकेश्वर :** प्र.ग.खिलारी पाटील विद्यालयाच्या वतीने कर्मवीर भाऊराव पाटील यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.रयतेच्या शिक्षणासाठी आयुष्यभर कार्य करणारे थोर समाजसुधारक व शिक्षणप्रसारक कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या जयंतीनिमित्त प्र. ग. खिलारी पाटील माध्यमिक विद्यालयाच्या वतीने विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. जयंतीनिमित्त कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या प्रतिमेची टाकळी ढोकेश्वर गावामधून पारंपरिक वाद्यांच्या तालावर उत्साहात मिरवणूक काढण्यात आली.मिरवणुकीत विद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक व मान्यवर सहभागी झाले होते. यावेळी विद्यार्थिनींनी सादर केलेल्या अप्रतिम लेझीम नृत्याने उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले.पारंपरिक वेशभूषेतील विद्यार्थिनींचे शिस्तबद्ध व उत्स्फूर्त लेझीम सादरीकरण हे मिरवणुकीचे विशेष आकर्षण ठरले. यावेळी मान्यवरांनी कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले व कर्मवीर अण्णांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याचे स्मरण करण्यात आले.ग्रामीण व वंचित समाजातील विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी मिळावी यासाठी त्यांनी केलेले कार्य आजही प्रेरणादायी असल्याचे उपस्थितांनी सांगितले. कमवा आणि शिका' या विचारातून शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी कर्मवीर भाऊराव पाटील यांनी दिलेले योगदान समाजासाठी सदैव प्रेरणादायी राहील. त्यांच्या विचारांचा आदर्श घेऊन विद्यार्थ्यांनी शिक्षणाच्या माध्यमातून समाजाच्या प्रगतीत योगदान द्यावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले. यावेळी खा.निलेश लंके प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष रविंद्र राजदेव, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष पंडितराव झावरे, मळीभाऊ रांधवण,उपसरपंच रामभाऊ तराळ, रविंद्र बांडे,खामकर सर,शिक्षक कर्णा रोकडे,राऊत सर,भोंडवे सर,घोडके सर,भिंगारे सर,रोहकले मॅडम, थोरात मॅडम,ठागणे मॅडम,पवार मॅडम,विद्यार्थी तसेच परिसरातील नागरिक उपस्थित होते.

## मळगंगा युवा साईधाम गणेश मंडळाचे धार्मिक व सामाजिक काम मोठे : कारखिले



**निघोज :** मळगंगा युवा साईधाम गणेश मंडळाचे धार्मिक व सामाजिक काम मोठे असून निघोज परिसराच्या विकासासाठी मोठ्या प्रमाणात योगदान देऊन या मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी व सदस्यांनी सामाजिक सेवाभाव केला असल्याचे प्रतिपादन भाजपचे युवा मोर्चाचे जिल्हा उपाध्यक्ष पंकज कारखिले यांनी व्यक्त केले आहे. कारखिले यांनी मंडळाला सदिच्छा भेट दिली व बाप्पाचे दर्शन घेतले. यावेळी मंडळाचे ज्येष्ठ मार्गदर्शक व भाजपचे तालुका सरचिटणीस मोहनशेठ खराडे यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी संदीप पाटील वराळ जनसेवा फौंडेशनचे ज्येष्ठ मार्गदर्शक सुनील पवार, लहू निचीत, प्रकाश उनवने, जयसिंग हरेल, मंगेश भागवत, शुभम निघोजकर, भास्करराव कवाद, बाळा दिवसे, चैतन्य खराडे, तुषार श्रीमंदीलकर, राकेश सोनवणे, प्रथमेश चव्हाण, विकास लाळगे, निल हरेल, हरि निघोजकर आदी यावेळी उपस्थित होते.

## श्रीआनंद विद्यालय वार्षिक बक्षीस वितरण सोहळा संपन्न



**शिराळ चिचोंडी :** पाथर्डी तालुक्यातील श्री आनंद विद्यालयात मार्च२०२६मध्ये घेण्यात आलेल्या एस एस सी व एच एस सी परीक्षेत यश संपादन केलेल्या तसेच विविध क्षेत्रातील क्रीडा यश शिष्यवृत्ती परीक्षेत यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव कार्यक्रम विद्यालयात माननीय प्रमोद शेठ गुगळे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. या कार्यक्रमासाठी चिचोंडी चे सरपंच श्रीकांत आटकर,उपसरपंच आबा गरुड, माजीपोलीस उपनिरीक्षक विठ्ठल गायकवाड,डमाळवाडी चे सरपंच अंबादास डमाळे,आनंद गुगळे संभाजी आव्हाडपप्पू जाधव,गीते सर जंगम मॅडमविद्यालयाचे प्राचार्य श्री संजय शिंदे बिपिन खंडागळे उपस्थित होते. इयत्ता दहावी व बारावीचे प्रथम,,द्वितीय,तृतीययेणाऱ्या विद्यार्थ्यांना अनुक्रमे ३४ हजार ते अठरा हजार व सहा हजार याप्रमाणे अनेक बक्षीस तसेच ट्रॉफी देऊन सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री राजेंद्र बोरुडे सर यांनी केले व सूत्रसंचालन अभय जावळे सर यांनी केले. तसेच शाळेतील शिक्षक सागर गुंदेचा,वडघुले मॅडम,सोनवणे सर,तरोडे सर,तुपे सर वाघसर,पालवे सर,अडसूळ सर व शिक्षक शिक्षकेतरकर्मचारी यांनी मोलाचे सहकार्य केले. शेवटी उपस्थितांचे लाड मॅडम यांनी आभार मानले

## मुंगी येथे कृभकोचा सहकारी संस्था दत्तक योजने अंतर्गत कार्यक्रम संपन्न



**हातगाव :** शेवगाव तालुक्यातील मुंगी येथे सेवा संस्थेच्या सर्वसाधारण सभेचे औचित्य साधून कृभकोच्या वतीने सहकारी संस्था दत्तक योजने अंतर्गत नुकताच कार्यक्रम संपन्न झाला आहे. अशी माहिती कुभकोचे अशी माहिती वरिष्ठ क्षेत्र प्रतिनिधी सुदर्शन पाटील यांनी दिली आहे. या वेळी त्यांनी म्हटले आहे की ,या उपक्रमाचा उद्देश सहकारी संस्थांशी समन्वय वाढवून शेतकऱ्यांना मृदाआरोग्य, संतुलित खत व्यवस्थापन व आधुनिक शेती पद्धतींबाबत मार्गदर्शन करणे हा आहे. यावेळी मुंगी विविध कार्यकारी सहकारी सेवा सोसायटीला कृभकोतर्फे आहुजा कंपनीचा बी टी ८८० चा स्पीकर भेट देण्यात आला. या वेळी पाटील यांनी उपस्थित शेतकऱ्यांना अहिल्यानगर जिल्ह्यात कृभकोच्या कार्याची माहिती देताना युरिया, डीएपी, झिंक सल्फेट, रायझोसुपर, जैविक खत व सिटी कंपोस्ट या उत्पादनांच्या योग्य वापराबाबत मार्गदर्शन केले. तसेच माती परीक्षण करून पिकांच्या गरजेनुसार खतांचा संतुलित वापर करावा, असे आवाहन केले. कार्यक्रमास सोसायटीचे पदाधिकारी व परिसरातील शेतकरी उपस्थित होते.

# दुष्काळी शिवाराला 'मुळा' धरणाच्या पाण्याची 'आस' !

### वांबोरी चारीतून पाणी बळीराजाच्या शिवारात पोहोचवा ; अंजना येवले

**शशिकांत पवार । राष्ट्र सह्याद्री**



**नगर तालुका :** मुळा धरणाच्या ओव्हरफ्लोचे पाणी दुष्काळी जेऊर पंचक्रोशीपर्यंत पोहोचविण्यासाठी वांबोरी चारीला या भागाशी जोडण्यात यावे अशी मागणी बहिरवाडीच्या माजी सरपंच अंजना येवले यांच्यासह पंचक्रोशीतील शेतकरी व ग्रामस्थांनी केली आहे. मुळा धरणातील पाणी लिफ्टद्वारे बहिरवाडी, चापेवाडी, ससेवाडी, डोंगरगण, मांजरसुंबा, धनगरवाडी, जेऊर व इमामपूर परिसरात आणल्यास हजारो हेक्टर शेतीला सिंचनाचा आधार मिळू शकतो. त्यासाठी 'मास्टर प्लॅन' करण्याची गरज असल्याचे मत अंजना येवले यांनी व्यक्त केले आहे.

जेऊर पंचक्रोशीतील गावे डोंगररांगांमध्ये व घाटमाथ्यावर वसलेली आहेत. पावसाळ्यात पाणी मोठ्या प्रमाणात वाहून जाते. मात्र उन्हाळ्यात याच भागातील तलाव, बंधारे, विहिरी आणि बोअरवेल कोरड्या पडतात. परिणामी शेतकऱ्यांसमोर शेतीबरोबरच पशुधनासाठी चारा व पिण्याच्या पाण्याचे मोठे संकट उभे राहते. दरवर्षी टँकरने पाणीपुरवठा करण्याची वेळ येते.

वांबोरी चारी गुंजाळे, पांढरीपुल, खोसपुरी व आव्हाडवाडी परिसरातून गेलेली आहे. या भागातून इमामपूर व कोल्हार घाटमाथ्याकडे पाणी लिफ्ट करून पुढे मांजरसुंबा, डोंगरगण, चापेवाडी, इमामपूर, बहिरवाडी व ससेवाडीच्या डोंगररांगांमध्ये सोडल्यास संपूर्ण परिसराच्या पाण्याचा प्रश्न बदलू शकतो. पावसाळ्यात वाहून जाणारे ओव्हरफ्लोचे पाणी तलाव, बंधारे व नाल्यांमध्ये साठविल्यास त्याचा थेट फायदा शेतकऱ्यांना होणार आहे.

जेऊर परिसरातील अनेक लहान-मोठे तलाव भरल्यानंतर दोन-तीन महिने शेती व पिण्याच्या पाण्याचा प्रश्न काही प्रमाणात सुटतो. त्यामुळे मुळा धरणाचे पाणी या भागात कायमस्वरूपी आणल्यास भूजलपातळी वाढण्यासह शेतीला सिंचनाचा आधार मिळू शकतो. पशुधन मोठ्या प्रमाणात असल्याने पाणी उपलब्ध झाल्यास चारा उत्पादनालाही चालना मिळणार आहे. पाण्याचा पुढे पिंपळगाव माळवी तलाव भरण्यासाठी उपयोग होऊन पिंपळगाव माळवी, शेंडी, पोखर्डी परिसरालाही मोठा फायदा होऊ शकतो.

मुळा धरण भरलेले असतानाही दुष्काळी पट्ट्यातील शेतकऱ्यांच्या शिवारात पाणी पोहोचत नाही ही परिस्थिती बदलण्याची गरज आहे. आमदार अक्षय कर्डिले यांच्या माध्यमातून पालकमंत्री राधाकृष्ण विखे, सुजय विखे व आ. संग्राम जगताप यांच्या सहकार्याने मुळा धरणातून जेऊर पट्ट्याला पाणी मिळविण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार असल्याचे अंजना येवले यांनी सांगितले.

**टँकर नको; शेतात हक्काचे पाणी हवे !**

पावसाच्या पाण्यावर अवलंबून असलेल्या जेऊर पंचक्रोशीतील शेतकऱ्यांना वारंवार दुष्काळाचा सामना करावा लागतो. मुळा धरणाचे पाणी तलाव-बंधाऱ्यांत साठल्यास शेतीसोबत पशुधनासाठी चारा आणि पिण्याच्या पाण्याची उपलब्धताही वाढू शकते.



**शिवार तहानलेले; धरण मात्र तुडुंब !**

मुळा धरणात मुबलक पाणी असतानाही जेऊर पंचक्रोशीतील अनेक तलाव व विहिरी उन्हाळ्यात कोरड्या पडतात. असे चित्र अनेक वेळा पाहावयास मिळते. ओव्हरफ्लोचे पाणी वांबोरी चारीतून या भागात आणल्यास तहानलेल्या शिवाराला मोठा आधार मिळू शकतो.

## पारनेरच्या पाणीप्रश्नावर मुंबईत महत्त्वपूर्ण बैठक

### वर्षभरात योजना पूर्ण करण्याचे उपमुख्यमंत्री शिंदे यांचे आश्वासन

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**पारनेर :** पारनेर शहराच्या गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या पाणीप्रश्नाला कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी पालकमंत्री तथा जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या नेतृत्वाखाली पारनेर नगरपंचायतीचे माजी नगराध्यक्ष विजयराव औटी यांनी मुंबई येथे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेऊन पाणीपुरवठा योजनेबाबत सविस्तर चर्चा केली.



पारनेर शहराची वाढती लोकसंख्या, भविष्यातील पाण्याची वाढती गरज तसेच सध्याच्या पाणीपुरवठा व्यवस्थेमुळे नागरिकांना भेडसावणाऱ्या अडचणी याबाबत औटी यांनी उपमुख्यमंत्री शिंदे यांचे लक्ष वेधले. पारनेर शहरासाठी दीर्घकालीन आणि शाश्वत पाणीपुरवठा व्यवस्था निर्माण करण्यासाठी शासनाने ठोस निर्णय घेऊन कालबद्ध पद्धतीने या योजनेचे काम मार्गी लावावे, अशी मागणी केली.

यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पारनेर शहराच्या पाणीप्रश्नाकडे शासन सकारात्मकपणे पाहत असून येत्या सहा महिन्यांत या योजनेच्या निविदा प्रक्रियेला सुरुवात करण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्यात येईल. त्यानंतर साधारण एका वर्षाच्या कालावधीत योजना पूर्ण करण्यासाठी शासनस्तरावर प्रयत्न केले जातील, असे आश्वासन दिले.

पारनेर शहराचा पाणीप्रश्न हा दरवर्षी उन्हाळ्यात निर्माण होणाऱ्या टंचाईपुरता मर्यादित नसून भविष्यातील शहराची गरज लक्षात घेऊन कायमस्वरूपी उपाययोजना करणे आवश्यक आहे. त्यामुळे नव्या पाणीपुरवठा योजनेच्या माध्यमातून पारनेरकरांना नियमित आणि पुरेसा पाणीपुरवठा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने हा पाठपुरावा करण्यात आला असल्याचे माजी नगराध्यक्ष विजयराव औटी यांनी सांगितले.

## गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर निमगाव वाघात वृक्षारोपण

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**अहिल्यानगर :** गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत निमगाव वाघा (ता. नगर) येथे स्व. पै. किसनराव डोंगरे बहुउद्देशीय संस्था, श्री नवनाथ युवा मंडळ आणि धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालय यांच्या संयुक्त विद्यमाने वृक्षारोपण करण्यात आले. श्री संत शिरोमणी सावता महाराज मंदिर परिसरात हा उपक्रम राबविण्यात आला.

धार्मिक उत्सवाला सामाजिक आणि पर्यावरणपूरक उपक्रमांची जोड देण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या वृक्षारोपण उपक्रमात ग्रामस्थांनी सहभाग नोंदविला. मंदिर परिसरात विविध प्रकारची झाडे लावून त्यांचे संगोपन करण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला. यावेळी ग्रामपंचायत सदस्य पै. नाना डोंगरे, विधीज्ञ ड. राजेश कावरे, साहेबराव बोडखे, लक्ष्मण चौरे, भाऊसाहेब आनंदकर, भागचंद जाधव, बापू पुंड, सिताराम फलके, भाऊसाहेब जाधव, बबन जाधव, प्रमोद जाधव, भरत बोडखे, संदीप डोंगरे, सदाशिव कापसे, सुशांत जाधव, नवनाथ हारदे, विजय जाधव, जयराम जाधव आदी उपस्थित होते. श्री संत शिरोमणी सावता महाराज मंदिर परिसरात वृक्षारोपण करून धार्मिक स्थळाच्या परिसरातही हिरवाई वाढविण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. आज लावलेले प्रत्येक झाड भविष्यात अनेकांना सावली, शुद्ध हवा आणि पर्यावरणाचा आधार देणार असल्याचे त्यांनी सांगितले.

ॲड. राजेश कावरे म्हणाले की, पर्यावरणाचे रक्षण ही केवळ शासनाची किंवा एखाद्या संस्थेची जबाबदारी नसून ती प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी आहे. आपण विकासाच्या दिशेने पुढे जात असताना निसर्गाचा समतोलही जपला पाहिजे. वृक्षांची संख्या वाढविण्याबरोबरच लावलेल्या झाडांचे संवर्धन करणे अधिक महत्त्वाचे आहे. गणेशोत्सव हा मोठ्या उत्साहाचा आणि जनसहभागाचा उत्सव आहे. त्यामुळे या उत्सवाच्या माध्यमातून पर्यावरणाचा संदेश गावागावात पोहोचविता येऊ शकतो. धार्मिक स्थळांच्या परिसरात वृक्षारोपण केल्यामुळे भाविकांनाही निसर्ग संवर्धनाची प्रेरणा मिळत असल्याचे त्यांनी सांगितले.

## गणेश मंडळांनी विधायक उपक्रम राबवावेत : पो. नि. वारुळे



**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**चिचोंडी पाटील :** रक्तदान शिबिर हा मानवतावादी उपक्रम आहे. स्मृती प्रतिष्ठानने ही परंपरा जपली आहे . गणेश मंडळांनी अशेच मानवतावादी उपक्रम राबवावेत . असे प्रतिपादन नगर तालुक्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक गणेश वारूळे यांनी केले . चिचोंडी पाटील येथील स्मृती प्रतिष्ठान व जनकल्याण रक्तपेढी अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते . त्यावेळेस ते बोलत होते . अध्यक्षस्थानी प्रसिद्ध साहित्य डॉ. संजय कळमकर तर प्रमुख पाहुणे म्हणून मढी देवस्थान ट्रस्टचे कार्याध्यक्ष महादेव कोकाटे होते.

यावेळी सुधीर भद्रे, बाजीराव हजारे, कल्याण ठोंबरे, अमोल कोकाटे, पांडुरंग ससे, राजेंद्र कोकाटे, बाळासाहेब ठोंबरे, महेश जगताप, विजय गाडे, अरुण दवणे, पंडित भद्रे, आनंदा मुटकुळे, भाऊसाहेब हजारे, दीपक हजारे, जयवंत तनपुरे, शैलेश पवार, अशोक खराडे, शिवाजी ससाणे, प्रकाश जाधव, राम घोडके, पांडुरंग वाडेकर, दीपक कांबळे, कृष्णा थोरात, सागर खडके, शरद कोकाटे, सुखदेव कोकाटे, बाबासाहेब सरोदे, सिताराम कोकाटे, राम कोकाटे, सचिन सुरवसे, लक्ष्मण खेडकर व सर्व सदस्य तसेच ग्रामस्थ मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

## ढोल-ताशांच्या गजरात कोरडगाव दुमदुमले; कर्मवीरांच्या विचारांचा जागर

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**कोरडगाव :** न्यू इंग्लिश स्कूल, कोरडगाव येथे रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक कर्मवीर भाऊराव पाटील यांना विविध उपक्रमांनी व सवाद्य मिरवणुकीने विनम्र अभिवादन करण्यात आले. कर्मवीरांच्या जयंतीनिमित्त सकाळी शाळेच्या प्रांगणात सजविण्यात आलेल्या आकर्षक रथात कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या प्रतिमेची प्रतिष्ठापना करण्यात आली. शाळेचे मुख्याध्यापक चांडे सर यांच्यासह सर्व शिक्षकवृंदाने प्रतिमेचे पूजन करून अभिवादन केले.

यानंतर फुंदे सर व पाखरे सर यांच्या नेतृत्वाखाली ढोल-ताशा पथक, विद्यार्थ्यांचे झांज पथक तसेच मुलींच्या टिपऱ्या पथकाच्या तालावर कोरडगावातून भव्य सवाद्य मिरवणूक काढण्यात आली. ढोल-ताशांचा निनाद, झांजांचा कडकडाट आणि टिपऱ्यांच्या तालाने संपूर्ण कोरडगावचे वातावरण भारावून गेले.

मिरवणुकीदरम्यान 'स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद', 'कमवा व शिका' यांसह कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या शैक्षणिक विचारांचा जयघोष करण्यात आला. या घोषणांनी आसमंत दुमदुमून गेला आणि संपूर्ण वातावरणात शिक्षण, स्वावलंबन व सामाजिक बांधिलकीची वेगळीच लय निर्माण झाली.

कर्मवीरांनी ग्रामीण व वंचित घटकांतील विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाची दारे खुली केली. त्यांच्या 'कमवा व शिका' या विचारातून विद्यार्थ्यांना स्वावलंबनाचा मार्ग दाखविला. त्यांच्या याच विचारांचा जागर मिरवणुकीच्या माध्यमातून करण्यात आला.

या मिरवणुकीत शाळेतील सर्व विद्यार्थी, शिक्षक, माजी विद्यार्थी, पालक, ग्रामस्थ व शिक्षणप्रेमी नागरिक मोठ्या उत्साहाने सहभागी झाले होते. पारंपरिक वाद्यांच्या गजरात निघालेल्या या मिरवणुकीमुळे कोरडगावात दिवसभर शिक्षणमय वातावरण निर्माण झाले होते. कर्मवीरांच्या विचारांचा वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

## पूजा मडके यांची शिक्षण सेवकपदी निवड

**अमरापुर :** प्रतिकूल परिस्थितीवर मात करत सातत्यपूर्ण मेहनत, जिद्द आणि ध्येयावर ठाम विश्वास ठेवून सौ. पूजा महेश मडके यांनी उल्लेखनीय यश संपादन केले आहे. नाशिक जिल्हा परिषदेत पदवीधर शिक्षण सेवकपदी त्यांची निवड झाली असून, त्यांच्या या यशाबद्दल कुटुंबीय, नातेवाईक, मित्रपरिवार तसेच परिसरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



पूजा मडके यांनी शिक्षक होण्याचे ध्येय मनाशी बाळगून सातत्याने अभ्यास, मेहनत आणि चिकाटी कायम ठेवली. विविध अडचणींवर मात करत त्यांनी ध्येयाच्या दिशेने वाटचाल सुरू ठेवली. अखेर त्यांच्या मेहनतीला यश मिळाले असून, शिक्षक होण्याचे स्वप्न साकार झाले आहे. या यशामागे त्यांचे पती महेश मडके, शिवाजीराव मडके, यांचे मोलाचे मार्गदर्शन, प्रेरणा आणि सहकार्य लाभले.

# पावसाने पाठ फिरवली, भगवानगडाच्या विहिरीने मात्र धरली जलधारा!

### तुडुंब भरलेल्या विहिरीवर हेलिकॉप्टरमधून पुष्पवृष्टी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पाथर्डी :** परिसरात पावसाने दडी मारल्याने तलाव, बंधारे आणि विहिरींची पाणीपातळी दिवसेंदिवस खालावत असताना श्री क्षेत्र भगवानगडाच्या पायथ्याशी डोंगराच्या कुशीत असलेली एक विहीर मात्र काठोकाठ पाण्याने भरलेली असल्याने सध्या चर्चेचा विषय ठरली आहे. विशेष म्हणजे या विहिरीतून सातत्याने पाण्याचा उपसा होत असतानाही पाणीपातळी कमी होत नसल्याने भाविकांसह परिसरातील नागरिकांमध्ये कुतूहल निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर श्री क्षेत्र भगवानगडाचे उत्तराधिकारी ह.भ.प. महंत श्रीगुरु श्री. कृष्णा महाराज शास्त्री आणि जय भगवान महासंघाचे अध्यक्ष बाळासाहेब सानप यांच्या हस्ते हेलिकॉप्टरमधून या विहिरीवर पुष्पवृष्टी करण्यात आली. हा नयनरम्य सोहळा पाहण्यासाठी हजारो भाविक उपस्थित होते.

नागलवाडी-बोधेगाव रस्त्यालगत भगवानगडाच्या शेतजमिनीला लागून असलेली ही विहीर गेल्या काही दिवसांपासून परिसराचे लक्ष वेधून घेत आहे. पावसाअभावी परिसरातील जलस्रोतांची पाणीपातळी खालावत असून खरीप पिकांवरही पावसाअभावी संकट निर्माण झाले आहे. मात्र, या विहिरीत मुबलक पाणीसाठा कायम असल्याचे दिसून येत आहे. भगवानगडावर संत ज्ञानेश्वर माऊली मंदिराचे बांधकाम वेगाने सुरू असून भाविकांसाठी अखंड अन्नदान सुरू आहे. तसेच गडावरील गोशाळेतील गोधनासाठी मोठ्या प्रमाणात पाण्याची आवश्यकता असते. या सर्व कामांसाठी या विहिरीतील पाण्याचा वापर होत असल्याचे सांगण्यात येते. सातत्याने पाणी उपसा होऊनही विहिरीतील पाणी टिकून असल्याने या जलस्रोताबाबत विशेष चर्चा सुरू झाली आहे.

या विहिरीचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे अवघ्या दीडशे फुटांच्या अंतरावर नागलवाडी परिसरातील खासगी विहीर आहे. मात्र, त्या विहिरीतील पाणीसाठा अत्यल्प असून ती जवळपास कोरडी पडली आहे. एकाच परिसरात इतक्या कमी अंतरावर असलेल्या दोन विहिरींच्या पाणीपातळीत मोठी तफावत असल्याने नागरिकांमध्ये कुतूहल निर्माण झाले आहे. विहिरीतील पाण्याची माहिती परिसरात व सोशल मीडियावर पसरल्यानंतर अनेक नागरिकांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली.

भगवानगडाला संत भगवानबाबांच्या अध्यात्मिक परंपरेचा वारसा लाभला आहे. संत भगवानबाबांनी पाण्यावर गाथा वाचन केल्याची परंपरा भाविकांमध्ये सांगितली जाते. त्यामुळे या विहिरीत कायम असलेल्या पाण्याकडे अनेक भाविक श्रद्धेच्या दृष्टीने पाहत असून, ही संत भगवानबाबांची कृपा असल्याची भावना व्यक्त केली जात आहे. मात्र, या विहिरीला पाणीपुरवठा करणारा नैसर्गिक स्रोत नेमका कोणता, याचा शास्त्रीय अभ्यास होणेही आवश्यक आहे. भूजल तज्ज्ञांकडून पाहणी व अभ्यास झाल्यास या विहिरीची पाणीपातळी टिकून राहण्यामागील नैसर्गिक कारणे स्पष्ट होण्यास मदत होऊ शकते.



दरम्यान, विहिरीवर हेलिकॉप्टरमधून झालेल्या पुष्पवृष्टीच्या वेळी भगवानगड परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले. भाविकांनी मोठ्या उत्साहात हा सोहळा अनुभवला. दिवसभर विहिरीचे पाणी पाहण्यासाठी येणाऱ्या भाविकांच्या स्वागतासाठी घोगस-पारगाव येथील लेझीम पथकाने पारंपरिक लेझीमचे डाव सादर केले. त्यामुळे भगवानगड परिसरात श्रद्धा, जलस्रोत आणि लोकपरंपरेचा अनोखा संगम पाहायला मिळाला.

# दखल



## घरच्या गणपतीसाठी केला पुरातन मंदिराचा इको फ्रेंडली देखावा

**निरगुडसर** : निरगुडसर (ता. आंबेगाव) येथील वळसे मळा येथील तन्मय दीपक वाळुंज या विद्यार्थ्याने घरच्या गणपतीसाठी पुरातन काळातील मंदिराचा हुबेहूब देखावा साकारला असून, या देखाव्यासाठी पूर्णपणे इको-फ्रेंडली वस्तूंचा वापर केल्याने त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

तन्मयने या मंदिराच्या निर्मितीसाठी पुठ्ठा, रद्दी, दगडे, वडाच्या पारंब्या, घरातील भांडी, वॉटर कलर आणि वाळलेल्या झाडांच्या फांद्या यांसारख्या टाकाऊ पासून टिकाऊ वस्तूंचा वापर केला आहे. प्लास्टिकचा वापर पूर्णपणे टाळत त्याने निसर्गपूरक देखावा तयार केला आहे. निरगुडसरचा असलेला तन्मय सध्या बेल्हे येथे शिक्षण घेत आहे. मात्र, दरवर्षी गणेशोत्सवासाठी घरच्या गणपती समोर सामाजिक संदेश देणारे आणि पर्यावरणपूरक असे वेगवेगळे देखावे तयार करत असतो. यंदाही त्याने साकारलेल्या पुरातन मंदिराच्या देखाव्याने ग्रामस्थांचे लक्ष वेधून घेतले आहे.

## पोकलेन मशीनमधून १५० लिटर डिझेल चोरी; अडीच लाखांचे नुकसान

निरगुडसर : आंबेगाव तालुक्यातील महाळुंगे पडवळ गावच्या हद्दीत, वेताळबा मंदिराजवळील खडी क्रेशरच्या प्लॉटवर उभ्या असलेल्या पोकलेन मशीनचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्यांनी सुमारे १५० लिटर डिझेल चोरल्याची घटना समोर आली आहे. तसेच मशीनच्या मॉनिटर, ए.सी., सनरूफ, प्लास्टिक पॅनल व शीटची तोडफोड करून सुमारे अडीच लाख रुपयांचे नुकसान केल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

याबाबत गिरवली येथील भाऊसाहेब बंडू पाटील (वय ४८) यांनी मंचर पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे.पोलिसांना दिलेल्या माहितीनुसार, पाटील यांच्या मालकीचे पोकलेन मशीन महाळुंगे पडवळ येथील वेताळबा मंदिराजवळ प्रशांत वऱ्हाडी यांच्या खडी क्रेशरच्या प्लॉटवर सुमारे महिनाभरापासून भाडेतत्त्वावर कामासाठी ठेवण्यात आले होते. मशीनवर रोहित कुमार यादव हा चालक म्हणून काम करतो. १८ सप्टेंबर रोजी सायंकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास काम संपल्यानंतर चालकाने मशीन क्रेशरच्या ठिकाणी उभे करून लॉक केले आणि तो घरी गेला. त्यानंतर १९ सप्टेंबर रोजी सकाळी सुमारे ९ वाजता मशीनजवळ पोहोचल्यानंतर डिझेल टाकीचे कुलूप तुटलेले तसेच मशीनच्या विविध भागांची तोडफोड झाल्याचे त्याच्या निदर्शनास आले.

डिझेल टाकीची तपासणी केली असता सुमारे १५० लिटर डिझेल चोरीस गेल्याचे आढळून आले. चोरीला गेलेल्या डिझेलची किंमत अंदाजे १५ हजार रुपये असल्याचे तक्रारीत नमूद आहे. याशिवाय मशीनच्या मॉनिटर, ए.सी., सनरूफ प्लास्टिक पॅनल व शीटचे नुकसान झाले असून या नुकसानीची अंदाजे किंमत २ लाख ५० हजार रुपये असल्याचे फिर्यादीने सांगितले आहे. या प्रकरणी अज्ञात चोरट्याविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्याची मागणी भाऊसाहेब पाटील यांनी केली असून, घटनेचा तपास मंचर पोलीस करीत आहेत.

## शेळ्यांच्या चोरीसाठी रात्री संशयितांची घिरट्या

यवत : दौंड तालुक्यातील नाथांचीवाडी येथील इरिगेशन ऑफिस परिसरात गेल्या काही दिवसांपासून शेळ्यांच्या चोरीच्या तक्रारी वाढल्या आहेत. रात्रीच्या वेळी शेळ्या चोरण्याच्या उद्देशाने संशयित व्यक्ती व वाहने परिसराची पाहणी करीत असल्याचे नागरिकांच्या निदर्शनास आले आहे. त्यामुळे पशुपालकांमध्ये चिंतेचे वातावरण आहे.चोरांकडून चोरीपूर्वी परिसराची रेकी केली जाण्याची शक्यता असून, रात्रीच्या अंधाराचा फायदा घेत गोठ्यातून किंवा घरासमोरून शेळ्या चोरण्याचे प्रकार यापूर्वीही घडले आहेत. काही महिन्यांपूर्वी इरिगेशन ऑफिस परिसरातून रात्रीच्या वेळी शेळ्या चोरीला गेल्याची घटना घडली होती.शेळ्यांची चोरी रोखण्यासाठी पशुपालकांनी गोठ्यांना मजबूत कुलूप व जाड साखळीचा वापर करावा. गोठ्याच्या परिसरात तसेच मुख्य रस्त्याच्या दिशेने सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत. मोबाईलवरून थेट पाहता येणाऱ्या कॅमेऱ्यांचाही वापर करता येतो. रात्री गोठ्याच्या परिसरात पुरेसा प्रकाश राहील, याची काळजी घ्यावी.

# भीमाशंकरच्या वार्षिक सभेत निधीवरून सवाल-जवाब; सभेनंतर धरणे आंदोलन

## भीमाशंकर कारखान्याच्या सभेत आरोप-प्रत्यारोप; भाग विकास निधीवरून वाद

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पारगाव** : पारगाव दत्तात्रयनगर येथे सोमवारी (दि. २१) भीमाशंकर सहकारी साखर कारखान्याची ३० वी वार्षिक सर्वसाधारण सभा झाली. या सभेत भाग विकास निधी आणि शैक्षणिक निधीच्या कपातीसह कारखान्याच्या काही बाबींवरून माजी अध्यक्ष देवदत्त निकम व शिवसेनेचे नेते अरुण गिरे यांनी प्रश्न उपस्थित केले. त्यावर कारखाना व्यवस्थापनाच्या वतीने निधीच्या खर्चाबाबत माहिती देण्यात आली.

सभेच्या अध्यक्षस्थानी कारखान्याचे अध्यक्ष बाळासाहेब बेंडे होते. यावेळी संस्थापक व माजी मंत्री दिलीप वळसे पाटील, माजी आमदार पोपटराव गावडे, जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष विवेक वळसे पाटील, उपाध्यक्ष प्रदीप वळसे पाटील, पंचायत समितीचे सभापती कैलासबुवा काळे, बाजार समितीचे सभापती नीलेश थोरात यांच्यासह संचालक व सभासद उपस्थित होते.

**निधीच्या मुद्द्यावरून मतभेद :**

सभेत देवदत्त निकम आणि अरुण गिरे यांनी



भाग विकास निधी कपात तसेच कारखान्याच्या शिक्षण संस्थेसाठी करण्यात येणाऱ्या शैक्षणिक निधी कपातीबाबत आक्षेप नोंदविले. या विषयावर सभेत काही काळ चर्चा आणि मतभेद झाले. त्यानंतर काही समर्थकांमध्ये बाचाबाची झाल्याने गोंधळाचे वातावरण निर्माण झाले.

सभा संपल्यानंतर निकम आणि गिरे यांच्या समर्थकांनी कारखान्याच्या गेटवर सुमारे अर्धा तास धरणे आंदोलन केले. सभा अपेक्षेप्रमाणे चर्चा न होता संपविण्यात आल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला.

**वळसे पाटील यांचे स्पष्टीकरण :**

सभेत दिलीप वळसे पाटील यांनी कारखान्याच्या कामकाजाबाबत संस्थेची भूमिका मांडली. कारखान्याचे कामकाज सभासदांच्या सहकार्याने सुरू असून, कारखान्याला राज्य व देशपातळीवर ३० पुरस्कार मिळाल्याचे त्यांनी सांगितले.

कारखान्यावर करण्यात येणाऱ्या भ्रष्टाचाराच्या आरोपांचा संदर्भ देत वळसे पाटील यांनी हे आरोप चुकीचे असल्याचे सांगितले. देवदत्त निकम यांना यापूर्वी कारखान्याचे अध्यक्ष, बाजार समितीचे सभापती आणि शिरूर लोकसभेची उमेदवारी मिळाल्याचा उल्लेखही त्यांनी केला.

**निधी खर्चाबाबत व्यवस्थापनाची माहिती :**

वळसे पाटील यांच्या म्हणण्यानुसार, २००८ पासून भाग विकास निधीची कपात सुरू असून भाग विकास व शिक्षण निधीतून आतापर्यंत सुमारे २० कोटी रुपयांचा खर्च करण्यात आला आहे. विविध गावांतील विकासकामे, शिक्षण संस्था, दत्तात्रय वळसे पाटील स्मारक, खंडोबा मंदिर तसेच दुष्काळग्रस्त गावांना मदत यासाठी हा निधी वापरण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

दरम्यान, निधीच्या वापराबाबत उपस्थित करण्यात आलेल्या प्रश्नांवर कारखाना व्यवस्थापनाने आपली बाजू सभासदांसमोर मांडली. कार्यकारी संचालक चंद्रकांत ढगे यांनी वार्षिक अहवालाचे वाचन केले, तर अध्यक्ष बाळासाहेब बेंडे यांनी कारखान्याच्या विविध योजनांची माहिती दिली.

## पदव्युत्तर प्रवेशाच्या तिसऱ्या फेरीत पुण्यात गोंधळ

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** राज्यातील चारही कृषी विद्यापीठांतील कृषी व संलग्न पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या रिक्त जागांसाठी पुणे कृषी महाविद्यालयात सोमवारी आणि मंगळवारी तिसरी केंद्रीभूत प्रवेश फेरी घेण्यात आली. रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय रूपांतर करून गुणवत्तेनुसार प्रवेश देताना काही विद्यार्थ्यांनी आक्षेप घेतल्याने मंगळवारी प्रवेश प्रक्रियेदरम्यान गोंधळाची स्थिती निर्माण झाली. काही काळ प्रवेश प्रक्रिया थांबवून पोलिसांना पाचारण करावे लागले. त्यामुळे सायंकाळपर्यंत विद्यार्थी आणि पालकांमध्ये संभ्रमाचे वातावरण होते.

पदव्युत्तर प्रवेशासाठी उपलब्ध असलेल्या २६० रिक्त जागांसाठी ५८६ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. सोमवारी पहिल्या दिवशी संबंधित प्रवर्गातील उपलब्ध जागांवर प्रवेश देण्यात आला. त्यापैकी १३६ जागा भरल्या. उर्वरित १२४ जागांसाठी २७० विद्यार्थी उपस्थित होते. उपलब्ध रिक्त जागांची माहिती ऑनलाइन प्रसिद्ध करण्यात आली होती. त्यानुसार गुणवत्तेच्या आधारे प्रवेश प्रक्रिया सुरू होती. प्रवेशासाठी सुमारे १ हजार ७०० ते २ हजार विद्यार्थी आणि पालक पुणे कृषी महाविद्यालयात उपस्थित होते.राज्यातील चारही कृषी



पुणे कृषी महाविद्यालयात पदव्युत्तर प्रवेशासाठी विद्यार्थ्यांची व पालकांची झालेली गर्दी.

विद्यापीठांमधील कृषी व संलग्न पदव्युत्तर अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषदेमार्फत २२ ऑगस्टपासून सुरू आहे. यंदा १ हजार १८४ जागांसाठी २ हजार ३४१ विद्यार्थ्यांनी अर्ज केले होते. यापूर्वी ४ ते १७ सप्टेंबरदरम्यान दोन केंद्रीभूत प्रवेश फेऱ्या घेण्यात आल्या. त्यामध्ये ९२४ विद्यार्थ्यांनी प्रवेश निश्चित केला. त्यानंतर २६० जागा रिक्त राहिल्या.यापूर्वी रिक्त जागांसाठीची केंद्रीभूत प्रवेश फेरी संबंधित कृषी विद्यापीठांच्या केंद्रांवर घेण्यात येत होती. त्यामुळे विद्यार्थ्यांना चारही विद्यापीठांमधील रिक्त जागांची माहिती मिळत असली, तरी प्रवेशासाठी वेगवेगळ्या ठिकाणी जावे लागत होते. प्रवासाचा वेळ आणि प्रवेश निश्चित होण्याबाबतची अनिश्चितता यामुळे विद्यार्थ्यांना अडचणी येत होत्या. ही अडचण दूर करण्यासाठी यंदा चारही कृषी विद्यापीठांतील रिक्त जागांसाठीची तिसरी प्रवेश फेरी पुणे कृषी महाविद्यालयात एकाच ठिकाणी घेण्यात आली. मात्र, पहिल्यांदाच सामायिक पद्धतीने ही प्रक्रिया राबविल्याने प्रवेश प्रक्रिया काहीशी किचकट आणि वेळखाऊ ठरली. विद्यार्थ्यांना व पालकांना मार्गदर्शन करण्यासाठी महाविद्यालयातील कर्मचारी कार्यरत होते.

**प्रवेश पुन्हा राबविण्याची शक्यता :**

प्रवेशफेरीदरम्यान नियमानुसार प्रवेश देण्यात येत आहे. त्यासाठी दोन्ही दिवस विद्यार्थ्यांची हजेरी घेण्यात आली असून, त्यानंतर प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यात आली. विद्यार्थ्यांनी सहकार्य केल्यास पुन्हा प्रवेश फेरी राबविण्यात येईल, अशी माहिती शिक्षण विभाग, कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणेचे संचालक किशोर शिंदे यांनी दिली.

## गावठाणात डेंग्यू-मलेरिया प्रतिबंधासाठी आरोग्य पथकाची पाहणी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कवठे येमाई :** गावात डासांची उत्पत्ती वाढत असल्याच्या पार्श्वभूमीवर डेंग्यू व मलेरियाचा संभाव्य धोका लक्षात घेऊन कवठे येमाई प्राथमिक आरोग्य केंद्राच्या पथकाने गावठाण परिसरात प्रतिबंधात्मक तपासणी व जनजागृती मोहीम राबविली.

आरोग्य पथकाने नागरिकांशी संवाद साधून घराभोवती व परिसरात पाणी साचू न देणे, पाण्याची भांडी झाकून ठेवणे, डासांची उत्पत्तीस्थाने नष्ट करणे तसेच तापाची लक्षणे आढळल्यास तातडीने प्राथमिक आरोग्य केंद्राशी संपर्क साधण्याचे आवाहन केले. या मोहिमेत प्राथमिक आरोग्य केंद्रातील आरोग्य सेवक विनायकराव गोसावी, आरोग्य सेवक अमोल जाधव, आशा सेविका प्रगती कांदळकर व आशा सेविका अर्चना उघडे सहभागी झाले.

गावात डासांची उत्पत्ती वाढत असल्याने डास प्रतिबंधक फवारणी व आवश्यक उपाययोजना करण्याबाबत जुलै महिन्यातच ग्रामपंचायतीला निवेदन देण्यात आले होते, अशी माहिती आरोग्य सेवक विनायकराव गोसावी यांनी दिली. मात्र, त्यानंतरही ठोस उपाययोजना न झाल्याने ग्रामस्थांनी नाराजी व्यक्त केली. दरम्यान, ग्रामविकास अधिकारी पूनम थोरात-चितळकर यांच्याशी संपर्क साधला असता, ग्रामपंचायतीच्या माध्यमातून शक्य त्या डास प्रतिबंधात्मक उपाययोजना तातडीने करण्यात येतील, असे त्यांनी सांगितले.डासांची वाढती उत्पत्ती आणि डेंग्यू-मलेरियाचा संभाव्य धोका लक्षात घेता गावठाण परिसरात फवारणी, स्वच्छता व इतर प्रतिबंधात्मक उपाययोजना तातडीने करण्याची मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

## करंदी येथे बांधकामाचे साहित्य चोरणारे दोघे अटकेत

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**तळेगाव ढमढेरे, :** करंदी (ता. शिरुर) येथे एका बिल्डींगच्या सुरु असलेल्या बांधकामचे साहित्य चोरणाऱ्या दोघांना शिक्रापूर पोलिसांनी अटक केली असून बालेंद्र जामून राम व राजेशकुमार रानगी राम असे पोलिसांनी अटक केलेल्या दोघांची नावे आहे.

करंदी (ता. शिरुर) येथील युनिव्हर्सल लॉं कॉलेजच्या पाठीमागे फारुक कुरेशी या बांधकाम ठेकेदाराच्या माध्यमातून बिल्डींगचे बांधकाम सुरु असून सदर ठिकाणी लोखंडाचे काही साहित्य आणून ठेवलेले असताना तेथे कामासाठी आलेले बालेंद्र राम व राजेशकुमार राम हे दोघे लोखंडी साहित्य चोरी करुन घेऊन जाताना एका इसमाचे चित्रीकरण केले आणि सदर चित्रीकरण ठेकेदार फारूक कुरेशी यांना पाठवल्याने फारूक नजमुद्दीन कुरेशी (वय ४५ वर्षे रा. इकोग्राम सोसायटी शिक्रापूर ता. शिरुर जि. पुणे) यांनी शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिल्याने पोलिसांनी बालेंद्र जामून राम व राजेशकुमार रानगी राम (दोघे सध्या रा. करंदी ता. शिरुर जि. पुणे मूळ रा. गैलोबडनपुरा, बसराशंकुल ता. कोतवाली सुनय्या जि. मजप्पूरपूर बिहार) या दोघांवर गुन्हा दाखल करत त्यांच्या कडून चोरीचा मुद्देमाल जप्त करत दोघांना अटक केली असून पुढील तपास पोलीस हवालदार संदीप बनकर हे करत आहे.

## गणेश विसर्जन करताना विशेष काळजी घ्यावी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**तळेगाव ढमढेरे :** गणरायाला निरोप देण्यासाठी गणेश विसर्जनाची लगबग सुरू असताना गणेश विसर्जन मिरवणुकी दरम्यान तसेच विसर्जनस्थळी दुर्घटना टाळण्यासाठी नागरिकांनी विशेष खबरदारी घ्यावी असे आवाहन शिक्रापूर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक चंद्रशेखर यादव व आपदाचे महेश साबळे यांनी केले आहे.

गणेश विसर्जनाच्या दिवशी मोठ्या प्रमाणावर नागरिक घरगुती तसेच सार्वजनिक गणेशमूर्ती घेऊन विसर्जनासाठी बाहेर पडतात, यावेळी मिरवणुकीत मोठी गर्दी होत असल्याने नागरिकांनी शिस्त व संयम राखणे आवश्यक असून विसर्जनस्थळी पाण्याची खोली, प्रवाह तसेच परिसरातील परिस्थितीचा विचार करूनच विसर्जन करावे. लहान मुलांना व ज्येष्ठ नागरिकांना पाण्याजवळ नेताना विशेष काळजी घ्यावी असे आवाहन देखील पोलिसांसह आपदा टीम कडून करण्यात आले आहे, विसर्जनाच्या वेळी नदी, तलाव, बंधारा, विहीर किंवा इतर जलस्रोतांमध्ये खोल पाण्यात जाणे टाळावे. पोहता येत असले तरी पाण्याची परिस्थिती धोकादायक असल्यास पाण्यात उतरणे टाळावे, प्रशासनाने निश्चित केलेल्या विसर्जन स्थळीच गणेशमूर्तींचे विसर्जन करावे. नागरिकांनी पोलीस तसेच आपदा व्यवस्थापन पथक आणि स्वयंसेवकांच्या सूचनांचे पालन करावे. विसर्जन मिरवणुकीत डीजे, वाहनांची गर्दी, वाहतुकीचा अडथळा किंवा इतर कारणांमुळे कोणतीही अनुचित घटना घडू नये, यासाठी नागरिकांनी प्रशासनाला सहकार्य करावे. मिरवणुकीदरम्यान अफवा पसरवणे किंवा अफवांवर विश्वास ठेवणे टाळावे.

## 'एमआयटी एडीटी'च्या इंग्रजी शिक्षणाची केंब्रिजकडून दखल

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** इंग्रजी भाषेतील प्रावीण्य वाढविण्यासाठी एमआयटी आर्ट, डिझाइन अँड टेक्नॉलॉजी विद्यापीठाने राबविलेल्या उपक्रमाची केंब्रिज विद्यापीठाने दखल घेतली आहे. गेल्या चार वर्षांत १० हजारांहून अधिक विद्यार्थ्यांना इंग्रजी भाषेचे प्रशिक्षण देऊन केंब्रिज लिंग्वास्किल प्रमाणपत्र मिळवून देण्यात आले. या उपक्रमाच्या चार वर्षांच्या प्रभाव-अभ्यासाचे प्रकाशन तसेच लिंग्वास्किल प्रमाणपत्र वितरण समारंभ मंगळवारी विद्यापीठाच्या प्रयाग सभागृहात झाला.

या वेळी केंब्रिज विद्यापीठाचे उत्पादन व्यवस्थापक इयान कॉवली, एमआयटी एडीटी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. राजेश एस., प्रोव्होस्ट प्रा. डॉ. सायली गणारकर, केंब्रिज विद्यापीठ दक्षिण आशिया विभागाच्या प्रमुख डॉ. संगीता मेहता, केंब्रिज परीक्षा केंद्राचे व्यवस्थापक डॉ. अतुल पाटील आणि एमआयटी एडीटी विद्यापीठाचे परीक्षा नियंत्रक डॉ. ज्ञानदेव निलवर्ण उपस्थित होते.

विद्यापीठाच्या अधिकृत केंब्रिज केंद्रामार्फत




प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांसाठी इंग्रजी भाषेचे प्रशिक्षण आणि मूल्यांकन अनिवार्य करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांचे संवादकौशल्य आणि रोजगारक्षमता वाढविण्याच्या उद्देशाने राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचा केंब्रिज विद्यापीठाने अभ्यास केला. त्याअंतर्गत मागील चार शैक्षणिक वर्षांत १० हजारांहून अधिक विद्यार्थ्यांनी इंग्रजी भाषेचे प्रशिक्षण घेऊन प्रमाणपत्र मिळविले आहे.

मागील शैक्षणिक वर्षात लिंग्वास्किल परीक्षेला बसलेल्या ३ हजार ४६१ विद्यार्थ्यांपैकी ३७८ विद्यार्थ्यांनी सी१ आणि सी२ ही उच्च प्रावीण्याची पातळी प्राप्त केली. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये जागतिक रोजगाराच्या संधींसाठी आवश्यक संवादकौशल्य, आत्मविश्वास आणि भाषिक क्षमता विकसित होण्यास मदत होत असल्याचे प्रभाव-अभ्यासात नमूद करण्यात आले आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मधील कौशल्याधिष्ठित आणि रोजगाराभिमुख शिक्षणाच्या उद्दिष्टांशीही या उपक्रमाची सांगड घालण्यात आली आहे.

इंग्रजी भाषेशी मैत्री करा : कॉवली

इंग्रजी किंवा कोणत्याही भाषेकडे केवळ नोकरी मिळविण्याचे साधन म्हणून पाहू नका. भाषेशी मैत्री करा. त्यातून भाषेवर प्रावीण्य मिळविता येते. इंग्रजी भाषेशी मैत्री केल्यामुळेच जगभर फिरता आले, असे केंब्रिज विद्यापीठाचे उत्पादन व्यवस्थापक इयान कॉवली यांनी सांगितले. केंब्रिज आणि एमआयटी एडीटी विद्यापीठातील सहकार्यामुळे अधिकाधिक विद्यार्थ्यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावरील संवादकौशल्य विकसित करून आपल्या स्वप्नांची पूर्तता करावी, असे आवाहन त्यांनी केले.

**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की खालील परीशिष्टात वर्णन केलेल्या मिळकतीचे विदयमान मालक श्री. सिताराम सखाराम वाघमारे रा. झोपडी क्र. आय - २८, बालाजीनगर झोपडपट्टी, भोसरी, पुणे ४११०२६ सदर परीशिष्टयांत वर्णन केलेल्या निवासी झोपडी मिळकत ही आमचे आशिलांच्या मालकीची असून सदर झोपडी क्र. आय-२८ मध्ये श्री. ईश्वर रानबा भोसले हे भाडेतत्त्वावर राहण्याकरिता असल्यामुळे सदर शासनाच्या सन २००२ च्या मशाल सर्व्हेला भाडेकरूच्या नावाची नोंद नजरचुकीने लागलेली आहे. सदर आमच्या आशिलांनी झोपडी क्र. आय-२८ ही झोपडी आमच्या आशिलांच्या मालकीची आहे. सबब सदर मिळकतीशी कोणाचाही कसल्याही व कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध ताबापावती, गहाण, तारण, दान, जप्ती, ताबा, वहिवाट इ. अधिकार असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झालेपासुन त्यांनी १० दिवसांचे आत मूळ कागदपत्रांनिशी आमची वा आमचे अशिलांची खात्री करून द्यावी, अन्यथा सदर मिळकतीवर इतर कोणाचाही, कसल्याही व कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो जाणीवपुर्वक सोडून दिलेला आहे असे समजुन आमचे आशिल पिंपरी चिंचवड म.न.पा. यांचे झो.नि.पु. विभाग यांच्याकडे सदरील झोपडी पात्रतेकामी पुढिल पत्र व्यवहार करून सदरील झोपडी पात्र करून घेतील. त्यानंतर कोणाचीही, कसल्याही प्रकारची तक्रार विचारात घेतली जाणार नाही. याची नोंद घ्यावी.परीशिष्ट : तुकडी पुणे पोट तुकडी तालुका हवेली, मे. सह दुय्यम निबंधक हवेली यांचे हद्दीतील, तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालीकेच्या हद्दीतील गांव मौजे बालाजीनगर झोपडपट्टी, भोसरी, येथील झोपडी क्र.- आय - २८ ही निवासी झोपडी मिळकत.

HARISHCHANDRA S. SURAWASE
NOTARY
Karhadkar Heights, Power House Chowk, Chinchwadgaon, Pune-411 033

महाराष्ट्र शासन
तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी आंबेगाव यांचे कार्यालय
Email-tahasilambegaonp@gmail.com
दुरध्वनी क्रमांक०२१३३-२४४२१४ रजिस्टर पोस्टाद्वारे
जा.क्र. हनो/कावि/१६२०/२०२६ दि. २१/०९/२०२६
प्रति,
-अर्जदार
१. श्री. सचिन मधुकर टाव्हरे
२. सौ. कुसुम मधुकर टाव्हरे
-विरूध्द
१.श्री. कैलास विष्णू मेंगडे
२. श्री. जर्नादन विष्णू मेंगडे
३. कै. गणपत पांडू मेंगडे मयत तर्फे वारस
३अ) श्री. कुंडलिक गणपत मेंगडे
३ब) श्री. नामदेव गणपत मेंगडे
३क) श्री. साहेबराव गणपत मेंगडे
नं. १ ते ३क रा. मेंगडेवाडी ता. आंबेगाव जि. पुणे
३ड) शकुंतला कुशाबा मांडगे
रा. धामणी ता. आंबेगाव जि. पुणे
४. श्री. बाळू नारायण मेंगडे
५. श्री. महादेव नारायण मेंगडे
नं. ४ व ५ रा. मेंगडेवाडी ता. आंबेगाव जि. पुणे
६. कै. रघुनाथ विठठल कुलकर्णी मयत तर्फे वारस
६अ) श्री. समीर रघुनाथ कुलकर्णी
-जाबदार
रा. ४४९, देविदास अपार्टमेंट, पितांबरी लेन, माहीम मुंबई १६
७. श्रीम. वैशाली जगन्नाथ कुलकर्णी
८. श्री. गणेश जगन्नाथ कुलकर्णी
नं. ७ व ८ रा. १४, कल्पतरू अब्दुल गफारखान मार्ग, वरळी मुंबई-१८
९. श्री. प्रकाश भालचंद्र केसकर
१०. श्री. सतिश राजाराम कुलकर्णी
११. श्री. सुधीर राजाराम कुलकर्णी
नं. ९ ते ११ रा. अवसरी बु. ता. आंबेगाव जि. पुणे.
**विषय : अपील अर्ज पुणे (मौजे मेंगडेवाडी ता. आंबेगाव जि. पुणे येथील सर्व्हे क्र. ४९/१ व इतर या मिळकतीबाबत)**
श्री. सचिन मधुकर टाव्हरे व इतर विरूध्द
श्री. कैलास विष्णू मेंगडे व इतर
संदर्भ : मा. कक्ष अधिकारी, महसूल व वन विभाग, मुंबई यांचेकडील सुनावणी नोटीस क्र. आरटीएस३४२६/११०८/प्र.क्र.५९८/जमीन-५ दिनांक २४/०८/२०२६ उपरोक्त विषयान्वये मा. मंत्री (महसूल) महोदय, महाराष्ट्र राज्य मुंबई-३२ यांचेकडील संपन्न होणाऱ्या सुनावणीची मा. कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग मंत्रालय मुख्य इमारत, १ ला मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक मुंबई-४०००३२ यांचेकडील संदर्भिय नोटीस या कार्यालयास प्राप्त झालेली आहे.
सदर नोटीसद्वारे विषयांकित प्रकरणी मा. मंत्री (महसूल) महोदय, यांचेकडील दिनांक ०९/०९/२०२६ रोजी दुपारी २.०० वाजता विभागीय आयुक्त, कोकण यांचे दालन, जुने सचिवालय आवार, १ ला मजला, जहांगिर आर्ट गॅलरी समोर, फोर्ट मुंबई- ४०००३२ येथे सुनावणी ठेवणेत आलेली होती. सोबत सदर नोटीसची प्रत जोडण्यात आलेली आहे.
तरी सदर विषयांकित प्रकरणी मा. मंत्री (महसूल) महोदय, महाराष्ट्र राज्य मुंबई-३२ यांनी दि. ०१/१०/२०२६ रोजी वेळ ११ ते ५ दरम्यान सुनावणी ठेवलेली आहे. तरी सदर सुनावणीस आपण स्वतः /आपल्या वकीलांमार्फत उपस्थित राहून आपले लेखी किंवा तोंडी म्हणणे सादर करावे. सदर सुनावणीस आपण गैरहजर राहील्यास या प्रकरणी आपले काहीही म्हणणे नाही, असे गृहीत धरून नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत येईल असे मा. मंत्री (महसूल) महोदय, महाराष्ट्र राज्य मुंबई-३२ यांनी सुनावणी दरम्यान कळविलेले आहे.सदरची सुनावणी ही दिनांक ०१/१०/२०२६ रोजी वेळ ११ ते ५ दरम्यान विभागीय आयुक्त, कोकण यांचे दालन, जुने सचिवालय आवार, १ ला मजला, जहांगिर आर्ट गॅलरी समोर, फोर्ट मुंबई-४०००३२ येथे होणार आहे. तरी सदर सुनावणीस आपण उपस्थित रहावे.
(राहूल सारंग)
तहसिलदार आंबेगाव (पुणे)

द•ख•ल



## विकासकामांसाठी पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांचे पाठबळ : सचिन वराळ

**निघोज :** निघोज अळकुटी जिल्हा परिषद गटात गेली आठ वर्षात मोठ्या प्रमाणात विकासकामे झाली असून राज्याचे जलसंपदामंत्री व जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, आमदार काशिनाथ दाते सर तसेच माजी खा. डॉ सुजय विखे पाटील यांचे मोठ्या प्रमाणात पाठबळ मिळाले असून या नेत्यांच्या आशिर्वादाने जिल्हा परिषद गटात कोट्यवधी रुपयांची विकासकामे करता आली असून यापुढे सुद्धा मोठ्या प्रमाणात विकासकामे मार्गी लागणार असल्याची माहिती संदीप पाटील वराळ जनसेवा फौंडेशनचे तालुकाध्यक्ष सचिन पाटील वराळ यांनी दिली आहे. कुंड परिसरातील १८ लाख रुपये निधीच्या रस्त्याचे भूमिपूजन राळेगण थेरपाळचे सरपंच पंकज कारखिले, उपसरपंच ज्ञानेश्वर वरखडे, कैलास शिंदे, पांडुरंग वराळ, भास्करराव वराळ यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी शिवाजी वराळ, संतोष वराळ, बबनराव सुलाखे, संदीप चेमटे,दिपक शिंदे, रामभाउ शिंदे, तुकाराम लोहकरे, दिलीप लोहकरे, नानाभाउ गुंजाळ, पोपट गुंजाळ, डॉ. चौधरी, ज्ञानदेव वराळ किसन वराळ, प्रतिक वराळ, संपत वराळ, रमेश गुजाळ, ठेकेदार मनोज लामखडे आदी तसेच कुंड परिसरातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## वराळ कुटुंबाचे मुंबई निघोज परिसरासाठी मोठे योगदान : खा. नीलेश लंके



**निघोज :** निघोज गावचे माजी सरपंच व गावचे ज्येष्ठ कारभारी रामचंद्र तात्या वराळ व वराळ कुटुंबाचे मुंबई व निघोज परिसर विकासासाठी मोठ्या प्रमाणात योगदान असल्याचे प्रतिपादन खा. नीलेश लंके यांनी व्यक्त केले आहे. नवी मुंबई येथील शंकरशेठ वराळ यांच्या निवासस्थानी खासदार लंके यांनी सदिच्छा भेट दिली तसेच गणपती बाप्पाचे दर्शन घेतले यावेळी ते बोलत होते. मुंबई येथील व्यवसायीक शंकरशेठ वराळ यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी मुंबई येथील व्यवसायीक व सामाजिक कार्यकर्ते राजूशेठ वराळ निलेश वराळ ,सागर वराळ ,संदेश वराळ ,विपुल वराळ, सौ.सुनीता वराळ विमल वराळ,प्रियांका चत्तर (वराळ), वेदीका वराळ,पुजा वराळ, आकांक्षा वराळ आदी उपस्थित होते. खासदार लंके यावेळी म्हणाले रामचंद्र तात्या वराळ यांनी सरपंचपदावर कार्यरत असताना नळपाणी पुरवठा योजना सुरू केली. तसेच निघोज व पंचक्रोशीतील गावांच्या विकासासाठी मोठ्या प्रमाणात योगदान दिले. त्यांचे सुपुत्र शंकरशेठ वराळ व राजूशेठ वराळ यांनी मुंबई येथे व्यवसाय करताना निघोज गावच्या धार्मिक सामाजिक शैक्षणिक कामासाठी सातत्याने योगदान देऊन गावचा नावलौकिक वाढवीला आहे. आजही रामचंद्र तात्या वराळ पाटील यांना भेटल्यावर विकासकामांचा लेखाजोखा विचारीत नवीन विकासयोजना कशाप्रकारे राबवायच्या याचे मार्गदर्शन ते करीत असतात या वराळ कुटुंबाचे मुंबईत व्यवसायीक साम्राज्य मोठे असून त्यासाठी वराळ बंधूंचे योगदान मोठे असल्याचे प्रतिपादन त्यांनी व्यक्त केले आहे.

## हातगावात पावन गणेश मंडळाकडून रक्तदान शिबिर



**हातगाव :** शेवगाव तालुक्यातील हातगाव येथील श्री पावन गणेश मंडळाकडून सार्वजनिक गणेश उत्सवानिमित्त बसवण्यात आलेल्या गणपती मंडळासमोर रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. अशी माहिती मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी दिली आहे या रक्तदान शिबिरासाठी अहिल्यानगर येथील राष्ट्रीय स्वयमसंघ जनकल्याण रक्तदान केंद्रातील टीमला बोलावण्यात आले होते. यावेळी केंद्राचे डॉ. मनोहर देशपांडे,जनसंपर्क अधिकारी शरद बळे, मनिषा जोशी,सुलभा पवळ,किरण शिंदे व खुशाल करमाळे यांनी उपस्थितीत राहून श्री पावन गणेश मंडळाच्या सभासदानी व इतरही असंख्य तरुणांनी मिळून ४१ जणांनी आपला सहभाग नोंदवला असल्याचे पावन गणपती मंडळाच्या कार्यकर्त्यांनी सांगितले आहे.

## सौर वीज जोडणीसाठी झाडांवर कुऱ्हाड

**श्रीगोंदा :** शेतीला दिवसा वीज उपलब्ध करून देण्यासाठी उभारण्यात आलेल्या सौर प्रकल्पाची वीज सबस्टेशनला जोडण्यासाठी सुरू असलेल्या कामात झाडांची तोड करण्यात आल्याने श्रीगोंदा तालुक्यात नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे. सोलर कंपनीच्या ठेकेदाराकडून ही वृक्षतोड करण्यात आल्याचा आरोप असून, संबंधितांकडे आवश्यक परवानग्या होत्या का, याची चौकशी करण्याची मागणी पर्यावरणप्रेमींनी केली आहे. सौर प्लांटपासून सबस्टेशनपर्यंत वीजवाहिनी टाकण्यासाठी रस्त्यालगतच्या झाडांचा अडथळा होत असल्याचे सांगितले जात आहे. यापूर्वी या कामासाठी सुमारे ५० वर्षांपूर्वी लावण्यात आलेल्या चिंचेच्या झाडांवरही कुऱ्हाड चालवली जाणार असल्याची माहिती समोर आली होती. त्यामुळे सौरऊर्जेसारख्या पर्यावरणपूरक प्रकल्पासाठी जुन्या वृक्षांचा बळी देण्याची वेळ का आली, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. दरम्यान, संबंधित वृक्षतोडीस वन विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग अथवा स्थानिक प्रशासनाची परवानगी घेण्यात आली होती का? वृक्षतोडीचा पंचनामा करण्यात आला आहे का? तसेच पर्यायी मार्ग उपलब्ध असतानाही झाडे तोडण्यात आली का, याची चौकशी होणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांना दिवसा वीज मिळणे आवश्यक आहे; मात्र विकासकामांच्या नावाखाली अनावश्यक वृक्षतोड होत असेल तर ती थांबविण्याची गरज आहे. सौरऊर्जा प्रकल्प पर्यावरणपूरक असताना त्याच्या जोडणीसाठी मोठ्या वृक्षांची कत्तल होणे हा विरोधाभास आहे, अशी भूमिका पर्यावरणप्रेमींनी मांडली आहे. संबंधित विभागांनी तातडीने घटनास्थळी पाहणी करून वृक्षतोडीची परवानगी, ठेकेदाराची कागदपत्रे, लाईनचा मंजूर आराखडा आणि प्रत्यक्ष झालेली वृक्षतोड यांची तपासणी करावी. नियमभंग आढळल्यास संबंधित ठेकेदारावर कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.

# विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला बसचा ‘ब्रेक’ !

### ससेवाडी मुक्कामी बससेवा सुरु करण्याची मागणी; शेकडो विद्यार्थ्यांसह महिला, नागरिकांची गैरसोय

**शशिकांत परदेशी । राष्ट्र सह्याद्री**

**नगर तालुका :** नगर तालुक्याच्या शेवटच्या टोकावर डोंगररांगांमध्येवसलेल्याससेवाडी गावाची अनेक वर्षांपासून बंद असलेली मुक्कामी बससेवा पूर्ववत सुरू करण्याची मागणी जेऊर, ससेवाडी, धनगरवाडी, इमामपूर, बहिरवाडी, चापेवाडी, तोडमलवाडी, वाघवाडी, आढाववाडी परिसरातील नागरिकांनी केली आहे.

ससेवाडी गाव दुग्ध व्यवसायासाठी ओळखले जाते. येथील अनेक दूध उत्पादक दररोज दूध घालण्यासाठी नगरला ये-जा करतात. अनेक तरुणही रोजगारासाठी शहराकडे येत असतात. पूर्वी ससेवाडी मुक्कामी बससेवा सुरू होती. गेल्या काही वर्षांपासून ही बस बंद करण्यात आली आहे. त्यामुळे गावासह पंचक्रोशीतील नागरिकांची वाहतुकीची मोठी गैरसोय होत आहे.

जेऊर पंचक्रोशीतून शेकडो विद्यार्थी दररोज शिक्षणासाठी नगर शहरात ये-जा करतात. सकाळी लवकर सुरू होणाऱ्या शाळा, महाविद्यालये तसेच खासगी क्लासेससाठी जाणाऱ्या विद्यार्थ्यांना पूर्वीची ससेवाडी मुक्कामी बस मोठा आधार होती. बस बंद झाल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे.




सायंकाळच्या वेळीही नगरहून गावाकडे परतणाऱ्या महिला, ज्येष्ठ नागरिक, विद्यार्थी, दूध उत्पादक आणि सर्वसामान्य प्रवाशांना बसअभावी अडचणींचा सामना करावा लागत आहे.

ससेवाडी मुक्कामी बससेवा सुरू झाल्यास ससेवाडी बरोबरच जेऊर, धनगरवाडी, इमामपूर, बहिरवाडी, चापेवाडी, तोडमलवाडी, वाघवाडी व आढाववाडी परिसरातील नागरिक व विद्यार्थ्यांना त्याचा मोठा फायदा होणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान आणि ग्रामस्थांची गैरसोय लक्षात घेऊन ससेवाडी मुक्कामी बस पूर्ववत सुरू करावी अशी मागणी पंचक्रोशीतील नागरिकांनी केली आहे.

**विद्यार्थ्यांना बसचा मोठा आधार !**

सकाळच्या शाळा, महाविद्यालये आणि खासगी क्लासेससाठी नगरला जाणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ससेवाडी मुक्कामी बस अत्यंत सोयीची होती. बस बंद झाल्याने विद्यार्थ्यांची प्रवासासाठी धावपळ सुरू झाली आहे. ग्रामीण विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी बस सुरू करण्याची मागणी पंचक्रोशीतून होत आहे.

# कर्जत तालुक्यातील खासगी हॉस्पिटलच्या प्रश्नावर ‘युक्रांद’चे घंटानाद आंदोलन

### ३६ खासगी हॉस्पिटलची तपासणी; १८ ठिकाणी त्रुटी आढळल्याची आरोग्य विभागाची माहिती – सुधारणा न केल्यास नियमानुसार कारवाईचे लेखी आश्वासन

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**राशीन :** कर्जत तालुक्यातील खासगी रुग्णालयांमध्ये उपचारांचे दरपत्रक व डॉक्टरांची वैद्यकीय पात्रता दर्शनी भागात लावावी, रुग्णांकडून जादा व अवाजवी शुल्क आकारू नये, अनावश्यक तपासण्या व उपचार लादू नयेत, तसेच खासगी लॅब व रुग्णालयांची नियमित तपासणी करून नियमांचे पालन होत आहे की नाही, याची खातरजमा करावी, या विविध मागण्यांसाठी युवक क्रांती दलाच्या (युक्रांद) वतीने सोमवारी (दि. २१) कर्जत पंचायत समिती कार्यालयासमोर एकदिवसीय लक्षवेधी घंटानाद आंदोलन करण्यात आले.

रुग्णांच्या हक्कांशी संबंधित विविध प्रश्नांकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी करण्यात आलेल्या या आंदोलनाला युक्रांदच्या कार्यकर्त्यांसह विविध राजकीय पक्ष, सामाजिक संघटना आणि नागरिकांनी उपस्थित राहून




पाठिंबा दिला. आंदोलनादरम्यान खासगी रुग्णालयांमधील उपचारपद्धती, आकारले जाणारे शुल्क, रुग्णांना उपलब्ध करून दिली जाणारी माहिती, डॉक्टरांची वैद्यकीय पात्रता तसेच खासगी लॅबच्या कामकाजासंदर्भातील प्रश्न उपस्थित करण्यात आले.

३६ खासगी हॉस्पिटलची तपासणी युक्रांदने यापूर्वी केलेल्या मागण्यांच्या पार्श्वभूमीवर आरोग्य विभागाकडून तालुक्यातील ३६ खासगी हॉस्पिटलची तपासणी करण्यात आली. यापैकी १८ हॉस्पिटलमध्ये विविध त्रुटी आढळून आल्या असून संबंधित हॉस्पिटल चालकांना लेखी सूचना देण्यात आल्या आहेत, अशी माहिती तालुका आरोग्य अधिकारी डॉ. राजेंद्र सांगळे यांनी आंदोलनकर्त्यांना दिली.

उर्वरित खासगी रुग्णालयांची तपासणीही सुरू असल्याचे यावेळी सांगण्यात आले. आढळलेल्या त्रुटींमध्ये आवश्यक त्या सुधारणा करण्याच्या सूचना संबंधितांना देण्यात आल्या असून, नियमांचे पालन होत आहे की नाही, याबाबत प्रशासनाकडून पुढील कार्यवाही केली जाणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले.

आंदोलनकर्त्यांनी खासगी रुग्णालयांबाबत केलेल्या विविध मागण्यांवर आरोग्य विभागाच्या अधिकाऱ्यांशी चर्चा केली. यावेळी तालुका आरोग्य अधिकारी डॉ. राजेंद्र सांगळे, डॉ. दिलीप व्हरकटे, डॉ. मारुतराव जाधव आणि डॉ. अशोक लिंगडे यांनी आंदोलकांशी सविस्तर चर्चा केली.

त्रुटी आढळलेल्या खासगी रुग्णालयांनी आवश्यक त्या सुधारणा केल्या नाहीत, तर शासकीय नियमानुसार कारवाई करण्यात येईल, असे लेखी आश्वासन तालुका आरोग्य अधिकाऱ्यांनी आंदोलनकर्त्यांना दिले. या आश्वासनानंतर सायंकाळी ५ वाजता घंटानाद आंदोलन स्थगित करण्यात आले.

## लोकमहर्षी डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या कार्यातून विद्यार्थ्यांनी सामाजिक बांधिलकीची प्रेरणा घ्यावी

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**निघोज :** समर्थ रुरल एज्युकेशनल इन्स्टिट्यूट संचलित समर्थ कॉलेज ऑफ कॉम्प्युटर सायन्स, बेल्हे आणि श्री. शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती संचलित महात्मा फुले कला, वाणिज्य व सीतारामजी चौधरी विज्ञान महाविद्यालय, वरूड, जि. अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने ‘लोकमहर्षी डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती व्याख्यानमाला’ आयोजित करण्यात आली. विद्यार्थ्यांना लोकमहर्षी डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या सामाजिक, कृषी व संविधानविषयक कार्याची माहिती व्हावी आणि त्यांच्या विचारांचा परिचय नव्या पिढीला व्हावा, या उद्देशाने या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरूवात डॉ पंजाबराव देशमुख यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी समर्थ कॉलेज ऑफ कॉम्प्युटर सायन्सचे प्राचार्य डॉ. उत्तमराव शेलार होते. प्रमुख उपस्थितांमध्ये महात्मा फुले कला, वाणिज्य व सीतारामजी चौधरी विज्ञान महाविद्यालय, वरूडचे प्राचार्य डॉ. दिलीप हांडे, प्रमुख वक्ते प्रा. डॉ. चत्रभूज कदम तसेच डॉ. राजेश मिरगे उपस्थित होते.कार्यक्रमाची प्रास्ताविक प्राचार्य डॉ.दिलीप हांडे यांनी केले. यावेळी त्यांनी डॉ. पंजाबराव देशमुख यांचे विचार व कार्य महाराष्ट्रातील तरुण पिढीला माहिती व्हावेत. यामधून विद्यार्थ्यांनी आदर्श घेऊन उद्याचे आदर्श नागरिक घडावेत या हेतूने श्री शिवाजी शिक्षण संस्थेने संपूर्ण महाराष्ट्रात हा उपक्रम हाती घेतलेला आहे, असे म्हटले.

कार्यक्रमास महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ. लक्ष्मण घोलप, रा.से.योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. दिनेश जाधव, प्रा. अक्षय वाघ, विविध विभागांचे विभागप्रमुख, प्राध्यापकवृंद तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. उद्धव भारती यांनी केले, तर विद्यार्थी कल्याण अधिकारी प्रा. गणेश बोरचटे यांनी उपस्थितांचे आभार मानले. यावेळी शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

## पारनेर तालुक्यात पाणीटंचाईचा आढावा उपाययोजनांसाठी प्रशासनाला तातडीच्या सूचना

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**पारनेर :** तालुक्यातील पाणीटंचाईच्या संभाव्य संकटाच्या पार्श्वभूमीवर पंचायत समिती सभागृहात पाणीटंचाई आढावा बैठक आयोजित करण्यात आली. जिल्हा परिषद माजी उपाध्यक्ष सुजित झावरे यांच्या उपस्थितीत झालेल्या या बैठकीत तालुक्यातील पाणीस्थिती, वीजपुरवठा, टँकर मंजुरी तसेच पाणी नियोजनाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

पारनेर तालुक्याला पाणीपुरवठा करणाऱ्या मांडओहळ धरणातील पाणीसाठा धोकादायक पातळीच्या खाली गेल्याने आगामी आठ ते दहा दिवसांत पाऊस न झाल्यास तालुक्यात गंभीर पाणीटंचाई निर्माण होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली. त्यामुळे प्रशासनाने आतापासूनच आवश्यक उपाययोजनांचे नियोजन करावे, अशी मागणी बैठकीत करण्यात आली.

यावेळी बोलताना सुजित झावरे यांनी सांगितले की, पाणीटंचाईचा प्रश्न हा कोणत्याही एका पक्षाचा किंवा व्यक्तीचा प्रश्न नसून, जनतेच्या हितासाठी सर्वांनी एकत्र येऊन काम करण्याची वेळ आहे. ग्रामीण भागातील नागरिकांना पाण्यासाठी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागू नये, यासाठी प्रशासनाने परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन तातडीने कार्यवाही करावी, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

तालुक्यातील विविध गावांमध्ये पाणीपुरवठ्यासाठी टँकरची आवश्यकता निर्माण होत असून, टँकर मंजुरीची प्रक्रिया जलद करण्याची मागणी करण्यात आली. तसेच पाणीपुरवठा योजनांसाठी सुरळीत वीजपुरवठा मिळणे आवश्यक असल्याने विद्युत विभागाने वीजपुरवठ्याबाबत तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी सूचनाही करण्यात आली.

वडगाव आमली यासह काही गावांमध्ये खारे पाणी आणि टँकर मंजुरीचा प्रश्न गंभीर असल्याचे बैठकीत निदर्शनास आणून देण्यात आले. अशा गावांसाठी टँकर मंजुरीच्या नियम व अटी शिथिल करून नागरिकांना तातडीने पाणी उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी करण्यात आली.

शिवसेना पारनेर तालुका प्रमुख अरुण ठाणगे, बाळासाहेब माळी, सुभाष वराळ, प्रियांका खिलारी, कोमल भंडारी, बाळासाहेब ठुबे, महिंद्र पांढरकर, युवा नेते स्वप्नील राहिंज, ऋषिकेश गंधाडे, गंगाराम कळमकर, गजानन सोमवंशी, संदीप भंडारी, अशोक कोठावळे, सुदाम कोरडे, चंद्रकांत कुलकर्णी, दगडू बोरुडे, अमोल ठुबे.

## सोमवारी कर्जत शहरात मान्सून सरी

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**कर्जत :** सोमवारी संध्याकाळी कर्जत शहरात मान्सून सरी बरसल्या अनेक दिवसांपासून दडी मारलेला पाऊस बरसल्याने सर्वसामान्य शेतकऱ्यांसह नागरिकांना दिलासा मिळाला असला तरी मान्सून सक्रीयतेची चातकासारखी वाट पाहत आहे. सोमवारी कर्जत तालुक्यात २१ मिमी पावसाची नोंद झाली असून यात वालवड मंडळात सर्वाधिक ४३ मिमी पाऊस झाला असल्याची माहिती तालुका कृषी अधिकारी नंदकुमार वाणी यांनी माहिती दिली. तर सर्वात कमी ५ मिमी पावसाची नोंद मिरजगावला झाली.



अनेक दिवसांपासून मान्सून पावसाने दडी मारली असून सर्वसामान्य शेतकऱ्यांसह नागरिक चिंतातुर झाले आहेत.मान्सून सक्रियतेसाठी ठिकठिकाणी प्रार्थना तसेच साकडे घालत आहे. सोमवार, दि २१ रोजी कर्जत शहर आणि तालुक्यात संध्याकाळी साडे आठच्या सुमारास मध्यम पावसाच्या सरी विजेच्या गडगडाटात सुरू झाल्या. दुपारपासूनच वातावरणात उकाडा जाणवत ढगाळ हवामान झाले असल्याने दमट वातावरणाने सर्वसामान्य जनता त्रस्त झाली होती. या पावसाने त्यांना दिलासा मिळाला. कर्जत तालुक्यात सोमवारी सरासरी २१ मिमी पाऊस पडला असून यात सर्वाधिक वालवड मंडळात सर्वाधिक ४३.५ मिमी पावसाची नोंद झाली. तर मिरजगाव मंडळात सर्वात कमी ५.३ मिमीच पाऊस पडला. कर्जत तालुक्यातील १० महसुली मंडळात पडलेला पाऊस पुढीलप्रमाणे : कर्जत – १९.८ मिमी, राशीन – १४ मिमी, भांबोरा – १६ मिमी, कोंभळी – १६.३ मिमी, मिरजगाव – ५.३ मिमी, माही – ३२ मिमी, कुळधरण – ३७ मिमी, वालवड –४३.५ मिमी, खेड – १८.५ मिमी आणि कोरेगाव – ८ मिमी नोंद झाली.

**पाऊस पडला... शहराची बत्तीगुल**

सोमवारी संध्याकाळी साडे आठच्या सुमारास मध्यम पावसाच्या सरी बरसण्यास सुरुवात झाली असता कर्जत शहराची वीज गायब झाली. नऊ वाजता गेलेली वीज मध्यरात्री १२ लाच परत आली. कर्जत शहरात रात्रभर वीज ये-जा होत असल्याने शहरवासीयांना डासाच्या उपद्रवास सामोरे जावे लागले. या पावसाने काही भागात दिलासा मिळाला असला तरी सक्रिय मान्सूनसाठी सर्वसामान्य नागरिक देव पाण्यात ठेवत साकडे घालत आहे.

# खरवंडी कासार ग्रामपंचायतीचा कारभार वाऱ्यावर; ग्रामस्थांचे हाल

### ग्रामसेवकाची अनुपस्थिती, दोन वर्षांपासून शिपाई-लिपिक पदे रिक्त, टँकरच्या पाण्याचे नियोजनच नाही

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**खरवंडी कासार :** खरवंडी कासार ग्रुप ग्रामपंचायतीचा कारभार पूर्णपणे वाऱ्यावर गेला असून ग्रामसेवक येत नसल्याने ग्रामस्थ हैराण झाले आहेत. ग्रामपंचायतीचे शिपाई पद गेल्या दोन वर्षांपासून तर लिपिक पद एक वर्षापासून रिक्त आहे. तर ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांचा कार्यकाळ संपलेला असल्याने प्रशासकाची नेमणूक झाली असली तरी ते कधी या गावी फिरकले नसल्याने ग्रामपंचायत कायम बंद अवस्थेत आहे. ग्रामस्थांनी आपल्या तक्रारी कोणाकडे व कोठे मांडाव्यात हा मोठा प्रश्न आहे.

टँकरच्या पाण्याचे नियोजन पूर्णपणे कोलमडले आहे. सध्या दुष्काळी टंचाई काळ सुरू असून टँकरने गावात पाणी पुरवठा होत आहे. परंतु या पाण्याचे नियोजन करण्यासाठी जबाबदार घटक व यंत्रणाच अस्तित्वात नाही. त्यामुळे टँकरने येणारे पाणी सर्व ग्रामस्थांपर्यंत पोहोचत नाही. पाण्याच्या बाबतीत ’काही तुपाशी तर काही उपाशी’ अशी स्थिती निर्माण झाली आहे.

ग्रामपंचायतीकडून मिळणाऱ्या विविध दाखल्यांसाठी ग्रामस्थांना चकरा माराव्या लागत आहेत. रहिवासी दाखला, मिळकत उतारा, ना हरकत प्रमाणपत्र, जन्म प्रमाणपत्र, मृत्यू प्रमाणपत्र, रोजगार हमी योजनेच्या विहिरींचे घरकुलाचे मस्टर आदी कामांसाठी ग्रामस्थांना ग्रामपंचायतीचे उंबरे झिजवावे लागत आहेत. मात्र ग्रामपंचायतीला कायम कुलूप असल्याने नागरिकांना रिकाम्या हाती परतावे लागत आहे. ग्रामपंचायतचा कारभार रामभरोसे झालेला आहे. सरपंच, उपसरपंच आणि कार्यकारी मंडळाचा कार्यकाळ संपला आहे. त्यानंतर शासनाने प्रशासकाची नेमणूक केली, परंतु ते आजपर्यंत गावात आलेच नाहीत.

ग्रामसेवकांकडे इतर गावांचाही अतिरिक्त पदभार आहे. त्यामुळे आठवड्यातून फक्त दोन दिवस खरवंडी गावासाठी दिले जातात. सध्या महिला ग्रामसेवक असल्याने त्यांना जाब विचारण्यात व तक्रार करण्यात ग्रामस्थांना मर्यादा येतात, याचाच फायदा घेत कारभाराकडे दुर्लक्ष होत आहे.

ग्रामपंचायतीत फक्त एकच पाणीपुरवठा कर्मचारी असून एक सेवानिवृत्त कर्मचारी रोजंदारीवर घेण्यात आला आहे. त्यामुळे गावातील साफसफाई आणि दिवाबत्तीची व्यवस्था पूर्णपणे ठप्प झाली आहे.

सध्या दुष्काळाच्या झळा तीव्र आहेत, मजुरांच्या हाताला काम नाही.

अशा परिस्थितीत रोजगार हमी योजनेची कामे तातडीने सुरू होणे गरजेचे असताना प्रशासन सुस्त असल्याने ग्रामस्थांमधून संताप व्यक्त होत आहे. तरी वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तातडीने लक्ष घालून ग्रामपंचायतचा कारभार सुरळीत करावा, अशी मागणी ग्रामस्थांमधून होत आहे.

खरवंडी कासार ग्रामपंचायत हि ग्रुप ग्रामपंचायत आहे खरवंडी कासार बरोबरच काटेवाडी ढगेवाडी तुळजवाडी चा समावेश होतो मात्र ग्रामपंचायत ग्रामसेवीका या पंधरा दिवसा पासून येथे आल्या नाहीत मात्र पाणी पुरवठा कर्मचारीऱ्याना कार्यालय उघडून बसण्यास सांगतात त्यामुळे कार्यालय तर उघडे दिसते मात्र काम काहीच होत नाही एक प्रकारे काम चालू रस्ता बंद अशी गत झाली आहे.



दैनिक
# राष्ट्र सह्याद्री



## युवकाचा मृतदेह आढळला, हार्ट अटॅकने मृत्यू झाल्याचा संशय

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**वैजापुर** : समृद्धी महामार्गावर असलेल्या सर्व्हिस रोडवर मंगळवारी सायंकाळी एका २८ वर्षीय युवकाचा मृतदेह आढळल्याने परिसरात खळबळ उडाली. नंदू बन्सी सोळसे (रा. तिडी, वैजापुर तालुका) असे मृत युवकाचे नाव आहे. मिळालेल्या माहितीनुसार, समृद्धी महामार्गावरील नागपूर कॉरिडोअरजवळ असलेल्या सर्व्हिस रोडवर (चॅनल क्र. ४८७) एका युवकाचा मृतदेह बेवारस अवस्थेत पडला होता. सुरुवातीला मृतदेहाची ओळख पटली नव्हती, परंतु उशिरा सायंकाळी सोशल मीडियावर फोटो व्हायरल झाल्यानंतर त्याची अचूक ओळख पटली. प्राथमिक अहवालानुसार, युवकाचा मृत्यू हृदयविकाराच्या झटक्याने झाला असावा, असा अंदाज वर्तवला जात आहे. या प्रकरणी वैजापुर पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली असून पोलीस पुढील तपास करत आहेत.

# प्रांताधिकाऱ्यांच्या अनुपस्थितीने शेतकरी संतप्त; कार्यालयात प्रवेश

### जनआक्रोश मोर्चात ठिय्या; निवेदन स्वीकारण्यासाठी अखेर प्रांताधिकारी उंडे उपस्थित



### 'फ्लेक्स लावणे हे प्रांताधिकाऱ्यांचे काम नाही'

प्रांताधिकारी हा तालुक्यातील विविध विभागांचा प्रमुख असताना हजारो शेतकरी निवेदन देण्यासाठी आलेले असताना ते उपस्थित राहिले नाहीत, यावर बाळासाहेब थोरात यांनी प्रशासनाला सुनावले. आमदारांचे फ्लेक्स लावायचे काम प्रांताधिकाऱ्यांचे नाही; तुम्ही त्यांचे गुलाम झाला का? असा सवाल त्यांनी केला. यावर प्रांताधिकारी उंडे यांनी नियोजित कार्यक्रम असल्याचे सांगितले. मात्र, मोर्चाची माहिती मिळताच आपण तातडीने आलो, असे त्यांनी स्पष्ट केले. प्रांताधिकारी अरुण उंडे हे संगमनेरचे उपविभागीय अधिकारी असल्याची नोंद जिल्हा प्रशासनाच्या संकेतस्थळावर आहे.

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**संगमनेर** : तालुक्यातील दुष्काळी परिस्थिती, वीजपुरवठ्याचा खेळखंडोबा आणि हक्काचे पाणी मिळावे, या मागण्यांसाठी मंगळवारी (दि. २२) हजारो शेतकरी, महिला व नागरिकांनी प्रांताधिकारी कार्यालयावर जनआक्रोश मोर्चा काढला. मोर्चाचे निवेदन स्वीकारण्यासाठी प्रांताधिकारी अरुण उंडे उपस्थित नसल्याने मोर्चेकऱ्यांमध्ये संताप निर्माण झाला. संतप्त शेतकऱ्यांनी घोषणाबाजी करत प्रांताधिकारी कार्यालयात प्रवेश केला.

त्यानंतर माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्यासह पदाधिकाऱ्यांनी कार्यालयाच्या पायऱ्यांवर ठिय्या आंदोलन केले. या घटनेची माहिती स्थानिक वृत्तवाहिन्यांनीही दिली आहे. मोर्चात माजी मंत्री बाळासाहेब थोरात, माजी आमदार डॉ. सुधीर तांबे, माजी नगराध्यक्ष दुर्गाताई तांबे, युवक काँग्रेसच्या अध्यक्षा डॉ. जयश्रीताई थोरात, तालुकाध्यक्ष अजय फटांगरे, अमोल शेरकर यांच्यासह विविध संस्थांचे पदाधिकारी सहभागी झाले होते.

मोर्चाची पूर्वसूचना चार दिवस आधी प्रशासनाला देण्यात आली होती, तरीही निवेदन स्वीकारण्यासाठी प्रांताधिकारी उपस्थित नसल्याने शेतकऱ्यांनी नाराजी व्यक्त केली. प्रांताधिकारी कार्यालयात प्रवेश केल्यानंतर बाळासाहेब थोरात यांनी शेतकरी व युवकांना शांत केले. त्यानंतर तहसीलदार धीरज मांजरे, उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ. कुणाल सोनवणे, पोलिस निरीक्षक समीर बारवकर, महावितरणचे कार्यकारी अभियंता नारायण सोनवणे यांच्यासह अधिकारी उपस्थित होते.

शेतकरी मागे हटत नसल्याचे पाहून प्रशासनाने प्रांताधिकारी अरुण उंडे यांना पाचारण केले. त्यानंतर उंडे यांनी मोर्चाच्या ठिकाणी येऊन निवेदन स्वीकारले. हक्काचे पाणी, सुरळीत व पूर्ण दाबाने वीजपुरवठा तसेच दुष्काळी परिस्थितीत शेतकरी व शेतमजुरांना मदत मिळावी, अशा मागण्या यावेळी करण्यात आल्या.

## प्राथ. आरोग्य केंद्रात रुग्णांना धमकविणारा फलक

### शासन आदेशाला केराची टोपली

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री




**सोनई** : नेवासा तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र सोनई येथे नागरिकांना धमकवणारा फलक लावल्याने नागरिकांमध्ये तीव्र स्वरूपाचे नाराजी निर्माण झाली आहे. याबाबत सविस्तर वृत्त असे की शासकीय कर्मचाऱ्यांना सुरक्षा प्रदान करणारे कायदे अशा स्वरूपाचा फलक प्रत्येक कार्यालयात दिसून येत होता. परंतु काही दिवसापूर्वी प्रशासनाने सदर फलक काढून घेण्याचे निर्देश संपूर्ण विभागाला दिले होते. त्यानुसार सर्व विभागांनी सदर फलक काढून घेतले, परंतु प्राथमिक आरोग्य केंद्र सोनई यांनी या आदेशाला केराची टोपली दाखवत सरकारी कर्मचाऱ्यांना सुरक्षा प्रदान करणारे कायदे आयपीसी असा नव्याने फलक तयार करून प्राथमिक आरोग्य केंद्रात लावला. भारतीय संविधानात काही वर्षांपूर्वी इंडियन पिनल कोड कायदे संपुष्टात येऊन भारतीय न्याय संहिता बीएनएस नुसार कार्यक्रमाला सुरू असून प्राथमिक आरोग्य केंद्र सोनई जुन्या इंडियन पिनल कोडमध्ये अडकून आहे. पूर्वीचे कलम इंडियन पिनल कोडमध्ये वेगळे होते आणि आता भारतीय न्याय संहितेनुसार कलमे वेगळे असताना चुकीचे आणि दिशाभूल करणारा फलक लावून प्रशासनाची आणि लोकशाहीची एक प्रकारे चेष्टा केली जात आहे. या ठिकाणी संविधानाचा अवमान झाल्याचे दिसून येते याबाबत सामाजिक कार्यकर्ते संजय वैरागर यांनी सदर बाब प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. इंगळे मॅडम, डॉ. पवार यांच्या निदर्शनास आणून दिली असता डॉ. इंगळे यांनी अशा प्रकारचे परिपत्रक आम्हाला आणून दाखवा. अशी केविलवाणी मागणी केली. यावरून प्रशासनात अशा प्रकारचे संविधानाला चॅलेंज करणारे अधिकारी असतील तर सामाजिक न्यायाची अपेक्षा कुणाकडून करणार. घराची कळा अंगण सांगते.. या म्हणीप्रमाणे सदर कार्यालयाची योग्य तपासणी संविधानाची कार्यशाळा घेण्याची गरज दिसून येते. याबाबत वरिष्ठांनी योग्य ती खबरदारी घेऊन संबंधित यंत्रणेला परिपत्रकाद्वारे सदर फलकाची आवश्यकता आहे काय याबाबत सूचित करावे अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

## अल्पवयीन मुलीचे अपहरण प्रकरणी पोस्को दाखल

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : आरोपी जावेद शेख याने राहुरी तालुक्यातील पश्चिम भागातील एका १७ वर्षीय अल्पवयीन शालेय विद्यार्थीनीचे अपहरण केले. त्यानंतर आरोपी पिडीत मुलीला वांबोरी येथे सोडून पसार झाला. पिडीत मुलीने नातेवाईकांना संपर्क करून पोलिस ठाण्यात धाव घेतल्याने सदर प्रकार उघडकीस आला.

पिडीत अल्पवयीन मुलीने राहुरी पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून आरोपी जावेद जाकीर शेख, रा. अवघड पिंपरी, ता. राहुरी, याच्यावर बलात्कारा सह पोस्कोचे वाढीव कलम लावण्यात आले. दि. २६ ऑगस्ट २०२६ रोजी १७ वर्षीय मुलगी बेपत्ता झाल्यानंतर तिच्या अपहरणाचा गुन्हा राहुरी पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आला होता. या प्रकरणाचा तपास पोलीस कर्मचारी विकास वैराळ करीत होते. दरम्यान आरोपी पिडीत मुलीला वांबोरी शिवारात सोडून पसार झाल्याचे समोर आले. त्यानंतर मुलीने आई-वडिलांना फोन करून माहिती दिली. पालकांनी तातडीने मुलीसह राहुरी पोलीस ठाण्यात धाव घेऊन मुलीचा जबाब नोंदविण्यात आला.

या प्रकरणातील संशयित तरुण २६ ऑगस्ट रोजी सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाल्याची माहिती तपासातून समोर आली. त्यामुळे पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेजसह उपलब्ध पुराव्यांच्या आधारे तपासाला वेग दिला आहे. संबंधित तरुण सध्या फरार झाला असून पोलिस पथक त्याचा शोध घेत आहे. संबंधित अल्पवयीन मुलगी राहुरी शहरातील एका शाळेत शिक्षण घेत असल्याची माहिती मिळाली आहे. तिच्या जबाबानंतर प्रकरणाचे गांभीर्य वाढले असून जावेद शेख याच्या विरुद्ध विविध कलमांतर्गत पोस्कोचा गुन्हा दाखल करण्यात आला. या घटनेचा पुढील तपास पोलीस निरीक्षक रवींद्र देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

## शेतात काम करताना अंगावर वीज कोसळून मजूर ठार

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**वैजापूर** : शेतात काम करीत असताना अंगावर वीज कोसळून ४२ मजूर ठार झाल्याची घटना २२ सप्टेंबर रोजी दुपारी ३.१५ वाजेच्या सुमारास तालुक्यातील फकिराबादवाडी शिवारात घडली. प्रकाश चंद्रभान कांबळे ( ४२ रा. धानोरा ता. येवला) असे मृत मजुराचे नाव आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, येवला तालुक्यातील धानोरा येथील काही मजूर फकिराबादवाडी शिवारातील शेतात टोमॅटोची झाडे बांधण्याचे काम करीत असताना विजांच्या कडकडाटासह पावसाला सुरूवात झाली.

याचवेळी अचानक अंगावर वीज कोसळल्याने प्रकाश कांबळेचा जागीच मृत्यू झाला. घटनेनंतर त्याला वैजापूर येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले; परंतु डॉक्टरांनी तपासून त्याला मृत घोषित केले.

## संगमनेरला १०२ कोटींच्या विविध विकासकामांचे आज लोकार्पण

### पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील व आमदार अमोल खताळ यांची प्रमुख उपस्थिती

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री





**संगमनेर** : संगमनेर तालुक्यातील विविध विकासकामांना चालना देण्यासाठी सुमारे १०२ कोटी रुपयांच्या विकास कामांचा भूमिपूजन आणि लोकार्पण सोहळा बुधवार,दि२३सप्टेंबर २०२६ रोजी जलसंपदमंत्री तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील व आमदार अमोल खताळ पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत भूमिपूजन व लोकार्पण सोहळा होणार आहे.

संगमनेर तालुक्यातील चिंचोली गुरव येथे सुमारे ४ कोटी ४७ लाख रुपये खर्चाच्या उपसा जलसिंचन योजना कामाचे भूमिपूजन करण्यात येणार आहे. या योजनेमुळे परिसरातील शेतीसाठी सिंचनाच्या सुविधा उपलब्ध होण्यास मदत होणार आहे.तसेच समनापूर येथील गणपती मंदिर परिसरामध्ये सुमारे ९७ कोटी २५ लाख रुपये खर्चाच्या संगमनेर ते वडगाव पान फाटा, निळवंडे ते कौठे कमळेश्वर राष्ट्रीय महामार्ग (जांभूळवाडी फाटा) या मार्गावरील रस्ते सुधारणा कामाचा शुभारंभकरण्यात येणार आहे.

तसेच संगमनेर नगरपरिषद हद्दीतील साई नगर येथील म्हाळुंगी नदी पुलाला स्व. खासदार बाळासाहेब विखे साईसेतू या नामफलकाचे अनावरण करण्यात येणार आहे.तसेच गंगामाई घाटावर सुमारे४०लाख रुपये खर्चून बांधण्यात आलेल्या हिंदू दशक्रिया विधी घाटाचे लोकार्पणही करण्यात येणार आहे.

तसेच श्रीराम मंदिर व हनुमान मंदिर येथील सुमारे३० लाख रुपये खर्चाच्या सभामंडपाचे लोकार्पण करण्यात येणार आहे. या विकासकामांच्या भूमिपूजन व लोकार्पण सोहळ्यास महायुतीचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन महायुतीच्या वतीने करण्यात आले आहे.

## सागर शेजवळ खून खटला अंतिम टप्प्यात

### ५१ साक्षीदारांचे साक्षीपुरावे पूर्ण

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**शिर्डी** : येथील सागर शेजवळ खून प्रकरणाचा खटला राहाता येथील जिल्हा व सत्र न्यायालयात अंतिम टप्प्यात आला आहे. आतापर्यंत ५१ साक्षीदारांचे साक्षीपुरावे पूर्ण झाले असून सध्या आरोपींच्या वकिलांकडून अंतिम युक्तिवाद सुरू आहे. ऑक्टोबरमध्ये खटल्याचे कामकाज पूर्ण होऊन निकाल येण्याची शक्यता असल्याचे पीडित कुटुंबाचे वकील ॲड. प्रकाश आहेर यांनी सांगितले.

सन २०१५ मध्ये सागर शेजवळ याची ठेचून हत्या करण्यात आली होती. प्रारंभी शिर्डी पोलिसांनी तपास केला. या प्रकरणात अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये कलमे दाखल करण्यात आली होती. त्यानंतर तपास नाशिक येथील गुन्हे अन्वेषण विभागाकडे वर्ग करण्यात आला.

तपास पूर्ण करून दोषारोपपत्र न्यायालयात दाखल करण्यात आले. हा खटला सुरुवातीला कोपरगाव न्यायालयात ६२/२०१५ या क्रमांकाने सुरू होता. अत्याचार प्रतिबंधक कायद्याच्या तरतुदींनुसार प्रकरण विशेष न्यायालयात चालविण्याची आवश्यकता असल्याने पीडित कुटुंबाच्या वतीने न्यायालयात अर्ज करण्यात आला. त्यानंतर खटला राहाता येथील जिल्हा व सत्र न्यायालयात वर्ग होऊन ३४/२०२४ या क्रमांकाने सुनावणी सुरू झाली.

सुनावणीदरम्यान ५१ साक्षीदारांचे जबाब नोंदविण्यात आले. मयत सागरचा भाऊ आकाश याने सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे आरोपींची न्यायालयात ओळख पटविल्याची माहिती ड. आहेर यांनी दिली.

घटनेशी संबंधित साक्षी व पुरावे न्यायालयासमोर मांडण्यात आले आहेत. आता अंतिम युक्तिवाद सुरू असून निकालाकडे शिर्डीसह परिसराचे लक्ष लागले आहे.

## पुणतांब्यात चोरांनी धूम स्टाईल सोन्याची पोत लांबवली

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**पुणतांबा** : पुणतांबा येथे मंगळवारी सकाळी घरासमोर अंगण झाडणाऱ्या महिलेच्या गळ्यातील सोन्याची पोत दुचाकीवरून आलेल्या दोन अज्ञात चोरट्यांनी हिसकावून नेली. भरवस्तीत घडलेल्या या घटनेमुळे महिलांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. याबाबत वैष्णवी प्रशांत सोनवणे यांनी राहाता पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. सकाळी सव्वासातच्या सुमारास त्या घरासमोर अंगण झाडत असताना दोन चोरटे काळ्या रंगाच्या स्प्लेंडर दुचाकीवरून आले. दोघांनी तोंड बांधलेले होते.

त्यांनी अचानक सोनवणे यांच्या गळ्यातील सोन्याची पोत हिसकावली. आरडाओरड केल्यानंतर चोरटे वसंत बंधाऱ्याच्या रस्त्याने पसार झाले. पोतीमध्ये आठ ग्रॅम सोने असून त्याची किंमत सुमारे ६० हजार रुपये असल्याचे फिर्यादीत नमूद आहे. पुणतांबा येथील घटना सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली असून पोलिस तपास करीत आहेत. राहाता तालुक्यातील एकुरका येथेही अशाच प्रकारे महिलेचे मंगळसूत्र लांबविण्यात आले आहे. दोन्ही घटनांतील चोरट्यांचे वर्णन समान असल्याने पोलिस त्या दिशेने तपास करीत आहेत. चोरट्यांचा तातडीने शोध घेऊन गस्त वाढवावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

## जुन्या भांडणाची कुसपत काढली अन् कुटुंबावर गज-काठ्यांनी हल्ला!कामठीत चौघांविरुद्ध गुन्हा

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा** : जुन्या भांडणाचा विषय उकरून काढत कामठी (ता. श्रीगोंदा) येथे एका कुटुंबावर लोखंडी गज व काठीने हल्ला केल्याची धक्कादायक घटना २० सप्टेंबर रोजी सकाळी घडली. या हल्ल्यात चौघे जखमी झाल्याचे फिर्यादीत नमूद असून आबा आरडे यांच्या डाव्या हाताचे हाड फ्रॅक्चर झाले आहे. त्यांच्या डोक्यालाही गंभीर दुखापत झाल्याने त्यांना पुढील उपचारासाठी अहिल्यानगर येथील सिव्हिल रुग्णालयात हलविण्यात आले.

पोलिसांत दाखल फिर्यादीनुसार, छबुबाई पंडीत आरडे, त्यांचे पती पंडीत आरडे, मुलगा आबा व सून घरासमोर असताना शेजारी राहणारे ताराचंद माणिक आरडे यांनी जुन्या भांडणाचा विषय काढून शिवीगाळ केल्याचा आरोप आहे. त्यानंतर ताराचंद आरडे, पुष्पा आरडे, अभिषेक आरडे आणि विद्या आरडे यांनी एकत्र येत मारहाण केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. ताराचंद व अभिषेक यांनी लोखंडी गजाने, तर पुष्पा व विद्या यांनी काठी व हाताने मारहाण केल्याचा आरोप आहे.

जखमींना प्रथम ग्रामीण रुग्णालय, श्रीगोंदा येथे दाखल करण्यात आले. त्यानंतर पुढील उपचारासाठी अहिल्यानगरला हलविण्यात आले. याप्रकरणी ताराचंद माणिक आरडे, पुष्पा ताराचंद आरडे, अभिषेक ताराचंद आरडे आणि विद्या ताराचंद आरडे यांच्याविरुद्ध इछड कलम ११८(२), ११८(१), ११५(२), ३५१(२), ३५२ व ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस हवालदार उद्धव अर्जुन दिंडे पुढील तपास करीत आहेत.

# ऊस तोडणी मजूर टंचाईवर केन हार्वेस्टर हा सक्षम पर्याय : आ. काळे

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



गोदावरी खोरे केन व गौतम केन ट्रान्सपोर्ट कंपनीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत बोलतांना आ.आशुतोष काळे समवेत मान्यवर.

**कोळपेवाडी** : गेल्या काही वर्षांपासून ऊस तोडणी मजुरांची संख्या सातत्याने घटत चालली आहे. गळीत हंगामात मजुरांच्या टंचाईमुळे साखर कारखान्यांना, वाहतूकदारांना व शेतकऱ्यांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. ऊस तोडणी मजुरांची कमी होत चाललेली संख्या ही साखर उद्योगासाठी मोठी आव्हानात्मक बाब बनली असून यावर पर्याय म्हणून केन हार्वेस्टिंग यंत्रांचा वापर हा सक्षम पर्याय आहे असे प्रतिपादन आ. आशुतोष काळे यांनी केले.

गोदावरी खोरे केन ट्रान्सपोर्ट कंपनी प्रा. लि; गौतमनगरची ५५ वी व गौतम केन ट्रान्सपोर्ट कंपनी प्रा. लिमिटेडची २७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा नुकतीच कंपनीचे मार्गदर्शक व चेअरमन आ. आशुतोष काळे यांच्या अध्यक्षतेखाली खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. याप्रसंगी ते बोलत होते. हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज, मा.खा.स्व.कर्मवीर शंकररावजी काळे व स्व.सौ.सुशीलामाई काळे यांच्या प्रतिमेचे पूजन करून सभेस प्रारंभ करण्यात आला. अध्यक्ष पदाची सूचना चंद्रशेखर कडवे यांनी मांडली. सदर सूचनेस अशोकराव भगत यांनी अनुमोदन दिले. संचालक आप्पासाहेब निकम यांनी २०२५-२६ या आर्थिक वर्षात निधन झालेल्या व्यक्तींना श्रद्धांजली वाहिली. याप्रसंगी पुढे बोलतांना आ.आशुतोष काळे म्हणाले की, कारखाना व उद्योग समुहाचे मार्गदर्शक माजी आमदार आशोकराव काळे यांच्या मार्गदर्शनाखाली येत्या गळीत हंगामाच्या दृष्टीने कारखान्याची सर्व तयारी अंतिम टप्प्यात आली आहे. लवकरच बॉयलर अग्निप्रदीपन होणार असून शासनाच्या सूचनेनुसार १५ ऑक्टोबरला गळीत हंगाम सुरु करावा लागणार आहे.

त्यादृष्टीने ट्रकधारकांनी तयारीला लागावे. ट्रकधारकांनी एकत्रितपणे केन हार्वेस्टर घेऊन व्यवसाय करावा यासाठी गोदावरी खोरे व गौतम केन ट्रान्सपोर्ट कंपनी ट्रक धारकांना सर्वतोपरी सहकार्य करणार असल्याचे आ. आशुतोष काळे यांनी यावेळी सांगितले. सभेचे प्रास्तविक गोदावरी खोरे केन ट्रान्सपोर्ट कंपनीचे कार्यकारी संचालक दौलतराव मोरे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व अहवाल वाचन जनरल मॅनेजर संतोष पवार यांनी केले तर आभार संचालक विजय जाधव यांनी मानले.

यावेळी सर्व विषय टाळ्यांच्या गजरात मंजूर करण्यात आले. याप्रसंगी कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखान्याचे उपाध्यक्ष दिनार कुदळे, संचालक सूर्यभान कोळपे,डॉ.मच्छिन्द्र बर्डे, राजेंद्र घुमारे, सुनील मांजरे, मनोज जगझाप, सचिन चांदगुडे, दिलीपराव बोरनारे, अनिल कदम, श्रीराम राजेभोसले, गंगाधर औताडे, शंकरराव चव्हाण, अशोकराव मवाळ, सुरेश जाधव, श्रावण आसने, विश्वासराव आहेर, ॲड.विद्यासागर शिंदे, गोदावरी खोरे केन ट्रान्सपोर्टचे कार्यकारी संचालक दौलतराव मोरे, गौतम केन ट्रान्सपोर्टचे एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर सुभाष गवळी, गोदावरी खोरेचे संचालक दिलीपराव शिंदे, विजयराव जाधव, विक्रम मांढरे, प्रदीप कुऱ्हाडे, कैलास आहेर, अशोक नीळकंठ, रमेश कोळपे, विजय थोरात, विक्रम सिनगर, अनिल वल्टे, गौतम केनचे संचालक भिकाजी सोनावणे, अरुण घुमरे, बबन भारसाकळ, रामदास कोळपे, भाऊसाहेब जोरे, माणिकराव चंद्रे, गणेश आहेर, अप्पासाहेब निकम, शकील पटेल, तसेच कारखान्याचे कार्यकारी संचालक सोमनाथ बोरनारे, जनरल मॅनेजर सुनील कोल्हे, सेक्रेटरी बाबासाहेब सय्यद, डेप्यू सेक्रेटरी संदीप शिरसाठ, गोदावरी खोरे जनरल मॅनेजर संतोष पवार, शेतकी अधिकारी निळकंठ शिंदे, सलग्न संस्था पदाधिकारी, सभासद व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.